म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र. २६०५७
REFBK-0026057

संदर्भ
काव्य
२८०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

२९।७।८८

21 MAR 1990
18 APR 1990
2 MAY 1990
6 JUN 1990
3 JAN 1991
6 FEB 1991
FEB 1991
23 MAR 1996
30।६।९९

(क्रु. मा. पहा)
१००००–११–८९

# आठवणीतल्या कविता
## भाग १

# आठवणीतल्या कविता

## भाग १

संपादक

पद्‌माकर महाजन
दिनकर बरवे
रमेश तेंडुलकर
राम पटवर्धन

REFBK-0026057

आठवण
१९८९

पहिली आवृत्ती   विजयादशमी, १९८९

© १९८९, आठवण

कवितांचे सर्वाधिकार कवींच्या अगर
त्यांच्या वारसदारांच्या स्वाधीन

मुखपृष्ठ
पद्मा सहस्रबुद्धे

किंमत चाळीस रुपये

प्रकाशक
प्रा० एकनाथ साखळकर
अध्यक्ष 'आठवण'
सावित्री निवास
पुरंदरे पार्क, आंबेडकर रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४

मुद्रक
प्र०पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

# एक मुक्त खजिना....

ह्या पुस्तकाची कल्पना आमच्या मनात कशी आली ते मनमोकळेपणाने सांगितलं की आमच्या योजनेचं स्वरूप आणि त्यामागचं उद्दिष्ट ह्या दोन्ही गोष्टी आपोआपच स्पष्ट होतील असं वाटतं. त्याचप्रमाणे निवडक कवितांचे अनेक प्रातिनिधिक आणि चांगले संग्रह मराठीत उपलब्ध असताना आणखी ह्या संकलनाची आवश्यकता काय, अशी शंका कुणाच्या मनात असली, तर तीही दूर व्हायला या मनोगताची मदत होईल.

तसं पाहिलं तर निमित्त अगदी साधंच घडलं. आमच्या कीर्ती महाविद्यालयाच्या बाजूलाच वीर सावरकर पथावर असलेल्या स्टेट बँकेच्या शाखेचे कार्यकुशल पदाधिकारी (खास पदोन्नती मिळून आता त्यांची तेथून बदली झाली आहे.) श्री. पद्‌माकर महाजन यांना काव्य, कला व इतर अनेक सांस्कृतिक विषय यांत रस असल्यामुळे या शाखेत आल्यावर आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांची ये-जा सुरू झाली आणि काही प्राध्यापक मंडळींत नित्याची ऊठबस होऊ लागली. कसली तरी माहिती, काही तरी शंका, कसला तरी शोध, यात त्यांना विशेष रस. '' 'चिव चिव चिमणी छतांत', ही कविता बालकवींच्या काव्यसंग्रहात आहे आणि भा. रा. तांबे यांच्याही, मग ती नेमकी कोणाची?'' असं एखादं गमतीदार कोडं घेऊन येण्याची त्यांना सवय. (बालकवींच्या संग्रहाला असलेल्या प्रस्तावनेतच त्याचा खुलासा आहे; पण तो कितीजणांना ठाऊक असतो?) आमचे ग्रंथपाल श्री. दिनकर बरवे (. . . 'विठ्ठल *बरवा*' या चालीवर त्यांनी 'बर्वे' या त्यांना अर्थशून्य वाटणाऱ्या आडनावाचं 'बरवे' असं आग्रहानं परिष्करण केलं आहे.) यांनाही या प्रकारच्या कामात तितकाच रस आणि शोध घेण्याची तितकीच चिकाटी.

तर एकदा महाजन घाईघाईने बरव्यांकडे आले आणि म्हणाले, '' 'पडुं आजारी, मौज हीच वाटे भारी', ही सगळी कविता हवी आहे.'' त्यांच्या कोणा परिचितांचे सुहृद् अमेरिकेत राहात होते. त्यांना ती कविता हवी होती. ते सुहृद् म्हणा किंवा त्यांचा नातू आजारी असताना 'पडुं आजारी' ही गमतीची कविता त्या सुहृदांना

आठवली होती. आणि ती सगळी मिळवायची तीव्र ओढ त्या मंडळींना लागून राहिली होती. आणि म्हणून महाजनांना ती कविता घाईने हवी होती.

आम्ही काही प्राध्यापक मंडळी तेथे बसलेली होतोच. कविता आमच्या सगळ्यांच्याच परिचयाची. अत्रे-घाटे-संपादित 'नवयुग वाचनमाले'च्या क्रमिक पुस्तकातून आमच्या पिढीने ती शाळेत अभ्यासिलेली आणि ऐकून इतरही सर्वांना आपोआप माहीत झालेली! पण नवयुग वाचनमालेची ती क्रमिक पुस्तकं कॉलेजच्या लायब्ररीत असण्याचा संभव फारच कमी. म्हणून कोणत्या कवीची ती कविता आहे याचा अंदाज घेऊन त्याच्या काव्यसंग्रहातून ती शोधता आली तर पहावी अशी कल्पना निघाली व संभाव्य कवींची नावं आम्ही आठवू लागलो.

तेवढ्यात 'नवे क्षितिज'चे संपादक, एशियाटिक सोसायटीच्या समितीवर असलेले आणि पाश्चात्य इतिहास-तत्त्वज्ञान-साहित्य-विचाराचे अभ्यासक श्री. विश्वास पाटील तिथं आले. तेही नेहमी येणाऱ्यांतले. आमची चर्चा ऐकून त्यांनी वेगळाच 'बॉंब' टाकला. ते म्हणाले, "तुम्हाला कुणाला या कवीच्या नावाची कल्पनाच करता येणार नाही. ही कविता भानू शिरधनकर यांची आहे."

आम्हांला आश्चर्याचा धक्काच बसला. शिकारकथा आणि अन्य प्रकारचं गद्य साहित्य लिहिणारे म्हणून भानू शिरधनकर हे नाव आमच्या माहितीचं होतं. काहींचा तर त्यांच्याशी व्यक्तिशः परिचय होता – पण त्यांनी कधी कविता लिहिल्याचं आठवत नव्हतं.

"हीच तर गंमत आहे", पाटील सांगू लागले, "ही कविता 'भानुदास' या टोपणनावाखाली अत्र्यांच्या नवयुग वाचनमालेत समाविष्ट झाली आहे. 'चित्रमय जगत्' या नियतकालिकात ती प्रथम प्रसिद्ध झाली होती. त्या कवितेचा त्यांना त्या काळात दीड रुपया मोबदला मिळाला होता. त्यातल्या सव्वा रुपयाचा त्यांनी नवा शर्ट घेतला आणि उरलेल्या चार आण्यांत चमचमीत खाण्याची चंगळ केली. श्री. धनंजय कीर यांच्याकडे भानू शिरधनकरांचं यासंबंधीचं बोलणं चाललं होतं तेव्हा मी तिथे होतो. म्हणून तर मला इतकी खात्रीची माहिती."

हे ऐकून महाजन-बरवे या दुकलीच्या अंगात कविता आणि कवी असा दुहेरी शोध घेण्याचा हुरूप संचारला. अशावेळी हटकून पहिली आठवण होते ती मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागाची. बरवे यांनी संदर्भ विभागातील श्री. मनोहर पारायणे यांना फोन लावला. " 'पडुं आजारी' ही कविता ना? आताच सांगतो. फोन तसाच ठेवा." पारायणे म्हणाले; पण दोन मिनिटांनी फोनवर येऊन म्हणाले, "थोडा वेळ लागेल हं. पण अर्ध्या तासात नक्की कळवतो." अर्ध्या तासाने फोन लावला तेव्हा संदर्भविभागाच्या प्रमुख व ग्रंथपाल श्रीमती लतिका जोशी फोनवर आल्या आणि सांगू लागल्या, "आम्ही संदर्भविभागातले सगळेजण त्या

कवितेचा शोध घेत आहोत, अजून ती मिळत नाही. पण आम्ही कवितेचा शोध लावूच. . . ''

यावरून ही कविता सहज उपलब्ध होणार नाही हे लक्षात आलं. पण ती सर्वांनाच ठाऊक आहे आणि सर्वांनाच तिच्या शोधात रस वाटतोय, असाही गमतीचा अनुभव आला. आता कवितेचा चौफेर शोध सुरू झाला. हा 'आजार' सर्वत्र पसरला. या स्वयंप्रेरित 'आजाऱ्यां'पैकी कुणी प्रौढ वयाच्या व्यक्तींना गाठू लागले; कुणी सांगू लागले, 'आमच्या सासूबाईंना या कवितेची दोन कडवी आठवतात.' कुणी सांगू लागलं, 'कविता मला नक्की येतेय. पण आता आठवत नाही.' या तऱ्हेचे अनेक गमतीदार अनुभव आले. पण एक नमूद करण्यासारखा आहे. श्री. बरवे आपल्या एका नातेवाईकाकडे गेले असता तिथंच शेजारी राहणाऱ्या श्रीमती भोंदे काम करता करताच या कवितेचं एकेक कडवं आठवू लागल्या व श्री. बरवे ते लिहून घेऊ लागले. कडव्यांचा क्रम त्यांना निश्चितपणे सांगता येईना, पण कविता सगळी आठवली. योगायोगाची गोष्ट म्हणजे श्रीमती भोंदे याही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्याच कार्यालयात कामाला असलेल्या. अखेर कवितेचा शोध लागला तो कॉलेजच्या शेजारीच राहणारे सुप्रसिद्ध संशोधक व समीक्षक गुरुवर्य डॉ. स. गं. मालशे यांच्याकडे. ते आमच्या कॉलेजात अनेक वर्षे शिकवीत होते व पुस्तकांसाठी अजूनही त्यांचं कॉलेजमध्ये जाणं-येणं चालू असतंच. त्यांच्या संग्रही असलेल्या 'नवयुग'च्या पाठ्यपुस्तकात ती कविता आढळली. 'भानुदास' या टोपणनावाखाली, शेवटी छापलेली.

म्हणजे श्री. विश्वास पाटील म्हणाले त्याप्रमाणे कविता भानुदासांचीच निघाली. पण हे भानुदास म्हणजे शिरधनकर नव्हेत तर श्री. कृष्णाजी विनायक पोटे नामक दुसरीच एक व्यक्ती आहे, हे त्यानंतर लौकरच स्पष्ट झालं,ते पुढे सांगतोच.

हा सगळा शोध गमतीने, आपापली कामं सांभाळून चालला होता. त्यात कसलाही ताण नव्हता; पण त्यात अनेकजण रंगले होते. त्यामुळे कविता हाती येताच पहाटेच बरव्यांचा फोन आला, ''अहो कविता सापडली!'' मागोमाग महाजनांचा फोन! दोघांनाही अनावर आनंद झाला होता. मीही तितक्याच गमतीने महाजनांना म्हणालो, ''महाजन, शोध संपला म्हणून, तुम्हाला आता चैन पडत नसेल. . .थांबा, तुमच्या मागे दुसऱ्या एका कवितेच्या शोधाचा झक्कू लावून देतो. 'कावळा म्हणे मी काळा! पांढरा शूभ्र तो बगळा! दिसतसे' — कोणाची आहे ही कविता? शोधा!''

महाजन ही एक विचित्र व्यक्ती आहे. ''त्यांच्या रस्त्याला तिसरा फुटपाथ असतो, आणि तो म्हणजे पुस्तकांचा'', असं आम्ही नेहमीच थट्टेनं म्हणत असतो. फुटपाथवर आढळणारी तऱ्हेतऱ्हेची जुनी दुर्मिळ पुस्तकं हुडकून विकत घेण्याचा

आणि त्यांचा संग्रह करण्याचा त्यांना अनेक वर्षांपासूनचा छंद आहे. त्या दिवशी दुपारीच ते हर्षभरित होऊन मला कॉलेजात भेटायला आले. म्हणाले, ''ही घ्या ती कविता. अवघ्या दोन तासांत माझ्या संग्रही असलेल्या 'मुलांकरिता कविता' या जुन्या पुस्तकात मला ती मिळाली. 'पडुं आजारी'इतका वेळ या कवितेनं खाल्ला नाही.''

झालं, मग तिथे गप्पा मारत असलेल्या विविध विषयांच्या प्राध्यापक मंडळींपैकी अनेकांच्या, शालेय कवितांसंबंधीच्या आठवणी जाग्या होऊ लागल्या. थेट 'भोऽ पंचमजॉर्ज', 'सुतार उत्तमसा', 'देवाजीने करुणा केली', 'आई, थोर तुझे उपकार', 'एका कोळियाने', 'सोनें लुटुनि . . . मोरू परतुनी आला', 'नेमेंचि येतो मग पावसाळा'पासूनच्या आठवणी जाग्या झाल्या. कुणाला आजीच्या जवळी असलेलं 'घड्याळ कसले' आठवलं, कुणाला 'गमे पक्ष्यांतील बडा फौजदार' असा 'कोंबडा' आठवला, कुणाला 'गरिब बिचारा माधुकरी' आठवला तर कुणाला 'असे रायबा सोडुन आले आज इथे घरदार'मधले रायबा आठवले. कुणाला 'हें विमान फिरतें अधांतरी' ही लहानपणीची 'किती मौज दिसे ही पहा तरी!' आठवली. पावसाच्या पहिल्या सरीने मातीतून उमललेला मृद्‌गंध हवेत सर्वत्र पसरल्यावर वातावरण एकदम उल्हसित होऊन जावं तशी काहीतरी किमया अकस्मात घडून आली.

हेही सारं गंमत म्हणूनच चाललं होतं. पण हा सारा प्रकार पाहून शाळेतल्या पुस्तकांतल्या अशा आठवणाऱ्या कविता सगळ्या एकत्र गोळा करून ठेवल्या तर ... अशी कल्पना महाजन-बरवे यांच्या डोक्यात आली. एखादा विषय गाजला की त्यासंबंधीच्या कात्रणांची फाइल संदर्भासाठी ग्रंथालयात करून ठेवण्याचा बरव्यांना सरावच होता. शिवाय दोघांपाशीही रस घेण्याची वृत्ती आणि कष्ट करण्याची चिकाटी सारखीच. दोघांनीही मग जो कोणी भेटेल त्याच्याशी गप्पा मारताना 'पडुं आजारी' या कवितेचा विषय काढून त्याच्या शाळेतल्या कवितांच्या आठवणी जाग्या करण्याचा सपाटाच लावला. निरनिराळ्या वयाच्या, निरनिराळ्या पिढीच्या, निरनिराळ्या व्यवसायांतल्या, निरनिराळ्या विचारांच्या, निरनिराळ्या अभिरुचीच्या व्यक्ती यात सारख्याच समरसतेने रंगलेल्या आढळल्या. अशा प्रकारे मिळालेल्या जवळ जवळ चारपाचशे कविता त्यांनी बघता बघता गोळा केल्या.

ज्यात काही 'क्रिएटिव्हिटी' आहे अशा झाडं लावण्याच्या उपक्रमापासून (आपल्या निवासस्थानाच्या गच्चीवर त्यांनी स्वतः खपून केलेल्या 'टेरेस गार्डन'वरूनही याची कल्पना यावी) अनेक विषयांत रस असलेले व आमच्या अनेक कार्यक्रमांत सहभागी होणारे 'राज्यशास्त्र' या विषयाचे अभ्यासक आणि त्या विभागाचे प्रमुख, उपप्राचार्य प्रा. एकनाथ बाळकृष्ण साखळकर यांना या प्रकारात विशेषच आस्था निर्माण झाली. हे सगळे परिश्रम असेच वाया जाऊ नयेत, सर्वांना

त्यांचा लाभ व आनंद मिळावा, यासाठी हे सगळं संकलन पुस्तकरूपाने प्रकाशित का करू नये, अशी कल्पना त्यांनी मांडली व तिचा पाठपुरावा सुरू केला. आतापर्यंत कविता आणि कवी या विषयांकडे हमखास पाठ फिरविणारे प्रा. साखळकर आता स्वतःच 'क्षणोक्षणिं पडे, उठे, परि बळें' . . . अशा कवितेच्या ओळी गुणगुणत चक्क कवितांची यादी करायला बसले. एक छंद म्हणून सुरू केलेल्या उपक्रमाला प्रा. साखळकरांच्या सूचनेमुळे आता वेगळीच दिशा लाभली.

यात माझी अवस्था सांगायची तर मी प्रारंभापासूनच या प्रकरणात, वेळेच्या अभावामुळे व या तऱ्हेच्या कामाला आवश्यक असलेली चिकाटी अंगात नसल्यामुळे तसा दूरदूरच राहिलेला; पण कवितेवरील प्रेमामुळे व या सर्वांशीच असलेल्या स्नेहसंबंधांमुळे दूर राहूनही बघता बघता त्या जाळ्यात चांगलाच ओढलाही गेलो. व्यावहारिक बाजूची जाण शून्य. पण प्रकाशनाच्या कल्पनेचं स्वागत केलं.

तथापि कोणी 'प्रकाशक' गाठण्याऐवजी आपणच या कविता प्रकाशित कराव्या असा धाडसी विचार साखळकर-महाजनांच्या डोक्यात आला, व तो त्यांच्या मनाने पक्का घेतला. यामागे 'व्यवहार' नव्हता, 'प्रेम' होतं – शाळेतल्या कवितेवरचं व त्या कविता स्मृतिकोषात जतन करणाऱ्या वाचकांवरचं! – हाच वाचकवर्ग मुख्यतः त्यांचा ग्राहक होता. त्याला हा आनंदाचा ठेवा माफक किमतीत मिळावा व त्याबरोबरच त्याच्याशी एक प्रकारचं प्रेमाचं, सौहार्दाचं, जिव्हाळ्याचं अप्रत्यक्ष नातं निर्माण व्हावं, असं त्यांच्या मनाने घेतलं. याचसाठी त्यांना 'प्रकाशका'तर्फे परस्पर होणारा तटस्थ, अलिप्त कोरडा 'व्यवहार' नको होता. भावनेचा हा हळुवारपणा सर्वांनाच मान्य होण्यासारखा होता.

पण यात यातायातही तितकीच मोठी होती. देणग्या, जाहिराती, अनुदानं इत्यादी रूपांनी निधी गोळा करणं हा 'व्यवहार' अटळच होता. यासाठी'संस्था' आवश्यक होती, तीही काढायचं त्यांनी ठरवलं. 'हंस'शी अनंत अंतरकरांच्या काळापासून निगडित असलेले आमचे साहित्यिक मित्र ॲडव्होकेट शिवराम ग. बोरकर यांच्याशी सल्लामसलत केली आणि सर्वांनी या संस्थेचं 'आठवण' असं नामकरण केलं. एका बाजूला देणग्या, अनुदानं मिळविण्याचं क्षेत्र व्यापक करावं यासाठी मराठीबरोबरच इंग्रजीतूनही निवेदनं-आवाहनं तयार केली, तर दुसऱ्या बाजूला, कागद आणि मुद्रण यांच्या प्रत्यही भडकत जाणाऱ्या किमती डोळ्यांसमोर दिसत असतानाही आगाऊ नोंदणी करणाऱ्या वाचकांसाठी (त्यांनी आधीच दाखविलेल्या विश्वासाची आणि प्रेमाची पावती म्हणून) केवळ साठ रुपयांत तीन भाग (म्हणजे तीन पुस्तकं) देण्याचं ठरविलं. हे गणित त्या 'देहूच्या वाण्या'लाही लाजविणारं आहे असं सुज्ञांचं मत पडलं, तरी मंडळींचा निर्धार कायम. झालं, निवेदनं आणि पावतीपुस्तकंही बाहेर पडली.

याच सुमारास श्री. भानू शिरधनकर या नावाविषयी काही व्यक्तींनी शंका उपस्थित केल्याचं आमच्या कानावर आलं. त्यांमध्ये श्री. पु. रा. बेहेरे यांचं नाव असल्याचं समजताच श्री. बरवे यांनी त्यांना फोन केला. ते म्हणाले, "अहो, हे भानुदास म्हणजे भानू शिरधनकर नव्हेत आणि ही कविताही त्यांची नाही. ती आमच्या पोटे मास्तरांची कविता आहे. तेच भानुदास. मी शिरोड्याला शाळेत शिकत असताना आम्हांला शिकवायला ते होते. अनेकदा ते ही कविता स्वतः वर्गात गाऊनही दाखवायचे ... श्री. पोटे हे मूळ सांगलीचे. सांगलीचे सुप्रसिद्ध कवी साधुदास यांना ते गुरुस्थानी मानीत. या 'साधुदास' नावावरूनच भानुदास हे नाव त्यांनी स्वतःसाठी धारण केलं होतं."

दरम्यान 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये 'जावे ग्रंथांच्या गावा' या सदरात श्री. प्रदीप कर्णिक यांचा 'कथा – आठवणीतल्या कवितांची' हा लेख प्रसिद्ध झाला व तो खूप गाजला. मागोमाग त्याच आठवड्यात जयसिंगपूरहून प्रा. मोहन कृष्णाजी पोटे यांचं आलेलं पत्र 'म.टा.'मध्ये प्रसिद्ध झालं. त्यात 'ती' कविता आपले वडील कृष्णाजी विनायक पोटे ऊर्फ भानुदास यांची असल्याचं त्यांनी लिहिलं होतं. श्री. बरवे यांनी प्रा. पोटे यांना पत्र लिहिलं. त्यावर प्रा. पोटे यांनी तत्परतेने, आपल्या वडिलांच्या कविता समाविष्ट असलेली पुस्तकं व त्यांच्या 'नवयुग वाचनमाले'तील 'पडुं आजारी' या कवितेच्या चेकसंबंधी कर्नाटक पब्लिशिंग प्रेसकडून आलेल्या पत्राची 'झेरॉक्स' प्रत इत्यादी साहित्य श्री. बरवे यांच्या माहितीसाठी पाठविलं. 'पडुं आजारी' ही कविता श्री. कृष्णाजी विनायक पोटे ऊर्फ भानुदास यांची असल्याचं स्पष्टच झालं. याला दुजोरा देणाऱ्या आणखी काही व्यक्ती भेटल्या. पत्रं आली.

श्री. विश्वास पाटील यांनी सांगितलेली घटनाही शंभर टक्के खरी होती. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे भूतपूर्व रजिस्ट्रार श्री. पद्माकर एडवणकर हे त्या घटनेचे एक साक्षी आहेत... बहुधा शक्यता अशी आहे की श्री. भानू शिरधनकर यांचंही नाव 'भानुदास' होतं व ते त्यांच्या निकटच्या आप्तवर्तुळात माहीत होतं. त्यामुळे त्या दिवशी कवितेवरून काही बोलणं निघालं असताना हा 'इनोसंट जोक' करण्याची त्यांना त्या क्षणी लहर आली असावी. एरव्ही कुणालाही ते तसं सांगत नसत, अशी श्री. वा. वि. भट (अभिनव प्रकाशन) यांच्यासारखे शिरधनकरांचे निकटचे मित्र ग्वाही देतात.

ते काहीही असो, मुळात या घटनेत वाद असा नव्हताच. 'पडुं आजारी' या धर्तीचीच ही थोडीशी 'मौज' घडली एवढंच. असो.

आनंदाची गोष्ट म्हणजे आमच्या योजनेला निरनिराळ्या थरांतून अपेक्षेबाहेर अनुकूल प्रतिसाद मिळायला लागला. मुळात कोणी आयता 'प्रकाशक' न शोधण्यामागे जी भावनिक देवघेवीची कल्पना अभिप्रेत होती, तिचाच प्रत्यय येऊ

लागला. ''आमच्या वेळच्या ह्या ह्या कविता त्यात आहेत का हो? . . .वा! मग आम्हाला हवाच हा संग्रह घ्यायला.'' . . . .''अमक्या अमक्या कविता त्यात दिसत नाहीत, त्यादेखील नंतर घेणार ना?'' . . . असा सर्वसाधारण वाचकांचा दुहेरी पातळीवरचा सक्रिय प्रतिसाद मिळू लागला : एक म्हणजे आगाऊ नोंदणीतून निधी जमा होऊ लागला आणि दुसरी गोष्ट म्हणजे अधिकाधिक 'आठवणीतल्या कविता' गोळा होऊ लागल्या. दुर्गाबाई भागवत यांच्या हातात कुठून तरी छापील निवेदन पडताच, त्या विलक्षण हर्षभरित झाल्या आणि त्यांनी चक्क त्यांच्या पिढीतल्या त्यांना आठवणाऱ्या कविता आठवल्या तशा लिहून काढून आम्हाला पाठवून दिल्या. आमच्या कार्याला एका ज्येष्ठ विदुषीचा हा शुभाशीर्वादच मिळाला असं आम्हाला वाटलं.

हाच अनुभव आम्हांला अनेक थोर व्यक्तींच्या बाबतीत आला. प्रा. साखळकर, श्री. बरवे, श्री. महाजन आणि आमच्या महाविद्यालयातील प्रा. श्रीमती नंदिनी मथुरे ही मंडळी माननीय पु. ल. देशपांडे यांना 'एन.सी.पी.ए.'च्या कार्यालयात भेटायला गेली तेव्हा पु.लं.नी या कल्पनेचं मनापासून स्वागत केलं आणि बोलण्याच्या ओघात बघता बघता ते स्वतःचं त्या काळात रंगून गेले. त्या काळात कविता चालीवर कशा म्हणत असत याचं प्रात्यक्षिकही त्यामुळे त्यांच्या सहज अभिनयातून या मंडळींना अनायासंच पाहायला मिळालं. आतल्या बाजूला बसलेल्या श्री. वृंदावन दंडवतेंनाही त्यांनी त्यांच्यात बोलावून घेतलं. ''आमचे प्रयत्न फार तुटपुंजे आहेत . . . तयारीही फार बेताचीच आहे'', असं या मंडळींनी सांगताच पु. ल. देशपांडे उद्गारले, ''अहो, असं का मानता? तुमच्यापाशी कविता आहेत, आणि हेच तुमचं मोठं 'अ‍ॅसेट' आहे!''

कवयित्री शांताबाई शेळके यांचं मुळातच कवितेसंबंधीचं प्रेम आणि त्या बाबतीतली स्मरणशक्ती जबरदस्त. श्री. बरवे त्यांना भेटले तेव्हा सतत काव्यातच अवगाहन करीत असल्याप्रमाणे शांताबाईंनी बोलता बोलता असंख्य कवितांच्या आठवणींना उजाळा दिला. श्री. बरवे यांच्या हातातल्या जुन्या क्रमिक पुस्तकांना प्रेमाने कुरवाळलं, अनेक संग्रहांची – व ते कुठे कुठे उपलब्ध होतील याची – माहिती पुरविली आणि भारून गेल्याप्रमाणे स्वतःसाठी एक आणि लता मंगेशकर यांच्यासाठी एक अशा पावत्या फाडायला लावल्या.

व्यावहारिक बाबतींतही असाच स्वयंस्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. कमिशन न घेता या पुस्तकाची विक्री करायचा मनोदय काही वितरकांनी व्यक्त केला तर काही व्यक्तींनी माफक दरात मुद्रण करायची तयारी दर्शविली. शासकीय व इतर प्रकारची अनुदानं मिळवून देण्यात पुढाकार घेण्याचं काही व्यक्तींनी मान्य केलं. या प्रतिसादात रद्दी विकणाऱ्या छोट्याशा दुकानदारापासून मोठ्या उद्योगसमूहात

आर्थिक सल्लागार म्हणून उच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीपर्यंत सर्वांचा सारखाच प्रेमाचा सहभाग पाहायला मिळत होता, हा एक अत्यंत सुखद व सतत उत्साह देणारा अनुभव होता. परक्या भाषेतील मंडळीदेखील – जरी प्रथम त्यांना या कामाचं स्वरूप नेमकं लक्षात येईना तरी – आर्थिक मदतीचा हात द्यायला पुढं येऊ लागली.

एखाद्या जहाजाच्या शिडामध्ये चोहोबाजूंनी भणाणत वारा शिरावा, तसा हा उत्साहाचा प्रतिसाद सर्व बाजूंनी भणाणत आला. पुस्तकप्रकाशन हा व्यवहार तर आहेच, पण त्याचं एक तंत्रही आहे; मेकॅनिक्स आहे. आम्हा अननुभवी मंडळींना त्याचं भान नव्हतं. बऱ्याचशा कविता गोळा करून झाल्या आहेत, मुद्रणाची सोय उपलब्ध होणार आहे, फक्त कागदासंबंधीची हाकाटी आपण ऐकत असतो, त्याची तरतूद झाली की झाली पुस्तकांची तयारी, अशी त्यांची काहीशी समजूत झाली, त्यामुळे प्रारंभी काहीसं सैरभैर स्वरूप या कामाला येऊ लागल्यासारखं झालं. सगळेच मदतीला धावले, तरीही कार्याचा नाश होतो, असला काहीतरी चमत्कारिक अनुभव येऊ लागला.

या टप्प्यावर आवश्यकता वाटली ती एखाद्या अनुभवी जाणकाराची – या कामाचं स्वरूप काय आहे, हे ज्याच्या नेमकं लक्षात येईल, जुन्या क्रमिक पुस्तकांतील कवितांविषयी ज्याला प्रेम असेल, त्या 'काळा'चा ज्याला 'फील' असेल, ग्रंथनिर्मितीचा प्रत्यक्ष अनुभव असेल, व सौंदर्यदृष्टीबरोबरच प्रेम आणि शिस्त हे गुण ज्याच्यापाशी असतील अशी व्यक्ती मिळाली तरच साऱ्यांच्या परिश्रमांचं चीज होणार होतं

मला एकदम आमचे स्नेही प्रा. राम पटवर्धन यांची आठवण झाली. त्यांच्याशी आधी थोडं बोलून त्यांच्याकडे फाइली देऊन ठेवल्या व दोन दिवसांनी, साखळकर, महाजन, बरवे यांना बरोबर घेऊन त्यांच्याकडे गेलो. या तिघांचा त्यांच्याशी प्रथमच परिचय होत होता. घरगुती आतिथ्याबरोबरच, हातातल्या फाइलींवर नजर टाकीत, "पुस्तक उभं करण्याच्या दृष्टीने या कामाची अजून सुरुवातच व्हायची आहे", हे त्यांनी आमच्या नजरेस आणून दिलं. क्रमिक पुस्तकांच्या विविध आवृत्त्यांवरून 'झेरॉक्स' केलेल्या प्रतींतल्याही, अर्थविपर्यास करणाऱ्या मुद्रणदोषांपासून, शब्द वा ओळी गाळण्यापर्यंतच्या विविध प्रकारच्या फेरफारांचे नमुने त्यांनी एकामागून एक सादर करताच सर्वांचेच डोळे खाड्कन उघडले. जशाच्या तशा त्या फाइली मुद्रणाला दिल्या तर एवढे परिश्रम घेऊनही बेफिकीरपणाचा, निष्काळजीपणाचा आणि उथळपणाचा ठपका एका चांगल्या कामावर येऊ शकेल, हा धोकाही त्यांनी स्पष्ट केला.

केवळ एक छंद – एक नवा छंद म्हणून ह्या सगळ्या गोष्टी करायला घेतल्या

होत्या. कोणताही छंद हा 'मुक्तछंद' होऊ शकतो, पण स्वैर-छंद, सैराट-छंद, बेबंद-छंद होऊ वा राहूच शकत नाही आणि छंद म्हणूनसुद्धा तो तसा राहणं इष्ट नसतं, ही जाणीव आता झाली आणि आम्ही प्रा. पटवर्धनांना संपादनाच्या कार्यात सहभागी करून घेतलं.

येथून या कामाला खऱ्याखुऱ्या अर्थाने एक विशिष्ट दिशा आणि वळण मिळालं. क्रमिक पुस्तकांची शक्य तिथे पहिली आवृत्ती शोधणं, ती उपलब्ध नसेल तर शक्य तिथे मूळ कवीची कृती पाहणं इत्यादी मार्गांनी प्रथम शुद्ध मुद्रणप्रत तयार करणं, तसंच सूच्या, परिशिष्टं तयार करणं इत्यादी जिकिरीच्या कामाची जबाबदारी श्री. बरवे यांनी आनंदाने स्वीकारली व त्यानी अक्षरशः त्यात स्वतःला गाडून घेतलं. मात्र त्याबरोबरच, पुस्तकाचं एकूण स्वरूप आधी अभिप्रेत असल्याप्रमाणे मोकळंच ठेवायचं, सामान्य वाचकांना 'विद्वत्तापूर्ण' संशोधन-ग्रंथासारखं वाटणारं करायचं नाही, हीही भूमिका आम्हांला बजावायची होती.

एका बाजूला व्यावहारिक पातळीवरील वास्तवातील परिस्थिती अजून ठणठणीत कोरडी होती, आकाशात मेघ जमले होते आणि ते नुसतेच 'गर्जणारे' मेघ नव्हते. ते निश्चितच पाऊस घेऊन येणार होते. पण या क्षणाला मात्र जमिनीवर काही पाणी नव्हतं – आगाऊ नोंदणीतून व प्रेमाच्या देणग्यांतून अल्पस्वल्प निधी हाती होता, तेच काय ते भांडवल. अजून मोठ्या देणग्या, अनुदानं याबाबतींतील हालचाली पुऱ्या व्हायच्या होत्या.

पण आनंदाची गोष्ट अशी की त्यामुळे कामाच्या गतीला कुठंच खीळ पडत नव्हती. कुठंच परकेपणा जाणवत नव्हता. वेष्टणासंबंधी विचार निघताच आमच्याशी आधी बोलून श्री. राम पटवर्धन यांनी सौ. पद्मा सहस्रबुद्धे यांचं नाव सुचविलं आणि कोणत्याही प्रकारचा औपचारिकपणा न ठेवता त्यांनी अल्पावधीत एक सुरेख चित्र या संग्रहासाठी तयार करून दिलं. सौ. पद्माबाईंचा हा अनौपचारिकपणा त्यांच्या अभिजात सौंदर्यवृत्तीला साजेसाच होता. याच अभिजात सौंदर्यवृत्तीने आम्हांला या कामात अनेक प्रकारचं साहाय्य करणारे आमचे स्नेही, विख्यात चित्रकार श्री. भालचंद्र कडणे यांनी नियतकालिकांत जाहिरातीसाठी वापरता येईल अशा तऱ्हेचं एक छोटंसं कृष्णधवल चित्र तत्परतेने तयार करून दिलं.

एकूणच या कामाला असा दर्जा आणि पातळी येत आहे हे पाहिल्यावर, 'मौज' मुद्रणालयातून हे काम करून घेतलं तर, असा 'उच्च' विचार आता एकेकाच्या डोक्यात वळवळू लागला. ते परवडेल की नाही या 'क्षुद्र' कल्पनेला मनात थारा द्यायला आता कोणी राजी नव्हतं. ही एक पुढची पायरी होती. एक दिवस सकाळी 'मौज'ला फोन लावला. श्री. पु. भागवत सध्या अमेरिकेत आहेत हे ठाऊकच होतं. प्रभाकरपंत फोनवर आले. फोनवर मी बोलतोय हे कळताच म्हणाले, "बरेच

दिवसांनी 'आठवण' झाली!"

त्यातली 'आठवण' शब्दातली गंमत नंतर माझ्या ध्यानात आली. मी म्हणालो, "आम्ही काही मंडळी तुम्हाला भेटायला येणार आहोत. एका पुस्तकाच्या मुद्रणाचं काम तुमच्याकडे झालं तर हवं आहे. . . पण प्रत्यक्षच बोलू. . ."

" 'आठवणीतल्या कविता' ना?" ते लगेच म्हणाले.

"तुम्हाला कसं कळलं?" मी आश्चर्यानं विचारलं.

"अहो, आगाऊ नोंदणीचे आम्ही ग्राहक झालो आहोत ना! . . .बरं. . .या दुपारी. . .आपण बोलू." ते म्हणाले.

हा एक शुभ-संकेतच होता. दुपारी मी, साखळकर, बरवे त्यांना भेटायला गेलो, तेव्हा त्यांच्यासमोर दुसरी काही माणसं कामासाठी बसलेली होती. म्हणून त्यांचे पुतणे माधवराव यांनी आम्हाला बोलावून घेतलं. तेही आगाऊ नोंदणीचे ग्राहक झालेले होतेच. आम्ही आमचा सगळा 'अननुभव' आणि 'अव्यवहार' त्यांच्यापुढे मोकळेपणाने मांडला. . . . त्यांचा सहकार्याचा हात तत्काळ पुढे झाला.

— आणि आता ह्या पुस्तकाचा पहिला भाग आपल्यासमोर येत आहे!

आता या योजनेसंबंधीच्या इतर काही गोष्टींकडे वळतो.

प्रथम आम्ही, म्हणजे महाजन आणि बरवे या दोघांनी केवळ छंद म्हणून, भेटेल त्या व्यक्तीकडून त्यांना आठवणाऱ्या कवितांची नावं गोळा करून ठेवली होती. त्यावेळी पुस्तक वगैरे काढायची कल्पना नव्हतीच. पुस्तकाची कल्पना पुढं येताच या कामाच्या काही सीमारेषा आखणं भाग पडलं. म्हणून आम्ही असं ठरविलं की स्वातंत्र्योत्तर काळात नवीन अभ्यासक्रम आखला जाऊन त्यानुसार नवी पाठ्यपुस्तकं तयार झाली त्या आधीचा काळ ही स्थूलमानाने कालिक सीमारेषा ठरवायची व तोपर्यंतच्या पिढ्यांचा समावेश या संकलनात करायचा. अर्थात ही एक स्थूल कल्पना डोळ्यांसमोर ठेवली आहे. पण समजा, एखादी पुढल्या कालखंडातली कविता त्यात समाविष्ट झालेली आढळली तर त्याने विशेष काही बिघडणार नाही. अशी शक्यता असण्याचं एक कारण, प्रारंभी कविता गोळा करताना महाजन-बरव्यांनी अशी कोणती कालिक सीमारेषा आखून घेतली नव्हती. हा विचार नंतरचा.

प्राचीन-अर्वाचीन — दोन्ही प्रकारच्या कविता घ्यायच्या असं आम्ही ठरविलं. फक्त एकच तत्त्व समोर ठेवलं, ते म्हणजे कविता प्रथम कुणाच्या तरी स्मृतीतून-आठवणीतून आली पाहिजे. कवितांची पुस्तकं उघडून त्यांतून कविता शोधायला जायचं नाही. मात्र या पुस्तकात घेताना त्या आठवलेल्या कवितेची संहिता

अचूक घेतली जावी यासाठी क्रमिक पुस्तक किंवा इतर साधनं यांचा उपयोग करायचा, असंही ठरविलं.

'भो पंचम जॉर्ज भूप', 'इंग्लंद देशांत, लंदन राजधानी!' यासारख्या पारतंत्र्य-काळातील परक्या राजवटीची स्तोत्रं गाणाऱ्या कवितांचं काय करायचं हाही एक लहानसा प्रश्न उभा राहिला. आता 'पारतंत्र्य' ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती होती व अशा कविता लिहिल्या गेल्या हीही वस्तुस्थिती होती. आणि या दोन्ही गोष्टी आता ऐतिहासिक स्वरूपाच्या झाल्या आहेत, हीही वस्तुस्थिती आहे. तेव्हा या कवितांकडे आता आठवणींच्या रंगांतूनच पाहणं युक्त ठरेल असं वाटलं. 'भो पंचम जॉर्ज भूप' ही कविता तर जुन्या क्रमिक पुस्तकांत इतकी रुतून बसली आहे की त्या कवितेला धरूनच जुन्या क्रमिक पुस्तकाची आठवण होते. आणि केवळ या आठवणीच्या गंमतीदार रंगांतूनच तीही कविता इथं समाविष्ट केली आहे.

अनेक दृष्टींनी सगळ्या कविता एकाच पुस्तकात समाविष्ट करण्याऐवजी त्यांचे १, २, ३ . . . असे भाग छापणं सोयीचं वाटलं. विपुल कवितांचं एकच जाडजूड पुस्तक काढलं तर 'लायब्ररी-एडिशन' म्हणून त्याला संदर्भ-ग्रंथाचं स्वरूप प्राप्त होईल, व संदर्भासाठीच त्याचा उपयोग करावासा वाटेल. नेहमी हाताळायला असा ग्रंथ सुटसुटीत वाटत नाही. म्हणजे आमचा मुख्य हेतूच फसेल. शिवाय सगळ्याच्या सगळ्या कविता अजून गोळा करून झाल्या आहेत, असंही नाही. अजून कितीतरी कविता यायच्या आहेत, येत आहेत. अजून आमच्या नित्याच्या परिचयातल्या, व या कामात खात्रीने रस घेतील अशा, कितीतरी व्यक्तींना आम्हाला भेटायचं आहे. त्यांच्याकडूनही अजून खूप काही मिळू शकेल. याचाच अर्थ, आवश्यकता वाटली तर तीननंतरही आणखी काही भाग तयार करायला या योजनेत वाव ठेवायला हवा. म्हणजेच ही योजना मोकळी, प्रवाही ठेवायला हवी. हीच दृष्टी डोळ्यांसमोर ठेवून हे जे तीन भाग तयार केले आहेत, त्यांनादेखील आम्ही तसं कोणत्याच प्रकारचं बंदिस्त रूप दिलेलं नाही. याचा अर्थ एक विशिष्ट पिढी, विशिष्ट विषय, विशिष्ट वयोगट, प्राचीन-अर्वाचीन हा भेद, दीर्घ-लहान आकार यांसारख्या कल्पना डोळ्यांसमोर ठेवून हे भाग पाडलेले नाहीत. सगळ्या एकाच प्रकारच्या, एकाच विषयावरच्या, एकाच रसाच्या किंवा एकाच कवीच्या कविता शक्यतो एकाच ठिकाणी गर्दी करणार नाहीत, एवढंच फक्त पाहिलं आहे. तसंच कवितांचा अनुक्रम लावतानाही हा मोकळेपणा ठेवला आहे. सहलीच्या वेळी गप्पा मारायला एकत्र, जवळजवळ, पण ज्या मोकळेपणाने माणसं बसतात त्याच पद्धतीची ही सैलसर मांडणी आहे म्हणा ना! थोडक्यात हेतू असा की कोणताही ताण येऊ न देता विश्रब्ध वृत्तीने या कवितांचा आस्वाद वाचकांना घेता यावा, त्यात रंगून जाता यावं. प्रत्येकाला त्याच्या ओळखीच्या, त्याला आवडणाऱ्या काही कविता तरी प्रत्येक

भागात सापडाव्यात, यासाठी आम्ही शक्य तितका प्रयत्न केला आहे.

पूर्वीचा काळ असा होता की शाळेतील कवितांच्या जोडीला त्या वयात इतरही कविता व गाणी घरातून, सणासमारंभातून, मेळ्यांतून, सार्वजनिक कार्यक्रमांतून कानांवरून जायची. अंगाईगीतं, बाळगाणी, भक्तिगीतं, सणांची गाणी इत्यादी प्रकारची. 'इथ इथे बस रे मोरा', 'चांदोबा, चांदोबा भागलास का', 'नखोल्या बाई नखोल्या' इत्यादी . . . यातली काही उजळणीच्या पुस्तकांतून दिलेली असायची. गाणी आणि कविता एकमेकांत मिसळलेल्या असायच्या. कित्येकदा गाणी आणि कविता यांत अभिन्नता असायची. आपल्या आठवणीत शालेय कवितांच्याच विस्तारासारख्या (एक्स्टेन्शनसारख्या) किंवा पूरक आठवणींसारख्या या कविता व गाणी घर करून राहिल्या आहेत. त्यांचा समावेश या संग्रहात करावा की नाही याविषयी आमच्या मनाची धरसोड होत राहिली. घ्याव्यात असं तर वाटायचं, पण मग नाट्यगीतं, इतर कविताही त्या काळातील मुलांच्या ऐकण्यात यायच्या. त्याही का नकोत ? – पण असं केलं तर मग हळूहळू मूळच्या योजनेची कक्षाच बदलेल की काय, अशीही आमची प्रतिक्रिया होऊ लागली. ही दोलायमान अवस्था वाचकांना पहिल्या भागातील निवडीत प्रतिबिंबित झालेली आढळेल.

ह्या दृष्टीने जसजसा आम्ही या योजनेचा पुनर्विचार करीत गेलो आणि त्याच्या जोडीला रसिकांच्या अपेक्षा लक्षात घेत गेलो, तसतसे मूळ योजनेत अनेक फेरफार करणं आम्हांला क्रमप्राप्त झालं किंबहुना पहिल्या पत्रकात खंड-वार प्रसिद्ध केलेल्या याद्या (भाग १, २, ३) बाजूला ठेवून सगळीच योजना नव्याने आखावी लागली.

पण आमचे अशा तऱ्हेचे संभ्रम कवितांचे पुढचे भाग प्रसिद्ध करताना आपोआप वितळतील असा भरवसा आहे. पहिला भाग प्रसिद्ध झाल्यावर त्याला मिळणारा प्रतिसाद, प्रतिक्रिया, सूचना यांतूनही काही बदल करता येतील. सारांश, आठवणीच्या रंगांतूनच या संकलनाला विशिष्ट आकार येत जाईल. ही काही 'संशोधित आवृत्ती' नव्हे. पण संकलनात कसलाही ढिसाळपणा राहू द्यावा असा याचा अर्थ होत नाही, ही दृष्टी ठेवली आहे.

शाळेत अनेक विषयांचा अभ्यास करावा लागत असताना पुढील आयुष्यात कविताच आठवणीत रहाव्यात, हा निदान आपल्या पिढीपर्यंतच्या अनेकांचा अनुभव आहे. शाळेत असताना सर्वांनाच कविता आवडतात असं नाही. कित्येकदा कदाचित सक्तीनेही त्यांना त्यावेळी त्या अभ्यासाव्या लागल्या असतील आणि तरीही पुढील काळात त्यांच्या भावकोषात त्या कविता रम्य आठवणींच्या रूपात राहतात, या अनुभवाचं रहस्य कशात आहे, असा प्रश्न येथे मनात आल्याखेरीज राहात नाही. याचं मूळ त्यावेळच्या सांस्कृतिक वातावरणात आहे, त्यावेळच्या शिक्षणपद्धतीत आहे, अभ्यासक्रमात भाषेला असलेल्या महत्त्वाच्या स्थानात आहे,

कवितांच्या विशिष्ट स्वरूपात आहे, अन्य प्रकारच्या करमणुकीच्या साधनांचा त्यावेळी असलेला अभाव यात आहे, की या सर्वांच्या एकत्र परिणामात आहे, याचा शोध घेता येण्यासारखा आहे. तो इथं अभिप्रेत नाही, पण अशा प्रकारच्या शोधाला साधन-सामग्री म्हणून हे संकलन निश्चितच उपयुक्त ठरेल. 'पाठ्यपुस्तकांतील कविता' या विषयावर अनेक अंगांनी, या सामग्रीच्या आधारे संशोधन करता येईल. पाठ्यपुस्तकातही कित्येकदा किती निष्काळजीपणाने कवितांचं मुद्रण होत असतं, यासारख्या बाजूही कोणाला विचारात घेता येतील. कवितेच्या गुणवत्तेचा निकष आम्ही हे संकलन करताना डोळ्यांसमोर ठेवलेला नाही. कविता 'आठवणीत रुजलेली असणं', या गोष्टीवर आमचा विशेष भर आहे. पण ह्यामुळेही एखाद्याला, या संकलनाच्या आधारे, त्या कालखंडातील वाङ्मयीन अभिरुचीचे परिशीलन करता येईल.

आमचा हेतू अगदी मर्यादित आहे . . . व तो एव्हाना पुरेसा स्पष्ट झाला असेल. आम्ही प्रसृत केलेल्या निवेदनामुळे काही घरांत जुन्या कवितांच्या आठवणींनी उजळलेलं वातावरण निर्माण झालं. तेथील नव्या पिढीतली मुलं-मुली म्हणू लागली, "आम्हाला तुम्ही यातून का वगळता ? आम्हाला या कविता आवडणार नाहीत असा का तुमचा समज झाला आहे ? तुम्ही या कवितांसंबंधी बोलता तेव्हा आम्हांलाही त्यात गोडी वाटते." हा अनुभव प्रातिनिधिक म्हणता आला नाही तरी नोंद करून ठेवण्यासारखा जरूर आहे. 'नोंद करून ठेवण्यासारखा आहे' एवढंच म्हटलं, याचा अर्थ एवढाच घ्यायचा की इथं कोणालाही मज्जाव नाही. पण जुन्या कवितांची गोडी नव्या पिढीला लावण्यासाठी हा खटाटोप नाही. केवळ आठवणींचे विशुद्ध रंग घेऊनच या कविता इथं आल्या आहेत. झाडांना फुलं असतात, आकाशात तारे असतात, तशा शाळेतल्या पुस्तकांत कविता 'असतात', किंबहुना गाणी आणि कविता नुसत्या 'असतात' . . . अशा समजुतीतल्या वयाचे रंग घेऊन या कविता पुन्हा इथं आल्या आहेत . . . अगदी निर्हेतुक, विशुद्ध रंगांत !

कविताच नव्हेत, जुन्या क्रमिक पुस्तकांतील काही गद्य वेचेही आपल्या आठवणीत असेच राहिलेले असतात – 'दिनूचं बिल', 'म्हातारा आणि त्याचा बैल', 'लांडगा आणि कोकरू' अशा कितीतरी कथा सांगता येतील. उद्या त्यांचंही संकलन करायची योजना कुणी आखील – काय सांगावं, हा उत्साह असाच कायम राहिला तर कदाचित आम्हीही हे संकलन उद्या करू. . . खरं तर 'आठवणी'चं वर्तुळ कितीतरी अंगांनी मोठं, मोठं करता येण्यासारखं आहे . . . त्यात कितीतरी अन्य विषयांचाही समावेश होऊ शकेल.

तूर्त अननुभवातूनच चाललेला हा प्रवास फक्त कवितांपुरताच मर्यादित केला आहे.

यानिमित्ताने आधी प्रसिद्ध केलेल्या निवेदनांत आम्ही म्हटल्याप्रमाणे "हा एक मुक्त खजिना आहे, — प्रत्येक वाचकाच्या हृदयकोषात गुप्तपणे दडून राहिलेला . . . अधिकाधिक रसिकांपर्यंत पोचून त्यांचाच हा मुक्त खजिना त्यांनाच सुपूर्द करण्याचा आनंद आम्हांला लुटायचा आहे."

अशा प्रसंगी-

**सोनें लुटुनी सायंकाळीं मोरू परतुनि आला**
**बहीण काशी दारीं येउनि ओवाळी मग त्याला**
**दसरा सण मोठा — नाही आनंदा तोटा !**

ह्या साकीची आठवण हटकून झाल्याखेरीज कशी राहणार ?

'नाही आनंदा तोटा', . . . 'नाही आनंदा तोटा' . . . अशा तल्लीन वृत्तीने या 'आनंदाच्या डोही' यथेच्छ डुंबल्याचा आनंद आपणास मिळाला तर त्या आनंदासाठी या कार्यात 'तोटा' झाला तरी तो 'आनंदाने' सोसण्यात — नव्हे, स्वीकारण्यातही — आम्हाला धन्यताच वाटेल !

मुंबई
ललितापंचमी
बुधवार ४ ऑक्टोबर १९८९

**रमेश तेंडुलकर**

२६०२
२६०१५
२/३/९०

# कृतज्ञता !

क्रमिक पुस्तकांमधील कवितांच्या मुद्रित संग्रहाची कल्पना निघाली तेव्हा 'तुम्ही या फंदात पडू नका. पाच प्रतीदेखील जाणार नाहीत', असा पोक्त सल्ला आम्हांला अनेक हितचिंतकांकडून मिळाला होता. पण आमच्या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद सगळीकडून, सगळ्या पातळ्यांवरून मिळाला.

"आज सर्वत्र अविश्वासाचे साम्राज्य पसरले असताना या संग्रहासाठी पावतीसुद्धा न विचारता लोकांनी भराभर पैसे पाठवून दिले आहेत", असं पत्र या पुस्तकासाठी आगाऊ-नोंदणीत आम्हाला मदत करणाऱ्या एका व्यक्तीने न राहवून लिहिलं, तर "अडचणीत असल्यामुळे आगाऊ-नोंदणीसाठी फक्त दहा रुपये पाठवीत आहे. उरलेले पैसे पाठवल्यानंतरच संच द्या, पण आगाऊ-नोंदणीत माझं नाव राहू द्या" अशी कुणा एकाने कळकळीची विनंती केली आहे. . . अशी अनेक उदाहरणं आहेत. आम्हाला हवी होती ती प्रेम आणि विश्वासाची पावती यात मिळाली. . . आम्ही कृतज्ञ आहोत.

अशाच ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी केलेल्या आगाऊ नोंदणीतून आणि त्याच्या जोडीला काही व्यक्तींनी प्रेमाने सदिच्छापूर्वक दिलेल्या छोट्या देणग्यांतून एक लाखाच्या वर द्रव्य आमच्याकडे जमा झालं. सामान्य वाचकांच्या प्रतिसादातून कवितेसाठी एक लाख रुपये सहज जमतात, ही कवितेच्या इतिहासातील एक अद्भुत घटना म्हणूनच नोदविली जाईल, असं आम्हांस वाटतं.

.कुठल्या तरी साहसी अंतःप्रेरणेने दोन हजार संच काढायचं आम्ही ठरवलं होतं. पण आगाऊ नोंदणीच दोन हजार संचांच्या पुढे गेली व मुद्रणालयाकडे नव्याने मागणी नोंदवावी लागली. या घटनेचे अन्वयार्थ आम्हांला सांगता येणार नाहीत.

सुरुवातीपासूनच या कामात विविध व्यक्तींचं विविध प्रकारचं आम्हांला इतकं साहाय्य झालं आहे की त्याची केवळ नोंद करण्यासाठी या मालिकेचा एक स्वतंत्र खंडच काढावा लागेल. आम्ही सदैव त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

**एकनाथ साखळकर**
अध्यक्ष, 'आठवण'

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| थोर तुझे उपकार | भा. दा. पाळंदे | १ |
| महाराष्ट्र गीत (बहु असोत सुंदर) | श्री. कृ. कोल्हटकर | २ |
| मराठबाणा (महासिंधु याला) | माधव जूलियन | ३ |
| हा हिंददेश माझा (आनंदकंद ऐसा) | आ.कृ. टेकाडे | ४ |
| गाउं त्यांना आरती (संगरीं वीराग्रणी) | यशवंत | ५ |
| परमेश्वराची प्रार्थना (आस ही तुझी) | – | ७ |
| कोंबडा ! (कुणा आवडतो) | दत्तप्रसन्न कारखानीस | ८ |
| राज्याभिषेक गीत (भो पंचम जॉर्ज) | – | १० |
| मुलांस उपदेश (शिवी कोणा देऊं नये) | – | ११ |
| आनंदी आनंद (आनंदी आनंद गडे) | बालकवि ठोमरे | १३ |
| आजीचें घड्याळ (आजीच्या जवळीं) | केशवकुमार | १५ |
| शेतकरी व भाताचें पीक (किती प्रभूची) | – | १७ |
| पेरील जैं शेतकरी न कांहीं | – | १८ |
| कर्णाची प्रार्थना आणि कृष्णाचें प्रत्युत्तर | मोरोपंत | १९ |
| हुकमे हुकूम (करमत नव्हतें म्हणुनि) | गोविंदाग्रज | २१ |
| खालीं आणि वर (उंच पाटी पालथी) | केशवकुमार | २२ |
| आकाशांतील घारीस (अमर्याद हा व्योम) | दत्त | २६ |
| रानांत एकटेंच पडलेलें फूल (वन सर्व) | ना.वा. टिळक | २७ |
| जिऊ (नमुनेदार धनाजी धनीण त्याची) | चंद्रशेखर | २९ |
| इरलेवाली (वेडिंवाकडीं घेउनि वळणें) | वा.गो. मायदेव | ३० |
| चंद्रकांत राजाची कन्या | गो. [illegible] | ३२ |
| अ आ ई ! (मोत्या शीक रे) | दत्त | ३३ |
| माझी बाहुली (लहान माझी बाहुली) | - | ३४ |
| नीतिशतकांतील वेंचे (करूं ये समाधान) | वामन पंडित | ३५ |

| | | |
|---|---|---|
| माझी कन्या (गाइ पाण्यावर काय) | बी | ३७ |
| मुद्रिका (मुद्रिके सखे तूं) | — | ४१ |
| फुलपांखरूं (जेथें हिरवळ फार) | केशवसुत | ४३ |
| शिवराज्याभिषेक (स्थलदेवींनो, जलदेवींनो) | ग.त्र्यं. माडखोलकर | ४५ |
| आजारीपण (पडुं आजारी, मौज हीच) | भानुदास | ४७ |
| या बाळांनो (या बाळांनो या रे या) | भा.रा. तांबे | ४९ |
| बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास | गोविंदाग्रज | ५० |
| माझी ताई (ताइ, तूं फूल गडे माझें) | ना.वा. टिळक | ५३ |
| खार (लहान सुंदर गोजिरवाणी) | म.का. कारखानीस | ५४ |
| उठा उठा चिऊताई | कुसुमाग्रज | ५५ |
| जाईची फुलें (स्वागत करूं माझें) | माधवानुज | ५७ |
| सासरची पाठवणी (आलें मूळ म्हणोनियां) | कृ.ना. आठल्ये | ५८ |
| मी तुझी मावशी तुला न्यावया आलें | लक्ष्मीबाई टिळक | ६१ |
| मराठी ग्रंथकारांस प्रार्थना (म्हणतात जे) | गं.रा. मोगरे | ६३ |
| गुराख्याचें गाणें (कुरणावरतीं वडाखालतीं) | भा.रा. तांबे | ६५ |
| कोळ्याचें गाणें (आला खुशिंत समिंदर) | अनंत काणेकर | ६६ |
| शबर्याख्यान (निघे दंडका राम) | आनंदतनय | ६८ |
| चेंडू (वाहवा ! वाहवा ! चेंडू हा) | मिस मेरी भोर | ७२ |
| प्रियकर हिंदिस्तान | ना.वा. टिळक | ७३ |
| नवीन भाऊ (बघूं आई, कुठें माझा) | माधव जूलियन | ७४ |
| फत्तर आणि फुलें (होता डोंगरपायथ्यास) | केशवकुमार | ७६ |
| माधुकरी (गरिब बिचारा माधुकरी) | श्री. बा. रानडे | ७७ |
| रायबा (जाडेंभरडें धोतर अंगीं) | गोपीनाथ | ७९ |
| घर (लइ मानस अमुचा द्यावी) | यशवंत | ८० |
| गोदागौरव (तुज हृदयंगम रवें विहंगम) | चंद्रशेखर | ८१ |
| श्रावणमास (श्रावणमासीं हर्ष मानसीं) | बालकवि ठोमरे | ८३ |
| फुलपांखरूं (फुलपांखरूं, छान किती) | ग.ह. पाटील | ८४ |
| करुणाष्टकें (अनुदिनिं अनुतापें) | रामदास | ८५ |
| कां रे नाठविसी | तुकाराम | ८६ |
| चिमा (भाग्याचे समयीं मजा उडविली) | विनायक | ८७ |
| शब्द (शब्द बापडे केवळ वारा) | वा.ब. पटवर्धन | ८८ |

| | | |
|---|---|---|
| आहे मनोहर तरी गमतें उदास | सरस्वतीकंठाभरण | ८८ |
| दिवाळी, तो आणि मी (दीपांनी दिपल्या दिशा) | अनंत काणेकर | ९० |
| बाळाची बोली (आई ! आई ! बोलतो कसा) | भवानीशंकर पंडित | ९१ |
| तान्हा भाऊ (चिमकुला बहु बालक हा) | मो.ग. लोंढे | ९२ |
| माझी शाळा (तुझें जेव्हां जेव्हां सहज मजला) | गिरीश | ९४ |
| आमचें घर (आमुचें घर छान, शेजारी वाहे) | माधव जूलियन | ९५ |
| कावळा व बगळा (कावळा म्हणे मी काळा) | रा. देव | ९७ |
| हिरवें तळकोकण (सह्याद्रीच्या तळीं शोभतें) | माधव | ९८ |
| आंदोलन (ताई गुणाची माझी छकुली) | दत्त | १०२ |
| रायगडावर काय आहे ? (राष्ट्राचा इतिहास) | मो.ग. लोंढे | १०३ |
| यापुढें (कोठचा शिवाजी राजा, निज धर्माचा) | विनायक | १०४ |
| कोळ्याचा प्रयत्न (एका कोळियानें) | – | १०७ |
| श्रीकृष्णाची मुरली (अंग वक्र अधरीं) | वामन पंडित | १०९ |
| पावसाचें गाणें (उघड पावसा ऊन पडूं दे) | श्री. बा. रानडे | १११ |
| सायंकाळची शोभा (पिवळें तांबुस ऊन कोवळें) | भा.रा. तांबे | ११२ |
| सूर्यास्त (साम्राज्य भू-जलनिधीवर चालवून) | वासुदेव वा० खरे | ११३ |
| सागरास (ने मजसी ने परत मातृभूमीला) | वि.दा. सावरकर | ११५ |
| तुरुंगाच्या दारांत (वाढुं दे कारागृहाच्या) | यशवंत | ११७ |
| उद्यांचा काय नेम ? (तुझीया मनीं चांगलें) | वि.कों. ओक | १२० |
| मधमाशी (उठुनि सकाळीं ती मधमाशी) | – | १२० |
| कशासाठीं ? पोटासाठीं ! | माधव जूलियन | १२० |
| झाल्या तिन्हिसांजा (अजुनि कसे येती ना) | यशवंत | १२३ |
| दीपविसर्जन (करीं आरती घेउनी आर्यबाला) | माधवानुज | १२५ |
| घरिं एकच पणती | वि.स. खांडेकर | १२६ |
| जग वंदी त्यासच पुन्हां पुन्हां | अज्ञातवासी | १२७ |
| खचतो माझा धीर (हे चिमण्या चंद्रा) | वा.गो. मायदेव | १२८ |
| शूर्पणखा (गेलें तुझ्यावर जडून, रामा, मन) | गिरीश | १२९ |
| उपदेशपर आर्या (सत्य सदा बोलावें) | – | १३१ |
| परस्पर प्रीतीविषयीं उदाहरण (एक्या लहान) | – | १३२ |
| चुकलेलें कोंकरूं (कां भटकसि येथें बोलें) | वि.दा. सावरकर | १३३ |
| चांदोबाची गंमत (ये ये ताई पहा पहा) | ह.स. गोखले | १३५ |

| | | |
|---|---|---|
| लेजीम (दिवस सुगीचे सुरू जाहले) | श्री.बा. रानडे | १३६ |
| ईश्वराचें महत्त्व (स्तुती करावी परमेश्वराची) | – | १३८ |
| देव (देवा तुझें किती, सुंदर आकाश) | ग.ह. पाटील | १३९ |
| आई (नीज न ये तर गीत म्हणावें) | – | १४० |
| दसरा (सोनें लुटुनी सायंकाळीं) | – | १४० |

# थोर तुझे उपकार

थोर तुझे उपकार ॥
आई, थोर तुझे उपकार ॥ ध्रु० ॥

वदत विनोदें, हांसत सोडी ॥
कोण दुधाची धार ॥ १ ॥

नीज न आली तर गीत म्हणे ॥
प्रेम जिचें अनिवार ॥ २ ॥

येई दुखणें तेव्हां मजला ॥
कोण करी उपचार ॥ ३ ॥

कोण कडेवर घेउनि फिरवी ॥
चित्तीं लोभ अपार ॥ ४ ॥

बाळक दुर्बळ होतों तेव्हां ॥
रक्षण केलें फार ॥ ५ ॥

त्वांचि शिकविलें वाढविलें त्वां ॥
आहे मजवर भार ॥ ६ ॥

स्मरण तुझ्या या दृढ ममतेचें ॥
होतें वारंवार ॥ ७ ॥

नित्य करावें साह्य तुला मीं ॥
हा माझा अधिकार ॥ ८ ॥

**भास्कर दामोदर पाळंदे**

# महाराष्ट्र गीत

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु० ॥.

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशयनदांविणें ?
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ॥ ३ ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो

वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ॥ ५ ॥

**श्री० कृ० कोल्हटकर**

## मराठबाणा

महासिंधु याला असे पाठिराखा, तसे साह्य सह्याचलाचे कडे,
खडे दुर्ग साल्हेर, फोंडा, परांडा, अशेरी असे दक्ष चोहींकडे;
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणदेही, परी लोहपाणीहि अंगांत या,
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा, मांजरा, वैनगंगा तया.

महात्मा खरा जो स्वधर्माभिमानी परी धर्मवेडास थारा न दे,
समत्वें गुणग्राहकत्वेंच योजी स्वकीयांस जो राष्ट्रकार्यामधें,
सदा वंद्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्रसम्राट् शिवाजी प्रभू
तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न कां संतमाता महाराष्ट्रभू ?

जिचा 'अमृतातेंहि जिंकील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका,
पहा भिन्नजातीय पुष्पाकरांहीं दिसे गालिचा कीं हिची वाटिका,
मराठी अशी ज्ञानदेवी जयाची असे मायबोली मराठीच तो,
हृदीं रक्त दे साक्ष तो बंधु माझा, कुठेंही असो उच्च वा नीच तो.

मराठीस अन्याय कोठेंहि झाला, स्वदेशीं विदेशीं कुणीं गांजिलें
मराठी कसा मी न संताप माझा धडाडे जरी तीव्र दुःखानिलें ?
मराठी जनांचेंच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशीं तरी –
प्रसादें तुझ्या कोणती व्यक्त आशा करूं अन्य हे वंद्य वागीश्वरी ?

**माधव जूलियन**

# हा हिंददेश माझा

आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा ॥

सत्यास ठाव देई,
वृत्तीस ठेवि न्यायी
सत्यासि मानि राजा । हा हिंददेश माझा ॥

जगदीश जन्म घेई,
पदवीस थोर नेई,
चढवी स्वधर्मसाजा । हा हिंददेश माझा ॥

जनकादि राजयोगी,
शुक वामदेव त्यागी,
घुमवीति कीर्तिवाजा । हा हिंददेश माझा ॥

दमयंति, जानकी ती,
शीलास भूषवीती
नटली नटेश-गिरिजा । हा हिंददेश माझा ॥

विश्वास मोह घाली;
ऐशी मुकुंद-मुरली
रमवी जिथे निकुंजा । हा हिंददेश माझा ॥

गंगा हिमाचलाची,
वसती जिथें सदाची,
होऊनि राहि कलिजा । हा हिंददेश माझा ॥

पृथुराज सिंह शिवजी,
स्वातंत्र्यवीर गाजी,
करिती रणांत मौजा । हा हिंददेश माझा ॥

तिलकादि जीव देहीं,
प्रसवूनि धन्य होई,
मरती स्वलोककाजा । हा हिंददेश माझा ।।

जगिं त्याविना कुणीही
स्मरणीय अन्य नाहीं
थोरांत थोर समजा । हा हिंददेश माझा ।।

पूजोनि त्यास जीवें
वंदोनि प्रेमभावें
जयनाद हाचि गर्जा । हा हिंददेश माझा ।।

**आनंदराव कृष्णाजी टेकाडे**

## गाउं त्यांना आरती

**[वृत्त : पांडव दिडकी]**

संगरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू संकटीं
जन्मले या भारतीं.
राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना मृती
गाउं त्यांना आरती. १

कोंदला अंधार मार्गीं खांचखड्डे मातले
तस्करांनीं वेढिलें,
संभ्रमीं त्या जाहले, कृष्णापरी जे सारथी
गाउं त्यांना आरती. २

स्वार्थहेतूला दिला संक्षेप ज्यांनीं जीवितीं
तो परार्थी पाहती,

आप्तविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती
गाउं त्यांना आरती. ३

देश ज्यांचा देव, त्याचें दास्य ज्यांचा धर्म हो
दास्यमुक्ति ध्येय हो,
आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती,
गाउं त्यांना आरती. ४

देह जावो, देह राहो, नाहिं ज्यांना तत्क्षिती
लोकसेवा दे रती,
आणि सौभद्रापरी ेतात जे आत्माहुती
गाउं त्यांना आरती. ५

जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचनें
क्षाळुनी त्यांचीं मनें,
कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृती, ज्यांच्या स्मृती
गाउं त्यांना आरती. ६

नेटकें कांहीं घडेना, काय हेतू जीवना
या विचारीं मन्मना
बोधितों कीं एवढी होवो तरी रे सत्कृती
गा तयांची आरती. ७

**यशवंत**

# परमेश्वराची प्रार्थना

[श्लोक : कामदाछंद]

आस ही तुझी फार लागली ॥
दे दयानिधे बुद्धि चांगली ॥
देउं तूं नको दुष्ट वासना ॥
तूंच आंवरीं माझिया मना ॥ १ ॥

देह देउनी तूंच रक्षिसी ॥
अन्न देउनी तूंच पोशिशी ॥
बुद्धि देउनी काम सांगशी ॥
ज्ञान देउनी तूंच तारिशी ॥ २ ॥

वागवावया सर्व सृष्टिला ॥
शक्ति बा असे एक तूजला ॥
सर्वशक्ति तूं सर्वदेखणा ॥
कोण जाणिजे तूझिया गुणा ॥ ३ ॥

नाम रूप हें तूजला नसे ॥
त्या तुला मुखें वर्णवे कसें ॥
आदि अंत ना मध्यही तुला ॥
तूंच दाविशी मार्ग आपुला ॥ ४ ॥

माणसें अम्ही सर्व लेंकरें ॥
माय बाप तूं हें असे खरें ॥
तूझिया कृपेवीण ईश्वरा ॥
आसरा अम्हां नाहिं दूसरा ॥ ५ ॥

तूंच आहसी आमुची गती ॥
देइं आमुतें उत्तमा मती ॥
प्रार्थितों तुला जोडुनी करां ॥
हे दयानिधे कीं कृपा करा ॥ ६ ॥

# कोंबडा !

कुणा आवडतो मोर पिसाऱ्याचा
असे कोणाला छंद कोकिळेचा;
कुणी असतो नादिष्ट पोपटाचा
मला आहे परि नाद कोंबड्याचा ! १

करायाचें मज काय पिसाऱ्याचें ?
मधुर-कंठा पक्षिणी कोकिळेचें ?
खाद्य खाया देतांच बोलतो जो
असा नटवा शुक तुम्हां आवडो तो ! २



किती माझा कोंबडा ऐटदार,
चाल त्याची किति बरें डौलदार !
शिरोभागीं छानसा तुरा हाले
जणूं जास्वंदी-फूल उमललेलें ! ३

पिसारा त्याचा किती झोंकदार
चोंच त्याची चिमुकली बांकदार !
अर्ध पायीं पांढरीशी विजार
गमे विहगांतिल बडा फौजदार ! ४

"उठा मूर्खांनो ! झोंप काय घेतां ?
अरुण-उदयाचा काल असे आतां !
करा कांहीं तरि आळसा त्यजून,"
उषःकालीं सांगतो ओरडून ! ५

किती माझा कोंबडा हो शहाणा
लोक-कल्याणा झटतसे पहा ना !
बरें-वाईट त्या म्हणा कुणी कांहीं
प्राप्त-कर्तव्या सोडणार नाहीं ! ६

लोक-कल्याणीं दक्ष असा प्राणी
जगीं मजला या दिसत नसे कोणी !
मोर, पोपट, कोकिळा, राजहंस
रिकाम्यांचा या बडेजाव खास ! ७

अती परिचय जाहला कोंबड्याचा
म्हणुनि करितां का मानभंग त्याचा ?
जरी आवडला नाहिं तो तुम्हांला
सदा देई आनंद मन्मनाला ! ८

दत्तप्रसन्न कारखानीस

# राज्याभिषेक गीत

[राग : मांड (मिश्र); ताल : एक्का]

भो पंचम जॉर्ज, भूप, धन्य धन्य ! विबुधमान्य सार्वभौम भूवरा ! ॥
नयधुरंधरा, बहुत काळ तूंचि पाळ ही वसुंधरा ॥
शोभविशी रविकुलशी कुलपरंपरा ॥ ध्रु० ॥ नयधु०॥

संतत तव कांत शांत राजतेज जगीं विलसो ॥
धर्मनीति शिल्पशास्त्र ललितकला सफल असो ॥
सगुणसागरा, विनयसुंदरा ॥ १ ॥ नयधु०॥

नीतिनिपुण मंत्रि तुझे तोषवोत जनहृदंतरा ॥
सदा जनहृदंतरा ॥
राजशासनीं प्रजाहि विनत असो शांततापरा ॥
असो शांततापरा ॥ २ ॥ नयधु०॥

समरधीर वीर करुत कीर्तिविस्तरा ॥
पुत्र पौत्र सुखवुत तव राजमंदिरा ॥
सौख्यपूर्ण दीर्घ आयु भोग नृपवरा ॥ ३ ॥ नयधु०॥

भो पंचम जॉर्ज, भूप, धन्य धन्य ! विबुधमान्य सार्वभौम भूवरा ! ॥
नयधु०॥

# मुलांस उपदेश

[अभंग]

शिवी कोणा देऊं नये ॥
कोणासंगें भांडूं नये ॥ १ ॥

अनवाणी चालूं नये ॥
चालतांना धांवूं नये ॥ २ ॥

खोटी साक्ष देऊं नये ॥
जामिन कोणा होऊं नये ॥ ३ ॥

दुसऱ्याचें चोरूं नये ॥
खोटें कधीं बोलूं नये ॥ ४ ॥

गोड फार खाऊं नये ॥
पाहिलें तें मागूं नये ॥ ५

चित्तीं धरी जो हे बोल ॥
त्याचें कल्याण होईल ॥ ६ ॥

[अभंग]

सकाळीं उठोनी, देवासी भजावें ॥
गुरूसी वंदावें, जीवें भावें ॥ १ ॥

वडिलांची आज्ञा, घेतल्यावांचून ॥
कोठें घरांतून, जाऊं नये ॥ २ ॥

शाळेसी जातांना, मुलांनीं वाटेंत ॥
तमाशा पाहात, राहूं नये ॥ ३ ॥

नेमियल्या वेळीं, शाळेमध्यें जावें ॥
चित्त तें ठेवावें, विद्येवरी ॥ ४ ॥

बाळपणीं विद्या—,वृक्षासी लावावें ॥
तरुणपणीं घ्यावें, फळ त्याचें ॥ ५ ॥

[अभंग : तुकाराम]

आतां तरी पुढें, हाची उपदेश
नका करूं नाश, .आयुष्याचा ॥ १ ॥

सकळांच्या पायां, माझें दंडवत ॥
आपुलालें चित्त, शुद्ध करा ॥ २ ॥

हित तें करावें, देवाचें चिंतन ॥
करूनियां मन, शुद्ध भावें ॥ ३ ॥

तुका म्हणे हित, होय तो व्यापार ॥
करा, काय फार शिकवावें ॥ ४ ॥

# आनंदी आनंद

आनंदी आनंद गडे !
इकडे तिकडे चोहिंकडे.
वरतीं खालीं मोद भरे,
वायूसंगें मोद फिरे;
   नभांत भरला,
   दिशांत फिरला,
   जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

सूर्यकिरण सोनेरी हे,
कौमुदि ही हंसते आहे,
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
   मेघ रंगले
   चित्त दंगलें,
   गान स्फुरलें,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहातसे;
कुणास बघतें ? मोदाला
मोद भेटला का त्याला ?
   तयामधें तो
   सदैव वसतो,
   सुखें विहरतो,

इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले
डोलत वदले–
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात,
त्यांना मोद कसा मिळतो
सोडुनी स्वार्था तो जातो
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

बालकवि ठोमरे



## आजीचें घड्याळ

आजीच्या जवळीं घड्याळ कसलें आहे चमत्कारिक,
देई ठेवुनि तें कुठें अजुनि हें नाहीं कुणा ठाउक;
त्याची टिक् टिक् चालते न कधिंही, आहे मुकें वाटतें;
किल्ली देइ न त्यास ती कधिं, तरी तें सारखें चालतें! १

"अभ्यासास उठीव आज मजला आजी पहांटे तरी,"
जेव्हां मी तिज सांगुनी निजतसें रात्रीं बिछान्यावरी.
साडेपांचहि वाजतात न कुठें तों हांक ये नेमकी,
"बाळा झांजर जाहलें, अरवला तो कोंबडा,ऊठ कीं !" २

ताईची करण्यास जम्मत, तसें बाबूसवें भांडतां
जाई संपुनियां सकाळ न मुळीं पत्ता कधीं लागतां !
"आलीं ओटिवरी उन्हें बघ !" म्हणे आजी, "दहा वाजले !
जा जा लौकर !" कानिं तो घणघणा घंटाध्वनी आदळे. ३

खेळाच्या अगदीं भरांत गढुनी जातां अम्ही अंगणीं
हो केव्हां तिनिसांज तें न समजे ! आजी परी आंतुनी
बोले, "खेळ पुरे, घरांत परता ! झाली दिवेलागण,
ओळीनें बसुनी म्हणा परवचा ओटीवरी येउन !" ४

आजीला बिलगून ऐकत बसूं जेव्हां भुतांच्या कथा,
जाई झोंप उडून, रात्र किति हो ध्यानीं न ये ऐकतां !
"अर्धी रात्र किं रे" म्हणे उलटली, "गोष्टी पुरे ! जा पडा !"
लागे तो धिडधांग पर्वतिवरी वाजावया चौघडा ५

सांगे वेळ, तशाच वार-तिथिही आजी घड्याळांतुनी
थंडी पाउस ऊनही कळतसे सारें तिला त्यांतुनी !
मौजेचें असलें घड्याळ दडुनी कोठें तिनें ठेविलें ?
गाठोडें फडताळ शोधुनि तिचें आलों! तरी ना मिळे ! ६

केशवकुमार

## शेतकरी व भाताचें पीक

[अंगविक्षेप करून म्हणावयाचें गाणें.]

किती प्रभूची थोर कृपा ही ! भूमीवरतीं जला ॥
पाडुनी ताप लया लाविला ! ॥ ध्रु० ॥

जाऊं आतां शेतावरतीं जमिन नांगरूं बरी ॥
कुळवही फिरवूं तिचियावरी ॥
झाली ती हो भुसभुशीत, बीं फेकूं तिचियामधीं ॥
रोप तें करुं या सर्वांअधीं ॥
मनासारखें भाताचें हें रोपहि आलें जरी ॥
पाहिजे पाउस सरिंवर सरी ॥

[चाल बदलून]

किति ऊन कडकतरि पडलें पहा ॥
सुकलीं कीं सर्वांची तोंडें अहा ! ॥
कधिं कोसळेल समजेना मेघ हा ॥

[चाल पहिली]

आली आली मुसळधार ही, देव पावला भला ! ॥
रोप तें सत्वर उपटूं चला ॥ किती० ॥ १ ॥

गुडघ्यावेरीं चिखल जाहला आतां करुं लावणी ॥
संपवूं काम गीत गाउनी ॥
चोंढे तैशीं सर्व खाचरें तुडुंब भरलीं जळें ॥
दिसतसे पीक सर्व लाभलें ॥
आनंदानें पाहूं आतां पुनव नव्याची बरी ॥
प्रभुकृपेस्तव या संवत्सरीं ॥

[चाल बदलून]

काय मजातरि या शिवाराचि दीसते ॥

ठायिं ठायिं जलाचे ओघ वाहताति ते ॥
सुखावले पशुपक्ष्यादिक सारे जीव ते ॥

[चाल पहिली]

झालि दिवाळी हळुहळु आतां शेतकापणिस चला
सुगीचा लाभ बरा जाहला ॥ किती० ॥ २ ॥

## पेरील जैं शेतकरी न कांहीं

पेरील जैं शेतकरी न कांहीं,
तैं खावयाला मिळणार नाहीं.
कोठून धान्यें मिळती अनेक ?
फळाफुलांना मुकतील लोक ! ॥ १ ॥

कापूस शेतांत जरी पिके ना,
कोठून वस्त्रें बनतील नाना ?
झाकावयालागिं शरीर पाहीं,
तैं वस्त्र साधें मिळणार नाहीं ! ॥ २ ॥

पेरी न तो तीळ, तरी तिळेल,
तळावयालागिं कसें मिळेल ?
जगांत होईल अनर्थ सारा,
जरी रुसे शेतकरी बिचारा ! ॥ ३ ॥

# कर्णाची प्रार्थना आणि कृष्णाचें प्रत्युत्तर

स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे, "बळ तुझें अनंत रहा
स्वस्थ मुहूर्तभरि, रण-श्रद्धा पुरवील, गा, अनंतर हा. ॥ १ ॥

रथचक्र उद्धरूं दे श्रुति-शास्त्रज्ञा, महा-रथा कुल-जा,
साधु न हाणिति अरिला, पाहति अ-धृतायुध व्यथाकुल ज्या. ॥ २ ॥

तूं स्वरथीं, क्षितिवरि मी, तूं सायुध, मी अशस्त्रकवच रणीं;
न वधावें मज, जो मी गुंतुनि गेला असें रथोद्धरणीं. ॥ ३ ॥

भ्यालों न तुज हरीसहि; जो न तुला विमुख, काय कातर तो ?
कथितों यास्तव कीं जन धर्में भवसिंधु, नायका, तरतो ॥ ४ ॥

रक्षावा धर्म बुधें, कुशळाचा धर्म हा निधी, राहें
स्थिर, जें करिसि निरायुधमथन करिल धर्महानि, धीरा, हें." ॥ ५ ॥

कृष्ण म्हणे, "राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें
नीच व्यसनीं बुडतां निंदिति दैवास, न स्वकर्मातें. ॥ ६ ॥

जेव्हां तूं दुर्योधन, दुःशासन,शकुनि एक-मति झालां,
कैसे कपट-द्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ? ॥ ७ ॥

जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म !
तेव्हां गेला होता कोठें, राधासुता तुझा धर्म ? ॥ ८ ॥

फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग,
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषा, सांग. ॥ ९ ॥

चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले, असें नृपें खोटें
कर्म करवितां, कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ॥ १० ॥

केले दग्ध जतु-गृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा, सूत-नंदना, तेव्हां ? ॥ ११ ॥

अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां, त्वां वारिलें न तें कर्म;
तेव्हां गेला होता कोठें, राधासुता, तुझा धर्म ? ॥ १२ ॥

पूर्वी धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि जो जसा कुचला;
आतांचि बरा सुचला ! काळगृहा सर्व व्हा परासु चला. ॥ १३ ॥

मागेंचि तुम्ही भजतां धर्माला तरि तुम्हांस वांचविता;
आतां मरा, न वाचे दीप्त-गृहीं जो न तोय सांचविता. ॥ १४ ॥

मागेंचि धर्म करितां, जरि देतां राज्य, धर्म वांचविता;
न जगे, जो दुर्भिक्ष-व्यसनापूर्वी न धान्य सांचविता. ॥ १५ ॥

आतां रक्षील कसा धर्म ? तुम्हीं वित्त-मद्य-मत्तांनी
जो लोटिला दहादां, स्वहितहि मानूनि अहित, लत्तांनी. ॥ १६ ॥

रक्षावा धर्म असा करिशी उपदेश, तरि असे मान्य;
रक्षितसों धर्मातें; आम्हांला धर्म ठाउका नान्य." ॥ १७ ॥

**मोरोपंत**

# हुकमे हुकूम

[साकी]

करमत नव्हतें म्हणुनि एकदां असाच गेलों रानीं
वसंत का—परि ऋतु दुसरा कधिं कुणीं पाहिला कवनीं !

समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी
बोलुनि चालुनि कवि पडलों मी सहजचि त्याला लक्षीं.

वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें, पक्षि आणि कविराय
तुम्हीच सांगा, रसिका, आतां हवें आणखीं काय ?

सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया
नवल वाटतें सांगाया परि—कीं तें गेलें वांया.

''वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांहीं गाणें गाच
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच.

बंधु तुझा मी—माझ्यासाठीं गड्या लाग तूं गाया
हे बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया.

स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत
चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत.

गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर
कीं, शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर.''

अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनी साच
भिकारडें तें कांहीं केल्या परंतु ऐकेनाच.

'गा' म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती.

''एक मारितों दगड असा कीं पडेल दांसुनि चोंच''
म्हणुनि वांकलों तसाच खालीं आवेशानें तोंच—

लगबग दिसले स्नेही माझे—संपादक त्या-ह्याचे
म्हणूं लागले "भले ! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें !

या अंकाचा चालू तक्ता (फर्मा) होत नाहिं भरपूर
कामाचा खोळंबा झाला द्या कांहीं 'मजकूर'.

वसंत-अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल
परंतु झटदिशिं करा, नातरी काम उगिच लांबेल.

सरासरी द्या खरडुनि ओळी अठरापासुनि वीस"
ऐकिलें न हें तों कवनाची झाली स्फूर्ति कवीस.

झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनी ध्यानीं.

वसंतकाळीं त्या वर्णाया वनांतुनी माघारीं
गोविंदाग्रज कवीश्वराची घरीं परतली स्वारी.

**गोविंदाग्रज**

# खालीं आणि वर

[दोन चित्रें]


"लहानपण दे गा देवा
  मुंगी साखरेचा रवा !

ऐरावत रत्न थोर
  त्यासि अंकुशाचा मार !"

.१.

उंच पाटी पालथी उशाखालीं
हात दोन्हीही आडवे कपाळीं;
फरसबंदीची शेज गार गार
शांत घोरत पसरला वर मजूर.

मार्गि होता चालला खडखडाट
आणि लोकांचा रुक्ष गजबजाट;



वरी झगझगता बिजलिचा उजेड
तरी त्याला लागली झोंप गाढ ! २

घाम निढळावर जरी डंवरलेला
अंगिं कुडताही भिजुनि चिंब झाला;
कुशीवरही एवढा तरि वळेना
दीर्घ सुस्कारा मुखांतुनि निघेना ! ३

धूळ कचरा खालतीं सांचलेला;
तसा थुंक्यांचा सडा सांडलेला;
घाण यावी त्याजला परि कुठून ?
कुठें होतें निद्रेंत त्यास भान ? ४


काम त्याचें संपलें दिवस जातां,
'उद्यां'ची तर त्याजला नसे चिंता;
नसे आतां तो कुणाचा हमाल,
निजे राजासम मोकळा खुशाल ! ५

.२.

सात मजल्यांची पलिकडे हवेली,
दीपश्रृंगारें सुबक सजविलेली;
उंच वरती सज्जांत सौधभागीं
लाल लक्ष्मीचा पहुडला पलंगीं ! ६

परांची वर मउमऊ बिछाईत,
रेशमाच्या गिरद्याहि लुसलुशीत !
शुभ्र पडदे जाळिचे भोंवतालीं
झालरीही लोंबती छताखालीं ! ७

भरे वाळ्याचा चहुंकडे सुगंध,
जळे शेजारीं शामदान मंद;



फिरे पंखा गरगरा कोंपऱ्यांत,
हवा खेळतसे थंडगार आंत ८

झोंप येईना तरी बिचाऱ्याला
कां न लागे डोळ्यास मुळीं डोळा ?
कुशीवरतीं वळतसे मधमधून
आणि सोडितसे श्वास तळमळून ! ९

कुठें गुंगी लागते जरा शांत
तोंच दचकुनि तो बसे उठुनि ताठ !
बघे डोळे फाडून भोंवतालीं
दृष्टि मिटुनी मग पडे पुन्हां खालीं ! १०

दिवस टळलेला बरा त्यास वाटे
'उद्यां' स्मरतां परि ऊर आंत फाटे;
जरी असला भोंवतालीं महाल
तरी चिंतेचा आंत तो हमाल ! ११

**केशवकुमार**

# आकाशांतील घारीस

अमर्याद हा व्योमसिंधू गभीर
मधें चालली घार ही नाव धीर
अशी उंच ही एकटी संचरे कां
पुसाव्या हिला सर्व येथून शंका. १

जगाचा भला थोरला हा पसारा
तुला वाटला काय निःसार सारा
म्हणोनी अम्हां सोडुनी भूमिभागीं
सदा हिंडसी उंच आकाशमार्गीं. २

खरें प्रेम नाहीं, खरा स्नेह नाहीं,
दयालेश माया नसे येथ कांहीं,
असें वाटलें काय बाई तुला गे !
म्हणोनी तुला अंबरीं गोड लागे ? ३

जयानें तुझें प्रेम चोरूनि नेलें,
तुला एकलें खालतीं सोडियेलें,
तया वल्लभा अंबरीं शोधण्यातें,
निघालीस का, सांग बाई ! खरें तें ? ४

गतप्राण झालीं तुझीं काय बाळें,
तुला वाटलें प्राण त्यांचे उडाले,
म्हणोनी पुन्हा त्यांस आणावयाला
नभीं हिंडशी सांग बाई ! कशाला ? ५

जयानें तुझी निर्मिली पक्षिकाया,
दिली अंबरीं शक्ति तूतें उडाया,
तुला जो सदा पोषितो वाढवीतो,
नभीं शोधिसी काय बाई ! विधी तो ? ६

जगा त्रासुनी लोक संन्यास घेती,
घरा सोडुनी वास रानीं करिती,
परी रानही सोडिलें दूर खालीं,
विरक्ती अशी प्राप्त कां सांग झाली ? ७

जगाचा तुला वीट आला कशानें ?
मला गूढ सांगें, तुझ्या संगती ने !
नको येथलें प्रेम खोटें क्षणाचें,
गडे ! दाव जें सत्य, जें शाश्वतीचें ! ८

दत्त

## रानांत एकटेंच पडलेलें फूल

वन सर्व सुगंधित झालें.
मन माझें मोहुन गेलें—किति तरी !

मी सारें वन हुडकीलें,
फुल कोठें नकळे फुललें—मज तरी.
स्वर्गांत
दिव्य वृक्षास
बहर ये खास,
असें कल्पीलें—असें कल्पीलें;
मन माझें मोहुन गेलें—किति तरी !

परि फिरतां फिरतां दिसलें
फुल दगडाआड लपालें—लहानसें

दिसण्यांत
फार तें साधें,
परी आमोदें
जगामधिं पहिलें—जगामधिं पहिलें;
मन माझें मोहुन गेलें—किति तरी !

मी प्रेमें वदलों त्याशीं,
'कां येथें दडुनी बसशी—प्रिय फुला ?
तूं गडे
फुलांची राणी,
तुला गे कोणीं,
रानिं धाडिलें—रानिं लावीलें ?'
मन माझें मोहुन गेलें—किति तरी !

तें लाजत लाजत सुमन
मज म्हणे थोडकें हंसुन ! तेधवां
'निवडिलें
प्रभूनें स्थान
रम्य उद्यान
तेंच मज झालें—तेंच मज झालें.'
मन माझें मोहुन गेलें—किति तरी !

**नारायण वामन टिळक**

# जिऊ

नमुनेदार धनाजी धनीण त्याची बघोनि राजाऊ
ज्याला त्याला वाटे, क्षणभरि त्यांच्याकडे चला जाऊं.

तीं एकजीव दोघें असुनि असे त्यांस दूसरा जीव,
कन्या 'जिऊ' म्हणोनी; तत्प्रेमालय-रसाल राजीव !

गोधूमवर्ण तीचा हरणाच्या पाडसापरी डोळे,
स्नेहाळ वदन नामी, प्रसन्न विधुबिंब जेविं वाटोळें.

तो केशपाश काळा, भाळावरि लांब आडवें कुंकूं,
जणुं म्हणति शब्द तीचे आम्ही कोकिलरवासही जिंकूं.

घेती पाटिल साड्या हौसेच्या रेशमी किनारीच्या,
ऐनेदार खडीच्या झळकति चोळ्या तया कुमारीच्या.

साधींच कंकणें तीं, कदा तदाकार नागमोडीचे,
शोभति शुद्ध रुप्याचे तयांवरी गोल गोठ जोडीचे.

येतां सुदिन सणाचा पुतळ्यांची माळ ती गळां घाली;
तेव्हां शृंगाराच्या माहित नव्हत्या नव्या तऱ्हा चाली.

जाई आईसंगें मळ्यांत किंवा खळ्यांत ही कन्या
साधी निसर्गसुंदर दिसे तदा देवता जणों वन्या !

अपवादास्पद जितकी रूपवती गुणवतीहि ती तितकी,
बहुधा गुणरूपांचें व्यस्तचि दिसतें प्रमाण मूर्तित कीं !

कांतीव सूत ऐशा येत तिला शेवया वळायाला,
ह्या फेण्या ! म्हणुनि तिच्या लोकभ्रम कुरडयांवरी झाला.

लावोनि गुळवणी वा पुरण करी सार ती मजेदार;
ऐसें कीं तें सेवुनि हुशार व्हावा मनुष्य बेजार.

गुलगुलित मलमलीपरि करी झराझर कशा पुरणपोळ्या,
काढुनि सुंदर कशिदा तिनें शिवाव्याहि रेखिल्या चोळ्या
ती निंदणी, खुरपणी, जाणे बारीक काम शेतीचें,
केवळ राजाऊचें वळण जसें उतरलें तसें तीचें.

चंद्रशेखर

## इरलेवाली

वेडिंवाकडीं घेउन वळणें
नागिण धांवे जणु रोषानें
वाफा टाकित धापांपरि ही गाडी धडधडते

वरतीं भिडली घन घनमाला
धूम धांवते दिग्भागाला
रथचक्रांच्या घरघरीपरी गगनीं गडगडतें

कड्यांकड्यांवर गार चारिवर
झडून राहे सरीवरी सर
जिकडे तिकडे जलधारा ही सारखि खळखळते

बांधावरतीं ऐशा वेळीं
नाजुक बाला काळिसांवळी
हादरणारें शिरिंचें इरलें धरण्या धडपडते

वेष तिचा तो सुंदर साधा
लपवुन गोंडस ठुसका बांधा
दावी यौवनकांती किति ती अंगीं मुसमुसते

"आज ना जरी धांवुन येतिल

लावणि कसची शेतीं होइल
सासुसासरा उपाशि देवा," ऐशी पुटपुटते

हातिं रोप परि गाडी निरखुनि
बघते अपुलें आलें का कुणि
दिसतां, लज्जालहरी शरिरीं निमिषीं थरथरते

प्रेमदृश्य हें बघण्या चोरुनि
गुपचिप वाहे नदि इंद्रायणि
स्वभालिं न असें भाग्य म्हणुनि का मनिं ही हळहळते !

**वा० गो० मायदेव**

# चंद्रकांत राजाची कन्या

["यादवराया भाई यारे," या चालीवर.]

चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूपखाणी ॥
पतिव्रता सद्गुणी शहाणी पतिही वाखाणी ॥ १ ॥

आनंदानं नांदत असतां संचित ओढवलं ॥
कुणी पाप्यानं त्या रायाचं मन दूषित केलं ॥ २ ॥

दूतांकरवीं कांहिं मिषानं रथिं घालुनि तिजला ॥
घोर काननीं एकलि सोडुनि दूत परत गेला ॥ ३ ॥

गाईपरि हंबरडा फोडी वक्षःस्थळ बडवी ॥
अति शोकाच्या वेगें वनिंचे पशुपक्षी रडवी ॥ ४ ॥

सर्वसाक्ष परमेशा ऐसं काय पाप केलं ॥
नवनीतासम मन पतिचं तें निष्ठुर कां झालं ॥ ५ ॥

कधीं भंगिली नाहीं आज्ञा नाहिं चुकलि सेवा ॥
या हृदयीं मीं नित्य पूजिली मूर्ति तीच देवा ॥ ६ ॥

स्वप्नींही कधिं ढळली नाहीं प्रीति तयावरची ॥
मर्जी पाहुनि वागत होतें बटिक जशी घरची ॥ ७ ॥

असो कुणाला देउं दोष मी दैव जसं माझं ॥
तैसं वाहिन वनीं राहुनी प्राणाचं ओझं ॥ ८ ॥

श्री जगदंबे हात जोडितें राख सुखी पतिला ॥
आयुष्यहि दे या पापिणीचं –

गोविंद बल्लाळ देवल



# अ आ ई !

[चाल : नागपंचमीच्या गाण्यासारखी]

मोत्या शीक रे अ आ ई !
सांगु कितीतरि बाई !

दादा आई म्हणताती,
अ आ इ ई कठिण किती;
तुजला कधीं न येइल ती.
म्हणुं दे कोणी कांही
मोत्या, शीक रे अ आ ई ! १

यू यू ये ये जवळ कसा,
गुपचुप येथें बैस असा.
ऐक ध्यान दे शीक तसा;
धडा पहिला घेई
मोत्या, शीक रे अ आ ई ! २

म्हणतां तुजला येत नसे,
शिकविन तुज येईल तसें;
अ आ इ ई भुंक कसें,

कां रे भुंकत नाही ?
मोत्या, शीक रे अ आ ई !    ३

दत्त

## माझी बाहुली

लहान माझी बाहुली
मोठी तिची सांवली

घारे डोळे फिरविते
लुकूलुकू ही पहाते

नकटें नाक उडवीते
गुबरे गाल फुगवीते

दांत कांही घासत नाहीं
अंग कांहीं धूत नाहीं

भात केला, करपुन गेला !
पोळ्या केल्या, कच्च्या झाल्या !

वरण केलें, पातळ झालें
तूप सगळें सांडून गेलें

असे भुकेले नक्का जाऊं
थांबा करतें गोड खाऊ

केळीचें शिकरण करायला गेली
दोनच पडले दांत
आडाचें पाणी काढायला गेली
धपकन् पडली आंत !

# नीतिशतकांतील वेंचे

[भुजंगप्रयात]

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें;
न जाणे न नेणे अशा पामराला
बुझावूं शकेना विधाता तयाला. ॥ १ ॥

[शिखरिणी]

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे,
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे, ॥
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी;
परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ २ ॥

[शार्दूलविक्रीडीत]

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो,
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें छेदावया पाहतो, ॥
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो,
जो मूर्खास सुभाषितें वश करूं, ऐसें झणीं बोलतो. ॥ ३ ॥

[उपजाति]

निंदोत वानोत सुनीतिमंत
चळो असो वा कमला गृहांत, ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं
सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥ ४ ॥

[शिखरिणी]

विपत्काळीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे, ॥

सुकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्या-व्यसन जें,
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा, सत्पुरुष जे. ॥ ५ ॥

न चोराला लाधे, प्रकट न दिसे, दे सुख सदा,
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेशहि कदा, ॥
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असें,
असे ज्याचें, त्याशीं प्रतिभटति ते पामर पिसे. ॥ ६ ॥

[**शालिनी**]

जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा
संपत्तीचा त्यांपुढे काय तोरा ?
पद्माचा जो तंतु, तो वारणाला
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला ! ॥ ७ ॥

संपत्काळीं कोंवळें सज्जनाचें
होतें चित्त ज्ञाति पंकेरुहाचे;
आपत्काळी शैलही आदळो कां
धाकेना जें गाजवी धैर्य-डंका. ॥ ८ ॥

[**उपजाति**]

आली जरी कष्टदशा अपार,
न टाकिती धैर्य तथापि थोर;
केला जरी पोत बळेंचि खालें
ज्वाला तरी ते वरतीं उफाळे ! ॥ ९ ॥

[**वसंततिलका**]

जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच,
जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच, ॥
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी तो;
हा लाभ पूर्व-सुकृताविण काय होतो ? ॥ १० ॥

**वामन पंडित**

# माझी कन्या

गाइ पाण्यावर काय म्हणुनि आल्या ?
कां ग गंगायमुनाहि या मिळाल्या ?
उभय पितरांच्या चित्त-चोरटीला
कोण माझ्या बोललें गोरटीला ?

उष्ण वारे वाहती नासिकांत,
गुलाबाला सुकविती काश्मिरांत,
नंदनांतिल हलविती वल्लरींला,
कोण माझ्या बोललें छबेलीला ?

शुभ्र नक्षत्रें चंद्र चांदण्यांची
दूड रचलेली चिमुकली मण्यांची
गडे ! भूईवर पडे गडबडून,
कां ग आला उत्पात हा घडून ?

विभा-विमला आपटे-प्रधानांच्या
अन्य कन्या श्रीमान कुलीनांच्या
गौर चैत्रींची तशा सजुनि येती,
रेशमाचीं पोलकीं छिटें लेती.

तुला 'लंकेच्या पार्वती'समान
पाहुनीयां, होवोनि साभिमान
काय त्यांतिल बोलली एक कोण
'अहा ! – आली ही पहा – भिकारीण !

मुली असती शाळेंतल्या चटोर;
एकमेकींला बोलती कठोर;
काय बाई ! चित्तांत धरायाचे
शहाण्यानें ते शब्द वेडप्यांचे ?

रत्न सोनें मातींत जन्म घेतें,
राजराजेश्वर निज शिरीं धरी तें;
कमळ होतें पंकांत, तरी येते
वसंतश्री सत्कार करायातें.

पंकसंपर्कें कमळ का भिकारी ?
धूलिसंसर्गें रत्न का भिकारी ?
सूत्रसंगें सुमहार का भिकारी ?
कशी तूंही मग मजमुळें भिकारी !

बालसरिता विधु वल्लरी समान
नशीबाची चढतीच तव कमान;
नारि-रत्नें नरवीर असामान्य
याच येती उदयास मुलांतून.

भेट गंगायमुनांस होय जेथें
सरस्वतिही असणार सहज तेथें;
रूपसद्गुणसंगमीं तुझ्या तैसें,
भाग्य निश्चित असणार तें अपैसें.

नेत्रगोलांतुन बालकिरण येती,
नाच तेजाचा तव मुखीं करीती;
पाच माणिक आणखीं हिरा मोतीं
गडे ! नेत्रां तव लव न तुळों येती.

लाट उसळोनी जळीं खळें व्हावें,
त्यांत चंद्राचें चांदणें पडावें;
तसें गालीं हासतां तुझ्या व्हावें,
उचंबळुनी लावण्य वर वहावें !

गौर कृष्णादिक वर्ण आणि त्यांच्या
छटा पातळ कोंवळ्या सम वयाच्या

सवें घेउनि तनुवरी अद्भुताचा
खेळ चाले लघु रंगदेवतेचा !

काय येथें भूषणें भूषवावें,
विविध वसनें वा अधिक शोभवावें ?
दानसीमा हो जेथ निसर्गाची,
काय महती त्या स्थलीं कृत्रिमाची !

खरें सारें ! पण मूळ महामाया
आदिपुरुषाची कामरूप जाया
पहा नवलाई तिच्या आवडीची
सृष्टिश्रृंगारें नित्य नटायाची.

त्याच हौसेंतुन जगद्रूप लेणें
प्राप्त झालें जीवांस थोर पुण्यें;
विश्वभूषण सौंदर्य-लालसा ही
असे मूळांतचि, आज नवी नाहीं !

नारि मायेचें रूप हें प्रसिद्ध,
सोस लेण्यांचा त्यास जन्मसिद्ध;
तोच बीजांकुर धरी तुझा हेतू,
विलासाची होशील मोगरी तूं !

तपःसिद्धीचा 'समय' तपस्व्याचा,
'भोग' भाग्याचा कुणा सभाग्याचा;
पुण्यवंताचा 'स्वर्ग' कीं कुणाचा,
'मुकुट' कीर्तीचा कुण्या गुणिजनाचा.

'यशःश्री' वा ही कुणा महात्म्याची,
'धार' कोण्या रणधीर कट्यारीची;
दिवसमासें घडवीतसे विधाता
तुला पाहुनि वाटतें असें चित्ता !

तुला घेइन पोलकें मखमलीचें,
कुडीं मोत्यांचीं, फूल सुवर्णाचें;
हौस बाई ! पुरवीन तुझी सारी,
परी आवरिं हा प्रलय महाभारी !

ढगें मळकट झांकोनि चंद्रिकेला,
तिच्या केलें उद्विग्न चांदण्याला;
हास्यलहरींनीं फोडुनी कपाट
प्रकाशाचे वाहवीं शुद्ध पाट !


प्राण ज्यांचेवर गुंतले सदाचे,
कोड किंचित् पुरवितां न ये त्यांचें;
तदा बापाचें हृदय कसें होतें,
नये वदतां, अनुभवी जाणती तें !

माज धनिकाचा पडे फिका साचा,
असा माझा अभिमान गरीबाचा !
प्राप्त होतां परि हे असे प्रसंग
हृदय होतें हदरोनिया दुभंग !

देव देतो सद्गुणी बालकांना
काय म्हणुनी आम्हांस करंट्यांना ?
लांब त्याच्या गांवास जाउनीयां
गूढ घेतों हें त्यास पुसोनीयां !

"गांविं जातों," ऐकतां त्याच कालीं
पार बदलुनि ती बालसृष्टि गेली !
गळां घालुनि करपाश रेशमाचा
वदे "येतें मी" पोर अज्ञ वाचा !

बी



# मुद्रिका

"मुद्रिके सखे ! तूं होतिस रामापाशीं
सोडिलेस त्वां श्रीराम कुठें वनवासी ?

भ्रमतात वनामधिं व्याघ्रसिंह अणि लासी !
रक्षियलें कीं वनिं भक्षियलें राक्षसीं ?

त्या कंचुकिसाठीं राम फिरे लवलाहीं !
मजपासुनि गेले तसे देखिले नाहीं !"

जानकी शोक करि, "वनीं मुद्रिके बाई !
सोडिलेस त्वां श्रीराम कोणत्या ठायीं ?

मुद्रिके सखे ! तूं आलिस कोण्या गुणीं ?
ना पंख तुला ! आणियलें तुजला कोणीं ?

कां बोलशि ना तरि ? काय वर्तलें चिन्ह ?
वनफला जाति श्रीराम आणि लक्ष्मण !

जरि तृष्णा लागे फार मला उष्माने,
वनिं जाउनि करिती जीव शांत जिवनानें !

चालतां वनामधिं कंटक रुतती पायीं,
तैं राघवनेत्रीं अश्रुप्रवाहीं वाही !

मुद्रिके सखे ! जैं वनीं चाललों तीघें,
चालवे न मजला बहुत त्यांसवें वेगें;

अंतरेन म्हणुनी, राम बघतसे मागें,
'या कर्मभवानें सीते ! न भरूं रागें !'

मजवीण तयाला न गमे क्षणभर कांहीं !
करि 'सीता ! सीता ! असे कुठें वैदेही ?'''

वृक्षावर होता अंजनिचा तो पुत्र
हा शोक ऐकतां, स्रवति कपीचे नेत्र !

मग उडी टाकितां पुढें कपी कुलगोत्र,
''तूं दास कुणाचा ? सांग रघुपती कुत्र ?''

# फुलपांखरूं

[अंजनीगीत]

जेथें हिरवळ फार विलसते,
लताद्रुमांची शोभा दिसते,
तेथें फुलपाखरूं पहा हें—
सुंदर बागडतें !

कलिकांवरुनी, पुष्पांवरुनी,
गंधयुक्त अवकाशामधुनी,
पुष्पपरागा सेवित हिंडे—
मोदभरेंकरुनी !

तरल कल्पना जशी कवीची,
सुन्दर विषयांवरुनी साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे—
फूलपांखराची !

वा मुग्धेची जैशी वृत्ति
पतिसहवासस्वप्नावरती
विचरे, फुलपांखराची तशी—
हालचालही ती !

निर्वंधपणे इकडे तिकडे
वनश्रींतुनी अहा ! बागडे;
त्याचा हेवा हृदयीं उपजुनी—
मन होई वेडें !

तिमिरीं आम्हीं नित्य रखडणें,
विवंचनांतचि जिणें कंठणें,
पुष्पपतंगस्थिति ही कोठुनि—
आम्हांला मिळणें !

असे यास का चिन्ता कांही ?
यास 'उद्यां'चा विचार नाहीं,
अकालींच जो आम्हां न्याया—
मृत्युमुखीं पाही !

बहु सौख्याची कुसुमित सृष्टि,
तींत वसे हें, न कधीं कष्टी,
ग्रीष्माचें खर रूप विलोकी—
नच याची दृष्टि !

'सर्व विनाशी असती प्राणी,'
ही मज खोटी वाटे वाणी;
फूलपांखरूंमरण पाहिलें—
आहे का कोणीं ?

[वसंततिलका]

जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे;
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें;
गातों म्हणून कवनीं फुलपांखरातें,
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें.

**केशवसुत**

# शिवराज्याभिषेक

स्थलदेवींनों ! जलदेवींनों ! आज चला जाऊं –
रायगडावर, शिवप्रभूला जयगीतें गाऊं ! १

किर्र रान हें दऱ्यादऱ्यांतुनि जंगल घनदाट,
निर्झरिणींचे नित्य यांतुनी झुळझुळती पाट; २

हे झुळझुळत्या निर्झरिणींचे मंजुळ रसरंग,
यांतच मिसळा ते तुमचे हळुवार हृत्तरंग ! ३

त्या गीतांनीं या गीतांनीं एकरूप व्हावें,
शिवदेवाच्या जयघोषानें वन हें निनदावें ! ४

मधुरमाधवस्पर्शानें या फुलल्या फुलवेली,
मरंदलोलुप भृंगसंघ हा झुलतो भंवतालीं, ५

वाऱ्यांनीं हीं वृक्षवरांचीं सळसळती पानें !
सृष्टिसतीचीं हेलावति जणुं मुग्ध तरल गानें ! ६

शिवरायाचें वैभव पाहुनि हृष्ट फार झाली,
अश्रुबिंदु हे निशादेविचे टपटपले खालीं; ७

दंवबिंदूंनीं खुलली विपिनश्री गाते गीतें,
मंदवायुच्या हिंदोळ्यावर आंदोलन घेते ! ८

निशादेविचा उषादेविचा सरुनि लपंडाव,
स्थिरचर उजळित पुढें येतसे पहा सूर्यदेव. ९

परमेशाचे पढियंते हे भाट गाति यांतें,
नितान्तमंजुळ नवलपरीचीं दिव्य उषःसूक्तें ! १०

त्या नादांतुनि मिसळुनि अपुले रम्य गीतनाद,
जडाजडांतुनि आनंदाचे खुलवा पडसाद ! ११

वनराजीला आनंदानें प्रेमानें डुलवा !
शिवदेवाचीं वैभवगीतें वाऱ्यावरि फुलवा ! १२

जगन्मंगले ! भवानि माते ! आज तुवां यावें,
आनंदानें या राजाला अभयदान द्यावें ! १३

तीर्थक्षेत्रें, धर्मक्षेत्रें होउनि उध्वस्त,
स्वातंत्र्यासह झाला धर्मस्फूर्तीचा अस्त; १४

दास्यतमिस्त्रग्रस्त राष्ट्र या प्रतिपच्चंद्रानें,
पुनरुज्जीवित केलें पसरुनि आशेचीं किरणें ! १५

वैभव या प्रतिपच्चंद्राचें पूर्णत्वा गेलें,
यशःप्रकर्षें याच्या उज्ज्वल राष्ट्रतेज झालें ! १६

तुझ्या कृपेनें आज तपस्या सफल सर्व झाली !
महाराष्ट्रभू स्वातंत्र्याचें हें लेणें ल्याली. १७

तुझ्या प्रसादें स्वातंत्र्योदय आज पुन्हां झाला,
धर्मोद्धारक, राष्ट्रोद्धारक नृप हा अवतरला ! १८

तुझा तूंच हा वाढविं राजा प्रेमानें आई !
अभयदान या तव राजाला तूंच आज देई ! १९

तुझ्या कृपेनें पावो अक्षय पुण्याची बढती !
ही सत्याची, स्वातंत्र्याची चंद्रकला चढती ! २०

ग० त्र्यं० माडखोलकर

# आजारीपण


[चाल : भक्ति ग वेणी]

पडुं आजारी । मौज हीच वाटे भारी ॥ ध्रु० ॥

नकोच जाणें मग शाळेला,
काम कुणी सांगेल न मजला,
मउ मउ गादी निजावयाला,
चैनच सारी । मौज हीच वाटे भारी ॥ १ ॥

मिळेल सांजा, साबूदाणा,
खडिसाखर, मनुका, बेदाणा,
संत्रीं, साखरलिंबू आणा;
जा बाजारीं, । मौज हीच वाटे भारी ॥ २ ॥

भवतीं भावंडांचा मेळा,
दंगा थोडा जरि कुणिं केला,
मी कावुनि सांगेन तयाला,
'जा बाहेरी.' । मौज हीच वाटे भारी ॥ ३ ॥



कामें करतिल सारे माझीं,
झटतिल ठेवाया मज राजी,
बसेल गोष्टी सांगत आजी,
मज शेजारीं। मौज हीच वाटे भारी ! ॥ ४ ॥

असलें आजारीपण गोड
असूनि कण्हती कां जन मूढ ?
हें मजला उकलेना गूढ—
म्हणुन विचारीं। मौज हीच वाटे भारी ॥ ५ ॥

भानुदास

कृष्णाजी विनायक पोटे

## या बाळांनों

[जाति अचलगति]

या बाळांनों, या रे या
लवकर भरभर सारे या !
मजा करा रे ! मजा मजा !
आज दिवस तुमचा समजा.
स्वस्थ बसे
तोचि फसे,
वनभूमी
दाविन मी,
या नगराला लागुनियां
सुंदर ती दुसरी दुनिया.
या बाळांनों ! या रे या
लवकर भरभर सारे या ! १

खळखळ मंजुळ गाति झरे;
गीत मधुर चहुंबाजुं भरे,
जिकडे तिकडे फुलें फळें,
सुवास पसरे, रसहि गळे.
पर ज्यांचे
सोन्याचे
ते रावे
हेरावे
तर मग कामें टाकुनियां
नवी बघा या ही दुनिया !
या बाळांनों या रे या
लवकर भरभर सारे या ! २

पंख पाचुचे मोरांना,
टिपति पाखरें मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना,
चपलगती
हरिण किती !
देखावे
देखावे
तर मग लवकर धांवुनिया
नवी बघा या ही दुनिया
या बाळांनों, या रे या
लवकर भरभर सारे या ! ३

**भा० रा० तांबे**

## बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास –

थाब जरासा बाळ !

सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंज्याच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पांखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं बसलीं ठाणीं,

खरें असे रे ! तरी नको रे मारुं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !

पाहुनि सौख्याचा हा ठेवा !
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं ! भुलशिल तूं लडिवाळ !
थांब जरासा बाळ !

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं,
रंगीबेरंगी हीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं;
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग ?
थांब जरासा बाळ !

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा !
उडवुनि नेइल तुला भरारा !
दिगंतराला, जातां बाळा ! पुन्हां कसा मिळणार ?
थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाडुनि वेड्या धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें !
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस !
थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडुन तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्यां साथी,
क्षणांत बा रे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !
थांब जरासा बाळ !

ग्रंथ संग्रहालय २६०२ २६९५८ ग्राह्य २।३।९०

फूलपांखरें हीं स्वच्छंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !
थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां ? लाडक्या सांग !
थांब जरासा बाळ !

शब्दावांचुनि मंजुळ गाणें,
अर्थ तयाचा देवचि जाणे !
गाइन माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि, या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार !
थांब जरासा बाळ !

बालरवीचे किरण कोवळे,
कारंज्यावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी जाशिल बाळा खास !
थांब जरासा बाळ !

जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार !
थांब जरासा बाळ !

**गोविंदाग्रज**

# माझी ताई

[चाल : जन हे दोष जयां म्हणती]

ताइ, तूं फूल गडे माझें, ताइ तूं नक्षत्रचि माझें !

ताइ, तूं रत्न गडे माझें !
ताइ, तूं पाखरुं गे माझें !
या सर्वांहून गोड गोड गे शील रूप तूझें
यांची उपमा नच साजे !

फुल हें हंसतें, तूं हंसशी,
परी तव अर्थ किती हास्यीं !
काय फुलाच्या मला पाकळ्या दावितील मौजे
जसे हे ओठ गडे तूझे ?

तूं तर तेजस्वी करिशी
येइल जवळ तुझ्या त्याशीं;
नक्षत्रांचा गण चमके गे हा उसन्या तेजें,
निराळे वैभव तव तें जें !

रत्नें चम चम चम करिती
परी तीं कठिण किती असती;
सांठविलेलें तेज किती तें वाढत नाही जें
वाढतें तेज गडे तूझें !

गाई पांखरुं गानाला
एकविध अर्थ नसे त्याला;
गान तुझें परिसुनी स्वर्गिंचें दूत गानपटु जे
नाचती सुखें, ताइ माझे !

**नारायण वामन टिळक**



# खार

[चाल : दोह्यासारखी]

लहान सुंदर गोजिरवाणी दिसे कशी ही खार
गुलगुलीत हें अंग मजेचें शेपुट गोंडेदार. १

लहान डोळे लुकलुक बघती, दृष्टि किती तरि छान !
खुटकन कोठें सहज वाजलें, तरिहि ऐकती कान २

उभें करोनी शेपुट बैसे ऐटीमध्यें फार
मालकीण ही जणुं रानाची दिसे अशी ही खार. ३

सरसर सरसर पळत जातसे रस्त्यांतुनि ही पार
भरभर भरभर तरुवरि चढते, शेंड्यावर ही स्वार ! ४

चळवळ चळवळ सदा करी, क्षणभर नाही स्थीर
स्वस्थ बसाया जरा तरी, कुठला इजला धीर ? ५

क्षणांत बसते शांत जणों, चित्र मजेचें छान.
क्षणांत पळते कशी पहा, उभारोनि ही कान. ६

दिवसभरी ही वनांत फिरते, फळें जमविते गोड
गोड गोड बहु खाण्याची हिज आहे भारी खोड.

काम करी ही आनंदानें, मधेंच खेळे खेळ
दवडी नच ही मुळीं कधींही फुकट आपुला वेळ.

किती खिळाडू गमतीची, सुंदर भारी खार.
तुझ्या गुणांला, रूपाला नसे गडे गे पार. ९

भारी अचपळ जरि असशी, गरीब तरी तूं फार.
येइन भेटायास वनीं तुजला वारंवार. १०

म० का० कारखानीस

## उठा उठा चिऊताई

उठा उठा चिऊताई
सारीकडे उजाडलें
डोळे तरी मिटलेले
अजूनही !

सोनेरी हे दूत आले
घरट्याच्या दारापाशीं
डोळ्यांवर झोप कशी
अजूनही !

लगबग पांखरें ही
गात गात गोड गाणें
टिपतात बघा दाणे
चोहींकडे !

झोपलेल्या अशा तुम्ही
आणायचें मग कोणी
बाळासाठीं चारा पाणी
चिमुकल्या ?

बाळाचें नी घेतां नांव
जागी झाली चिऊताई
उठोनिया दूर जाई
भूर भूर.

**कुसुमाग्रज**

# जाईचीं फुलें

[कवि आपल्या मित्राच्या भेटीस गेला असतां त्यानें त्याचा
जाईच्या फुलांनीं सत्कार केला त्या प्रसंगास उद्देशून.]

स्वागत केलें माझें, सन्मित्रा, त्वां फुलांस देऊन
झाला मोद मनाला प्रेमें त्यांचा सुगंध सेवून. ॥ १ ॥

जीं 'दारचीं' फुलें त्वां अपुल्या मज आणुनी दिलीं सुमनें
होता पुंज गुणांचा नव्हतीं तीं सत्य जाइची सुमनें. ॥ २ ॥

कारण त्या पुष्पांनीं कथिलें भाषा स्वकीय बोलून,
''वरिवरि हुंगुनि आम्हां वेड्या देऊं नकोस फेंकून. ॥ ३ ॥

जे गुण असती साधे हितकर अंगांत आमुच्या चार
घे शिकुनी, त्यां योगें स्वर्गाचेंही खुलें तुला द्वार. ॥ ४ ॥

जैसा परिमल अमुचा टाकी सज्जनमनास मोहून
तव कीर्तीचा परिमल जग मोहू दशदिशीं दणाणून. ॥ ५ ॥

आहे जगांत अमुचें निर्मल अतिशुभ्र सर्वदा रूप
तैसें तुझें असावें वर्तन त्या नच शिवो कधीं पाप. ॥ ६ ॥

आम्ही कोमल तैसें हृदय असावें तुझें सदा साच
कोमेजावें त्यानें दीनांचा पाहुनी जगीं जाच. ॥ ७ ॥

रूप मनोहर अमुचें दिसतें परि तें नसे रहायाचें
जग हें असार सारें जें दिसतें तें अखेर जायाचें.'' ॥ ८ ॥

इतुकें बोलुनि थकलीं, सुकलीं, मुकलीं स्वकीय तेजातें
जाईचीं दिव्य फुलें असलीं फेंकील कोण हो हातें ! ॥ ९ ॥

तीं धन्य रम्य कुसुमें, मित्रा, तूं धन्य सत्य त्यांहून
मी धन्य धन्य कां कीं माझ्या तीं पावलीं करीं निधन. ॥ १० ॥

माधवानुज

# सासरची पाठवणी

[शार्दूलविक्रीडित]

आलें मूळ म्हणोनियां प्रथम जैं कन्या निघे सासरीं;
माता घालुनि भूषणें म्हणतसे सांभाळ तोडे सरी;
भाला कुंकुम लावुनी फळ नवें ओटीमधें घातलें,
बाला सद्गद होय अश्रुजलही गालांवरी पातलें ॥ १ ॥

[मंदाक्रांता]

'आई येते' हळुच वदली, शब्द कांहीं फुटेना,
मातृप्रेमा मृदुतरमना यत्न केल्या सुटेना;
मातेलाही गहिंवर फुटे कंठ आला भरून,
स्नेहें सांगे मधुर वचनें घट्ट पोटीं धरून ॥ २ ॥

[शिखरिणी]

नको वाटूं देऊ तिळभर मुली वाइट मना,
नको कष्टी होऊं उशिर बहु होईल गमना
तुला संक्रांतीला अणविन बये ! मी झडकरी
पुशीं बाळे डोळे किमपि हृदयीं दुःख न करीं ॥ ३ ॥

तुझी सासू साध्वी बहु सदय गे फार सरळ,
सुदैवानें लाभे जगतिवर जी जोड विरळ;
सदा 'लक्ष्मी लक्ष्मी' म्हणुनि तुजला कौतुक करी
धरीं प्रेमा तूंही मजसम सुखानें तिजवरी ॥ ४ ॥

[शार्दूलविक्रीडित]

मर्यादा धरणें स्वकार्य करणें साधेपणें वागणें,
'द्या द्या वस्तु' म्हणोनियां नच कधीं कोणासही मागणें;

जें पानावरतीं पडेल समयीं नेमस्त तें भक्षणें,
हीं लोकप्रिय व्हावयास बरवीं आहेत गे लक्षणें ॥ ५ ॥

[स्रग्धरा]

सर्वांआधीं उठावें स्मरण धरुनियां, मागुनी त्वां निजावें,
वस्त्रां पात्रां जपावें कधिं नच पुसल्यावीण बाहेर जावें;
कामीं काजीं श्रमावें अळस करुनियां त्वां न कोठें गमावें;
सद्ग्रंथानें रमावें शयनिं पडुडतां श्रीहरीतें नमावें ॥ ६ ॥

[शार्दूलविक्रीडित]

हर्षें काम करीत जा झडकरी होईल जें जें तुला,
सासूच्या घरच्या धरूनि ममता सांभाळ साऱ्या मुलां;
येतां झोंप तयांस नीट निजवीं गाणीं मुखें गाउनी,
किंवा घेउनि खेळवीं कटिवरी सद्वस्तुतें दाउनी ॥ ७ ॥

[भुजंगप्रयात]

सकाळीं मुली काढुनी केरवारे, गृहा सारवोनी करीं स्वच्छ सारें;
फुलें स्वस्तिकें रांगुळीचीं लिहावीं, अशीं कीं जनें कौतुकें तीं पहावीं ॥ ८ ॥
[illegible] चांगली राख वृंदावनाची, जया पाहतां तृप्ति व्हावी मनाची
फुटो[illegible] तरू येत जेव्हां बहार, फुलें वेंचुनी गुंफ तूं लांब हार ॥ ९ ॥

[इंद्रवज्रा]

वेणी बरी घालुनियां सकाळीं, अत्यादरें कुंकुम लाव भाळीं;
मोठें नसावें टिकली नसावी, लोकांमधें सज्जनता दिसावी ॥ १० ॥

[स्रग्धरा]

पक्वान्नें शाकभाज्या रुचिकर चटण्या रायतीं भात नाना,
कार्यप्रस्थीं करोनी बहुत चतुरता दाखवावी जनांना;

## सासरची पाठवणी

[शार्दूलविक्रीडित]

आलें मूळ म्हणोनियां प्रथम जैं कन्या निघे सासरीं;
माता घालुनि भूषणें म्हणतसे सांभाळ तोडे सरी;
भाला कुंकुम लावुनी फळ नवें ओटीमधें घातलें,
बाला सद्गद होय अश्रुजलही गालांवरी पातलें ॥ १ ॥

[मंदाक्रांता]

'आई येते' हळुच वदली, शब्द कांहीं फुटेना,
मातृप्रेमा मृदुतरमना यत्न केल्या सुटेना;
मातेलाही गहिंवर फुटे कंठ आला भरून,
स्नेहें सांगे मधुर वचनें घट्ट पोटीं धरून ॥ २ ॥

[शिखरिणी]

नको वाटूं देऊ तिळभर मुली वाइट मना,
नको कष्टी होऊं उशिर बहु होईल गमना
तुला संक्रांतीला अणविन बये ! मी झडकरी
पुशीं बाळे डोळे किमपि हृदयीं दुःख न करीं ॥ ३ ॥

तुझी सासू साध्वी बहु सदय गे फार सरळ,
सुदैवानें लाभे जगतिवर जी जोड विरळ;
सदा 'लक्ष्मी लक्ष्मी' म्हणुनि तुजला कौतुक करी
धरीं प्रेमा तूंही मजसम सुखानें तिजवरी ॥ ४ ॥

[शार्दूलविक्रीडित]

मर्यादा धरणें स्वकार्य करणें साधेपणें वागणें,
'द्या द्या वस्तु' म्हणोनियां नच कधीं कोणासही मागणें;

जें पानावरतीं पडेल समयीं नेमस्त तें भक्षणें,
हीं लोकप्रिय व्हावयास बरवीं आहेत गे लक्षणें ।। ५ ।।

[स्रग्धरा]

सर्वांआधीं उठावें स्मरण धरुनियां, मागुनी त्वां निजावें,
वस्त्रां पात्रां जपावें कधिं नच पुसल्यावीण बाहेर जावें;
कामीं काजीं श्रमावें अळस करुनियां त्वां न कोठें गमावें;
सद्ग्रंथानें रमावें शयनिं पडुडतां श्रीहरीतें नमावें ।। ६ ।।

[शार्दूलविक्रीडित]

हर्षें काम करीत जा झडकरी होईल जें जें तुला,
सासूच्या घरच्या धरूनि ममता सांभाळ साऱ्या मुलां;
येतां झोंप तयांस नीट निजवीं गाणीं मुखें गाउनी,
किंवा घेउनि खेळवीं कटिवरी सद्वस्तुतें दाउनी ।। ७ ।।

[भुजंगप्रयात]

सकाळीं मुली काढुनी केरवारे, गृहा सारवोनी करीं स्वच्छ सारें;
फुलें स्वस्तिकें रांगुळीचीं लिहावीं, अशीं कीं जनें कौतुकें तीं पहावीं ।। ८ ।।
निगा चांगली राख वृंदावनाची, जया पाहतां तृप्ति व्हावी मनाची
फुटोनी तरू येत जेव्हां बहार, फुलें वेंचुनी गुंफ तूं लांब हार ।। ९ ।।

[इंद्रवज्रा]

वेणी बरी घालुनियां सकाळीं, अत्यादरें कुंकुम लाव भाळीं;
मोठें नसावें टिकली नसावी, लोकांमधें सज्जनता दिसावी ।। १० ।।

[स्रग्धरा]

पक्वान्नें शाकभाज्या रुचिकर चटण्या रायतीं भात नाना,
कार्यप्रस्थीं करोनी बहुत चतुरता दाखवावी जनांना;

टोप्या कुंच्या शिवाव्या परकर अवघीं सारुनी नित्य कामें,
द्यावा सद्‌बोध बालां, कधिंच बसुं नये बायकांनी रिकामें ॥ ११ ॥
सांगाव्या भूपतींच्या अति सुरस कथा शूरशा राउतांच्या,
खोट्या गोष्टी न सांगें भयजनक अशा राक्षसांच्या भुतांच्या;
नीतीचें सार घेईं निवडुनि बरवें दुग्ध जैसा मराळ,
एरंडाचें, नको गें निजमुख शिणवूं, गाळुनीयां गुऱ्हाळ ॥ १२ ॥

[भुजंगप्रयात]

नको फार हव्यास गे भूषणांचा,
धरीं लोभ चित्तीं सदा सद्‌गुणांचा;
पती-शुश्रुषा बोलणें नम्रवाचे,
अलंकार हे जाण तूं बायकांचे ॥ १३ ॥

कृष्णाजी नारायण आठल्ये

## मी तुझी मावशी तुला न्यावया आलें

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे !
तूं उभी ? लागले कुठें कुठें तव डोळे ?

ही गाडी वाजे खड खड खड खड दूर,
हें इकडे उडतें धड धड तवही ऊर !



तूं प्रसन्न आतां, क्षणें खिन्न तूं होशी,
मेघांत गवसला चंद्रच दुसरा दिसशी !
    तूं अल्लड साधी पोर ! लाडके,
    गुरुजनें कल्पिली थोर ! लाडके,
    तुज कशास हा संसार ? लाडके,
हा दोन दिवस तरि टळो म्हणोनी झालें
मन अधीर गेलें माहेरा तव गेलें !

माहेरीं आपण भाउबिजेला जाऊं,
येतील न्यावया बाबा अथवा भाऊ,
हें प्रौढपणाचें ओझें फेंकुन देऊं
सुचतील तेवढे खेळ खेळुनी घेऊं
    ही मनांत तुझिया बाई ! वासना
    मीं ओळखिलें का नाहीं ? सांग ना ?
    भर बघूं पुन्हा अश्रूंहीं ! लोचना
ये हासत आतां आलिंगीं मज बाळे !
मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !

लक्ष्मीबाई टिळक

# मराठी ग्रंथकारांस प्रार्थना

[गीती]

म्हणतात जे 'मराठी भाषा होणार ही असे नष्ट;
मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट ?' ॥ १ ॥

त्यांना हेंच पुसा कीं 'मरणोन्मुख होय आपली माय,
म्हणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय ? ॥ २ ॥

माता, तशी स्वभाषा, सेवाया होय आपणां उचित;
किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित. ॥ ३ ॥

दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ;
मातेशिवाय जन्महि जाय, न भाषेशिवाय एक पळ. ॥ ४ ॥

रक्षी म्हणूं, तरी ती बाल्यापुरतीच काळजी वाहे;
आबालवृद्ध-रक्षण-कार्यीं ही दक्ष सारखी राहे. ॥ ५ ॥

उपकार थोर ऐसे नित्य जिचे आपणांवरी होती,
हो कां दीन, कधीं नच योग्य उपेक्षावया तरी हो ! ती. ॥ ६ ॥

ह्यास्तव ज्या कोणां ह्या निजभाषेचा असेल अभिमान,
देवोत सादरें मम विनतिकडे ग्रंथकार ते कान. ॥ ७ ॥

ज्यांच्या पराक्रमांचीं आनंदें गातसां तुम्ही गाणीं,
त्या शूर पूर्वजांची तुमच्या ही चालली लया वाणी. ॥ ८ ॥

त्यांचें तुमचेंहि तुम्हां राखायाचें असेल नांव तरी
द्या हात हीस द्या हो ! पुण्याचें श्रेय घ्यावया पदरीं. ॥ ९ ॥

कोणी साह्य करो वा न करो, कर्तव्य होय जें कर्म,
केलेंच पाहिजे तें; श्रेयस्कर हाच आपणां धर्म. ॥ १० ॥

यास्तव विद्वज्जन हो, उघडा उघडा स्वबुद्धिभांडारें;
अज्ञानध्वांत हरा, नाना ग्रंथ-प्रकाशन-द्वारें. ॥ ११ ॥

न म्हणा 'रसिकचि नुरले'; दैवाचा जाहल्यामुळें कोप,
आहे संप्रति त्यांना, बांधव हो, गाढ लागली झोंप. ॥ १२ ॥

रजनीभ्रम तो त्यांचा नाहीं निःशेष पावला नाशा;
तोंवरि चीज गुणांचें तुमच्या होईल ही नसे आशा. ॥ १३ ॥

ग्रंथप्रकाश करितां ह्यास्तव अगदीं सरूं नका मागें;
म्हणजे उजाडलें हें जाणुनि होतील तेच हो जागे. ॥ १४ ॥

ते जाहल्यास जागे, सदभिरुचीलाहि जागवायास
पडतात आज, तैसे न तुम्हां पडतील फार आयास. ॥ १५ ॥

सदभिरुचीच्या योगें पावुनियां नित्य योग्य संस्कारा,
राहील शुद्ध होउनि जनमत, त्याचा झडोनि मळ सारा. ॥ १६ ॥

मग जो तुम्हां जनाश्रय न मिळे म्हणुनी तुम्ही असां खिन्न
सेवा करावयाला तुमची लागेल तो अविच्छिन्न. ॥१७॥

क्षयरोगमुक्त अंतीं तुमची होऊन देशभाषा ही,
तुमच्या भव्य यशानें भरुनी टाकील हो दिशा दाही. ॥१८॥

**गंगाधर रामचंद्र मोगरे**

# गुराख्याचें गाणें

[जाति समुदितमदना]

कुरणावरतीं वडाखालतीं गाइ वळत बैसतों
स्फटिकापरि निर्मळ हा खळखळ झरा जवळ वाहतो. ॥ ध्रु० ॥

पांवा फुंकुनि मंजुळ नादें रान भरुनि टाकितों,
आनंदानें डोळे भरतां प्रभुजीला प्रार्थितों.
गाईमागें रानोमाळीं शीळ भरित हिंडतों,
दऱ्यादऱ्यांतुनि रान-ओहळावरी मौज मारितों.
उन्हाची भीती कवणाला ?
पाउस काय करिल मजला ?
भितों मी कोठें थंडीला ?
श्रीमंतापरि गरिबा कोठें वारा तो दुखवितो ?
देवाजीवरि सदा हवाला टाकुनि मी राहतों. ॥ १ ॥

तृषा लागतां नीर झऱ्याचें ओंजळिनें मी पितों,
क्षुधा लागतां कांदाभाकर यथेच्छ मी जेवितों.
फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों,
काठीनें मी काटे दाबुनि बोरेंही तोडितों.
धनिका ताट रुप्याचें जरी,
पांचहि पक्वान्नें त्यावरी,
नाहीं गोडि मुखाला परी.
गाईसंगें हिंडुनि रानीं थकुनि सुखें जेवितों,
जाडें भरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों. ॥ २ ॥

पुच्छ उभारुनि थवा गाइंचा ज्या वेळीं नाचतो,
मोरमुगुटबन्सीवाल्यापरि उभा मौज पाहतों.
ओहळावरी थवा तयांचा पाणी जेव्हां पितो,
उभा राहुनी प्रेमें त्यांना शीळ अहा घालितों !

कशाला मंदिल मज भरजरी ?
घोंगडी अवडे काळी शिरीं,
दंड करिं गाइ राखण्या, परी
कुवासना घालिति धिंगा तो महाल मी टाकितों
गाईसंगें हवेंत ताज्या नित्यचि मी राहतों. ॥ ३ ॥

क्रोध, काम, मद, मत्सर यांही गांव सदा गर्जतो
दूर टाकुनी त्यांस शांतिनें सुखें दिवस लोटितों.
समाधान हा परिस अहा ! मज रानांतचि लाभतो,
दुःखाच्या लोहास लावितां सुखसोनें बनवितो.
चढल्या पडावयाची भिती;
गरिबा अहंकृती काय ती ?
काय करि त्यांचें खोटी स्तुती ?
परवशतेच्या बिड्या रुप्याच्या पायांत न बांधितों,
निज हृदयाचा धनी धरणिचें धनित्व अवमानितों. ॥ ४ ॥

**भा० रा० तांबे**

## कोळ्याचें गाणें

आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर,
होडिला देइ ना ठरूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

हिरवं हिरवं पाचूवाणी जळ,
सफेत् फेसाची वर खळबळ,
माशावाणी काळजाची तळ्‌मळ
माझि होडी समिंदर, ओढी खालींवर,

पाण्यावर देइ ना ठरूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

तांबडं फुटे आभाळांतरीं,
रक्तावाणी चमक् पाण्यावरी;
तुझ्या गालावर तसं काइ तरी !
झाला खुळा समिंदर, नाजुक् होडीवर,
लाटांचा धिंगा सुरू,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

सूर्यनारायण हंसतो वरी,
सोनं पिकलं दाहिदिशांतरीं,
आणि माझ्याहि नवख्या उरीं !
आला हंसत् समिंदर, डुलत फेसावर,
होडीशीं गोष्ट करूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

गोऱ्या भाळीं तुझ्या लाल् चिरी,
हिरव्या साडीला लालभडक धारी;
उरीं कसली ग, गोड शिरशिरी ?
खुशी झाला समिंदर, त्याच्या उरावर,
चाले होडी भुरुभुरू,
ग सजणे, वाऱ्यावर जणुं पांखरूं !

अनंत काणेकर

## शबर्याख्यान

निघे दंडका राम कोदंडपाणी;
सवें चालिली जानकी कीरवाणी; ।
क़राया वनीं स्वामिसेवा, स्वभावें
सवें चालिला लक्ष्मण स्वानुभावें. ॥ १ ॥

त्वरित चरणचाली चालिला घोर रानीं,
दृढतर मनिं भावें पूर्ण ज्याची शिराणी; ।
प्रतिदिवस दिनांसीं पावती ते श्रमांसी;
ऋषिवर मग त्यांसी आणिती आश्रमासी ॥ २ ॥

तीघें यापरि चंडदंडकवनीं स्वच्छंदशीं हिंडती,
तों तेथें शबरी अखंड विचरे, पापें तिची खंडती ।
वाचे राघवनाम संतत जपे, तें ध्यानही अंतरीं;
वांछी दर्शनलाभ होइल कधीं ? शोधी अरण्यांतरीं ॥ ३ ॥

आला राम वना म्हणोनि ललना ऐकोनि आनंदली,
"मी वंदीन पदारविंद" म्हणुनी जातां पथीं मंदली,
"माझा राम असेल तो क्षुधितसा चंडांशुच्या आतपें,
त्यातें मी दृढ चित्तिं ठेविन बरा, ज्याकारणें हीं तपें" ॥ ४ ॥

ज्या वनीं करिति झिंकृत झिल्ली,
दाट तें हुडकि कानन भिल्ली; ।
जेथ वृक्ष बहु पक्व फळांचे,
प्रांत तेथ फिरती अबलांचे ॥ ५ ॥

मोठ्या श्रमें वळघुनी सफळा तरूतें,
तोडी फळें, वदनिं गात जगद्गुरूतें,
ओटीं भरी, चतुर ते उतरोनि भूमी,
भेटी निघे, "नयनिं पाहिन तो विभू मी" ॥ ६ ॥

दाही दिशां देउनियां निरीक्षा,
मार्गी फळांची करि ते परीक्षा; ।
चाखी मुखें, गोड कडू कळाया,
टोंचूनि दांतें रसही कळाया ।। ७ ।।

कट्वम्ल त्याचि रसहीन फळास टाकी,
लागे मधू सरस तें वसनांत झांकी; ।
आली वना निकट उत्तम भिल्लिणी ते,
जेथें जगज्जनक लक्ष्मण जानकी ते ।। ८ ।।

ज्याच्या मस्तकिं दीर्घ नूतन जटा, फेटा दिसे टोप तो,
माजीं वेष्टित वल्कलें झळकती, दूजा म्हणे कोण तो ? ।
आश्चर्या अति पावली, बघुनियां तूणीर पाठीवरी,
राजीवाक्ष असा विलोकुनि, वधू धांवे जशी बावरी ।। ९ ।।



देखोनि डोळां हृदयाभिरामा
रामापुढें धांवतसे सुकामा ।
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया,
साष्टांग वंदी रघुराजपायां ॥ १० ॥

रामांघ्रि वंदुन नमी, न उठेच कांहीं,
रामें करांबुजयुगें उचलोनि बाहीं, ।
आलिंगिली स्वहृदयीं शबरी बरी ते;
आनंदले अमर भाविती बावरी ते ॥ ११ ॥

"बहू दीससी राघवा तूं भुकेला;
तुवां पाहिजे बा ! फलाहार केला; ।
तुझ्या कारणें म्यां फळें गोड रामा !
अगा ! आणिलीं सेविं सीताभिरामा !" ॥ १२ ॥

सारीं क्षतांकित फळें निरखून डोळां,
"कां हो ! अशीं ?" तिस पुसे रघुराज भोळा ।
"चंचूपुटेंच बहु चोखिलिं पांखरांनीं,
नेणों दिला प्रतिफळास नखांक रानीं" ॥ १३ ॥

"चंचुक्षतें हीं नव्हती कृपाळा!
मी कां तशीं आणिन ? हा कपाळा !
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें,
चाखूनि घें मीच करें तुम्हांतें ॥ १४ ॥

मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी,
मग मज रघुनाथा ! ठेवितां होय खोडीं;"
निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा,
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा ॥ १५ ॥

भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे, रामाकरीं तीं फळें
घाली, नेणुनि शास्त्रषिद्ध पुरुषा उच्छिष्ट देतां बळें,

प्रेमें प्रेमभरें, प्रसन्नहृदयें, भक्ताजनांचा पिता,
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पिता.॥ १६ ॥

भिल्लिच्या वनफळें मन धालें,
लोकनायक म्हणे "सुख झालें."।
प्रेम रामहृदयीं बहु आलें,
तोयबाष्प नयनांत निघालें. ॥ १७ ॥

रामचंद्र विभु आचरणासी
लक्षुनी, विनटली चरणासी; ।
वंदितां बहु सुखेंच, वधू ते
बाष्पकेंकरुनि ते पद धूते ॥ १८ ॥

आलिंगिली पुनरपि प्रमदा किराती,
जे अंतरीं सतत चिंतित दीसराती; ।
जोडूनि अंजलि नमी, स्तवितां तियेतें
"मागें" म्हणे वरद, "जें स्वमनास ये तें" ॥ १९ ॥

"माझें मनोगत वियोग तुझा न व्हावा,
रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा !"
स्वामी म्हणे, "तुज वियोग कधीं न वाटे,
जा, शेवटीं मिळसि चिन्मयराजवाटे" ॥ २० ॥

देतां असे वर तिसी रघुनायकानें, ।
झाली कृतार्थ शबरी, परिसोनि कानें, ।
आलिंगुनी, मग तिथें निघती वनातें
आनंदनंदन म्हणे "परिसा" जनांतें ॥ २१ ॥

आनंदतनय

[चेंडू चार पाच वेळ उंच फेकल्याझाल्यानंतर.]

जमिनिवरी ।

घेइ उशी ।

हपटुं तरी ॥

उंच कशी ॥

हपटूं हपटूं खूप, तरी ।

उसळुनि उडतां झेलुं वरी ॥

वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । सुंदर किति तरि खचित अहा ! ॥

**मिस मेरी भोर**

## प्रियकर हिंदिस्तान

प्रियकर हिंदिस्तान
अमुचा प्रियकर हिंदिस्तान
हा अलंकार हो भूगोलाचा । यास नसे उपमान ॥ १ ॥

सर्व सुखाची खाण
अमुच्या सर्व सुखाची खाण
हें अभिमानाचें, सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान ॥ २ ॥

हे जन्मभूमि, हें तनमनधन घे तुला
हें फिटणें साध्य न आम्हां अति दुर्बलां
तव उपकारांना न मिळे कोठें तुला
सुखकर तव गे ध्यान
जो जननीचा, जो जनकाचा, तोच तुझाही मान ॥ ३ ॥

**नारायण वामन टिळक**

# चेंडू

[प्रथमतः कांही मुलें एका बाजूनें पुढें येऊन आपल्या हातचा चेंडू दाखवितात व दुसरी मुलें दुसऱ्या बाजूनें समोर येऊन तो पाहून आनंदित होतात. मग दोनही बाजू समोरासमोर उभ्या राहून खेळ सुरू होतो. खेळ चालू असतां खेळांतील कृतींला अनुसरून, एका बाजूची एक ओळ कांही मुलें म्हणतात, व उत्तरादाखल दुसऱ्या बाजूची एक ओळ दुसऱ्या बाजूचीं मुलें म्हणतात.]

| एक बाजू | दुसरी बाजू |
|---|---|
| वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । | सुंदर किति तरि खचित अहा ! ॥ |
| तर तो आपण घेउनियां । | सगळे मिळुनी खेळूं या ॥ ध्रु० ॥ |
| अह्मि फेंकूं । | अह्मि झेलूं । |
| तुह्मि फेंका । | तुह्मि झेला । |
| आतां थोडे दूर सरूं । | हो, हो चेंडुस वाट करूं ॥ |
| वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । | सुंदर किति तरि खचित अहा ! ॥ |

[हें कडवें संपतांच दोनही रांगांच्या मधलें अंतर वाढवायचें.]

| एक बाजू | दुसरी बाजू |
|---|---|
| हं ! आला ! । | हा धरिला ! ॥ |
| परतुनि द्या ! । | घ्या तर घ्या ! ॥ |
| किति तरि वेळां फेकियला । | झेलुनि आह्मीं परत दिला ॥ |
| वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । | सुंदर किति तरि खचित अहा ! ॥ |

[ह्या कडव्यांत वर्णिल्याप्रमाणे दोन चार वेळां चेंडूची फेकझेल झाल्यानंतर.]

| एक बाजू | दुसरी बाजू |
|---|---|
| तर आतां । | काय ह्मणतां ? ॥ |
| सावध का ? । | हो फेका ॥ |
| फेकूं आतां खुप वरतीं । | झेलूं सहजचि तरि हातीं ॥ |
| वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । | सुंदर किति तरि खचित अहा ! ॥ |

[चेंडू चार पाच वेळ उंच फेकल्याझेलल्यानंतर.]

जमिनिवरी । हपटुं तरी ॥
घेइ उशी । उंच कशी ॥

हपटूं हपटूं खूप, तरी । उसळुनि उडतां झेलुं वरी ॥
वाहवा ! वाहवा ! चेंडू हा । सुंदर किति तरि खचित अहा ! ॥

**मिस मेरी भोर**

## प्रियकर हिंदिस्तान

प्रियकर हिंदिस्तान
अमुचा प्रियकर हिंदिस्तान
हा अलंकार हो भूगोलाचा । यास नसे उपमान ॥ १ ॥

सर्व सुखाची खाण
अमुच्या सर्व सुखाची खाण
हें अभिमानाचें, सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान ॥ २ ॥

हे जन्मभूमि, हें तनमनधन घे तुला
हें फिटणें साध्य न आम्हां अति दुर्बलां
तव उपकारांना न मिळे कोठें तुला
सुखकर तव गे ध्यान
जो जननीचा, जो जनकाचा, तोच तुझाही मान ॥ ३ ॥

**नारायण वामन टिळक**

# नवीन भाऊ

[छंद : चंद्रकांत]

"बघूं आई, कुठें माझा नवीन भाऊ
काळोखांत कुठें येऊं, कुठें मी पाहूं ?"
"समईची वात थोडी करितें पुढें,
ही आहें मी, समोर ये माझें छबुडें !"

"आळशी हा अजूनहि कसा निजला ?
आंघोळीला उठविती मात्र मजला.
शेगडीची ऊब याला, झोपे सारखा,
जागवाया गुदगुली याला करूं का ?

किलकिल्या डोळ्यांनी हा कुठ बघतो ?
बघ मला बघून हा कसा हसतो !
देऊं याला सांज्यांतून थोडासा खाऊ ?
दे ग माझ्या मांडीवर धाकला भाऊ !

कां नको ग ? चुरूचुरू तान्हुला पितो,
बाजेवर पांघरुणामध्यें झोपतो.
गाल किती मऊ, खाती का ग हे साय ?
नाकावर दिला काय म्हशीने पाय ?

गाजराच्या सारखा हा तांबडा छान
होतों का ग मीहि असा लाल लहान ?
तारा पडला सोनेरी दाखवी माई
म्हणे असा घरीं आला आपुला भाई.

जसा कवडसा पडे छपरांतून
अलगत येई तसा बाळ वरून;

बाजेवर आई त्याला झेलून घेई,
माखूं न्हाऊं घाली मग प्यायला देई."

"नाहीं बाळ ! गुलाबाला आपुल्या फूल
येई तसें रात्रीं घरीं सोनुलें मूल.
परसांतल्या पेरूला ये जसें फळ
तसें भेटे आईलाहि सानुलें बाळ.

भूक जशी लागूनहि नच दिसते
हृदयांत बाळ तसें माझें असतें.
आईसारखें तें होई म्हणूनी बाळ –
मग देव साऱ्यांचाच करी सांभाळ."

"चिडविते ताईटली कां मग मला ?
म्हणे, चंतकोरावारी तुला घेतला."
"नको ऐकूं ताईचें तूं जा आतां खेळ
या बाळाची झोपायची झाली रे वेळ."

माधव जूलियन

# फत्तर आणि फुलें

होता डोंगरपायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षें कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तैशींच कोमेजत !

थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां;
"धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा !"
संतापून तयांस फत्तर म्हणे "कां हीं वृथा बोलणीं ?
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी !"

धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळाठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया.
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सले तें फत्तराचें वच;
गेली तोंडकळा सुकून, पडलीं तीं पांढरीं फारच !

कोणी त्या स्थळिं शिल्पकार मग तों ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहींतरी दिव्यता;
त्याची दिव्यकलाकरांगुलि न जों त्या फत्तरा लागली,
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !

वेडा पीर असाच गुंगत कुणी एकाकि ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !
त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरा पायीं तिच्या वाहिलीं,
तों, त्यांची फुलुनी कळी खदखदां सारीं हसूं लागलीं !

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत,
पुष्पेंही बसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत !

**केशवकुमार**

# माधुकरी

गरिब बिचारा माधुकरी, दुःख तयाला जन्मभरी ॥ध्रु०॥

कडक उन्हानें जीव घाबरे, कपोल सुकले घर्में भिजले
पायीं चटके तापे डोकें, धांपा टाकीत पळे जरी १

बुरबुर लागे पाउसधारा, चिखल माखला अंगीं सारा
घट्ट तपेली, झोळी धरिली, धांवत जातो घरोघरीं ! २

भणभण झोंबे वारा अंगा, बधीर गात्रें पायीं भेगा
हात कांपती, दांत वाजती, कुडकुडतो हा घडी घडी ! ३



# फत्तर आणि फुलें

होता डोंगरपायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षे कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तैशींच कोमेजत !

थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां;
''धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा !''
संतापून तयांस फत्तर म्हणे ''कां हीं वृथा बोलणीं ?
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी !''

धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळाठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया.
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सले तें फत्तराचें वच;
गेली तोंडकळा सुकून, पडलीं तीं पांढरीं फारच !

कोणी त्या स्थळिं शिल्पकार मग तों ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहींतरी दिव्यता;
त्याची दिव्यकलाकरांगुलि न जों त्या फत्तरा लागली,
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !

वेडा पीर असाच गुंगत कुणी एकाकि ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !
त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरा पायीं तिच्या वाहिलीं,
तों, त्यांची फुलुनी कळी खदखदां सारीं हसूं लागलीं !

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत,
पुष्पेंही बसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत !

**केशवकुमार**


# माधुकरी

गरिब बिचारा माधुकरी, दुःख तयाला जन्मभरी ॥ध्रु०॥

कडक उन्हानें जीव घाबरे, कपोल सुकले घर्मे भिजले
पायीं चटके तापे डोकें, धांपा टाकीत पळे जरी १

बुरबुर लागे पाउसधारा, चिखल माखला अंगीं सारा
घट्ट तपेली, झोळी धरिली, धांवत जातो घरोघरीं ! २

भणभण झोंबे वारा अंगा, बधीर गात्रें पायीं भेगा
हात कांपती, दांत वाजती, कुडकुडतो हा घडी घडी ! ३



विटक्या अपुऱ्या मुकट्यावांचुनि, वस्त्र दुपारीं अंगीं कोठुनि
ही धार्मिकता लोकांकरितां, नित्य सोशितो कष्ट जरी ! ४

सण आनंदी घरोघरीं जरि, नित्य कपाळीं सुटे न वारी
शिळी बुरसली, खवट आंबली, भोक्ता वस्तुस मिळे परी ! ५

'उशीर' कोठें कुठें 'संपलें' ! मिळे कालवण भाग्य उदेलें
नांवा धरिली करीं तपेली, अश्रू तोंडीं, घांस गिळी ! ६

झोळी थोडिहि अजुनि न भरली, शाळेची तर घंटा झाली
मुख हिरमुसलें, घांस कोंबले; दप्तर घेउनि पळे जरी ! ७

शिळें त्यांतलें रात्रींकरितां, निजे उपाशी अपुरें पडतां
कुणा कळवळा येई बोला, दुःख तयाचें अणूपरी ! ८

नंबर गेला एक खालतीं, जाइल नादारी ही भीती
सांजसकाळीं अभ्यासच करि, फुरसत खेळा कुठें तरी ! ९

गोसावी, भट, धन्य भिकारी. तेलंग्याचें भाग्य कितीतरि
पैसा दूरच, पुस्तक धोतर, जुनें न्हावया नसे घरीं ! १०

निजे कुणाच्या ओटींवरतीं, अर्धें धोतर खालीं वरतीं
एकच सदरा तोच उशाला; दया न येते जगा परी ! ११

यजमानाला पलंग गिरदी, आंत उकडतें खुपते गादी
पोटीं धरुनी पाय जुळवुनी, कुडकुडतो हा रात्रभरी ! १२

पुण्यांत आला अभ्यासाला, पदोपदीं जग अडवी त्याला
विद्या करितो, हाल सोशितो, शूर नव्हे का खरोखरी !
गरिब बिचारा माधुकरी ? १३

**श्रीधर बाळकृष्ण रानडे**

# रायबा

जाडेंभरडें धोतर अंगीं कुडतें साधें एक
डोक्यावरती लाल पागुटें दिसतें काय सुरेख !
पायीं जोडा, हातीं काठी, देह कसा भरदार !
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

काया शिणली फार उन्हानें झाली कडक दुपार
थोडथोडकें अंतर नाहीं, कोस तेथुनी चार !
बुधवाराच्या दिवशीं त्यांच्या गांवाचा बाजार
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

पाणी नाहीं कुठें मिळालें, होती खडतर वाट
सुरकुतल्या तोंडावर वाहति घर्मजळाचे पाट
हंगामाचे दिवस, मिळाया गाडी मारामार
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

आठवड्याचें आणायाचें बुधवारीं सामान
गावकऱ्यांच्या भेटीगांठी, कामें दुसरीं आन
आणि गड्यांचा टाकायाचा देउन आज पगार
तरी रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

"लई गुणाचा पांडू माझा मन लावी लिहिण्यांत
खेड्यावरती आला नाहीं आठदहा दिवसांत."
तळमळतें मन म्हाताऱ्याचें इथें जीवनाधार,
म्हणुनि रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

शिणली काया तरी मुखावर आनंदाचा भाव
म्हाताऱ्याची किती खरोखर पोरावरती माव !
पाहतील ते डोळे भरुनी अपुल्या पांडोबास
मुखीं घालुनी तन्मातेनें दिधला प्रेमळ घास.

कुरवाळोनी त्यास विचारुन देतिल खर्चायास
आणि रायबा संध्याकाळीं जातिल मग खेड्यास.

**गोपीनाथ**

## घर

[जाति—उद्धव. अंतरा व मेळ
'नृपममतें' तील]

''लइ मानस अमुचा, द्यावी आपल्या घरीं ही पोर
पर शंका येउन कांहीं घेतें हें मन माघार !
पोरिला हौस मोत्यांची ती तुम्ही कशी पुरवाल ?
हा हेत पडावी कीं ती ज्या घरीं माणकं लाल.
बोलतों
असूं द्या माफि
करा दिलसाफि
असावें चोख व्यवहार तरी बिनधोक !''

''ठेवतां न पोटीं किंतु पुसलेंत – लई आवडलें !
धनदौलत घ्या देखून कांहींच नाहिं लपलेलें
पडवीला कणगी पोतीं मोती त्यामधिं बिनमोल
दावणीस गायी बैल त्ये अम्हां हिरे अन् लाल.
दरसाल
पिकें येतात
खाण शेतांत
तीच सोन्याची''
बसलीच गांठ जन्माची.

**यशवंत**

## गोदागौरव

[चाल : 'दो दिवसांची तनु' इ० फटक्याची]

तुज हृदयंगम रवें विहंगम-भाट सकाळीं आळविती,
तरु तीरींचे तुजवरि वल्ली पल्लवचामर चाळविती;
तुझ्या प्रवाहीं कुंकुम वाही बालरवी जणुं अरुणकरीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ १ ॥

अवयव थिजले, शरीर भिजलें, उठले रोम तृणांकुरसे,
सद्‌गद कंठीं बुद्‌बुद करितें वचन घटोन्मुख नीर जसें;
अधर थरारे, अश्रुमलिनमुख हो मतिसंकर मदन्तरीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ २ ॥

मधुमासामधिं मधुर हवा ती, स्पर्श मधुर तव मधुर चवी,
सायंप्रातः सेवियली ती साखर वानिल केविं कवी ?
किति कितिदां तरि तरंग तुझिये अवलोकियले म्यां नवलें !
अभिनव तनुला जलकुंभ्यासम तवावगाहन मानवलें. ॥ ३ ॥

अस्तोन्मुख रवि कुंकुम, केशर, चंदन वाहुनियां तुजला,
वसंतपूजा करितां तूझी तासावरुनि दिसे मजला;
करिती झुळझुळ विंझणवारे या समयीं तुज त्या झुळकी,
संध्या करितां रमवि तुझें हें दर्शन देवि ! सुमंजुळ कीं ! ॥ ४ ॥

गंगे ! येतां ग्रीष्म दिनान्तीं पवनहि तव जलकेलि करी,
जे रवितेजो-ग्रहणें करपति, ते कर चंद्र तुझ्यांत धरी;
मासे तळपति, तरंग झळकति, तुषार चमकति, जेविं हिरे !
या समयाला रूप तुझें हें दिसतें रम्य किती गहिरें ! ॥ ५ ॥

लंघुनि तट जें प्रावृट्‌कालीं सैरावैरा धांवतसे,
तवौदार्य तें असीम होउनि सलील वाहे सलिल नसे;

तल्लीलेमधिं तल्लीन न हो कल्लोलिनि ! कवि कवण तरी ?
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ ६ ॥

वरि घन वरसति धो, धो, इकडे महापुराच्या घनगजरीं
''कृष्ण कृष्ण'' जन, ''झन् चक् झन् चक्'' टाळ, मृदंगहि दंग करी
अभंग-गंगा जणुं शतधा ही वाहुनि मिसळे त्वदंतरीं,
जय् संजीवनि जननि श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ ७ ॥

परिसर जलमय, वनकुसुमांनीं झांकुनि जाती **कुंप,** वया,
उभय तटींचीं हिरवीं, चित्रित, शेतें डोलति ज्या समया,
तव तृण धान्यें, सुमनें, सुफलें, सुचविति चंगळ हीं अगदी !
गंगथडीचें रंगुनि राहे मंगलरूपचि भाद्रपदीं. ॥ ८ ॥

सायंकालीं स्फटिकविमल तव गंगे ! जल नहि वानवतें
या समयाला सुधाकराचें वैभव त्यांतुनि कालवतें;
नयनमनोरम तरंगतांडव रसरूपी शिव करुनि हंसे,
स्वर्गंगेचें प्रतिबिंबचि जणुं गंगा होउनि हें विलसे. ॥ ९ ॥

हिमऋतुमाजीं प्रभातकालीं बाष्प तवौघावर तरतें,
सकरुण वरुणें शाल धवल ते भासे घातलि तुजवरते;
जणुं म्हणुनिच जें सुखोष्ण लागे गे ! मज घे घे त्या उदरीं
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ १० ॥

शिशिरामाजीं गांगहि शिशिरचि, करी हिमाची बरोबरी,
ताप दुजे हिम हरितें परि तें भवतापातें काय करी ?
तया गदावरि गदा बसे ह्या—ह्या अगदाची निरंतरीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥ ११ ॥

**चंद्रशेखर**

# श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोंहिकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे.

वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे !

झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे;
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे.

उठती वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा.

बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरतीं ग्रहगोलचि कीं एकमतें.

फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निज बाळांसह बागडती.

खिल्लारें हीं चरतीं रानीं, गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें

सुवर्णचंपक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला;
पारिजातही बघतां भामा-रोष मनींचा मावळला !

सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठीं शुद्धमती
सुंदर बाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडती.

देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत.

**बालकवि ठोमरे**

# फुलपांखरूं

फुलपांखरूं ।
छान किती दिसतें । फुलपांखरूं


या वेलीवर । फुलांबरोबर
गोड किती हसतें । फुलपांखरूं

पंख चिमुकले । निळेजांभळे
हालवुनी झुलतें । फुलपांखरूं

डोळे बारिक । करिती लुकलुक
गोल मणी जणुं ते । फुलपांखरूं

मी धरुं जाता । येइ न हाता
दूरच तें उडतें । फुलपांखरूं

**गणेश हरी पाटील**



# करुणाष्टकें

[मालिनीवृत्त]

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिन-दयाळा नीरसीं मोह-माया ।।
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ।। १ ।।

भजन-रहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजन-जनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।।
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तुझी धरावी ।। २ ।।

विषय-जनित सूखें सौख्य होणार नाही ।
तुजविण रघुनाथा ओखटें सर्व कांही ।।
रघु-कुळ-टिळका रे हीत माझें करावें ।
दुरित दुरि रहावें म्यां स्व-रूपीं भरावें ।। ३ ।।

तन-मन-धन माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ।।
प्रचळित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचल भजन लीला लागली आस तूझी ।। ४ ।।

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजन-माया तोडितां तोडवेना ।।
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणवुनि करुणा हे बोलतों दीन वाचा ।। ५ ।।

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं
तळमळ निववीं रे राम कारुण्य-सिंधू ।
षड्-रिपु-कुळ माझें तोडिं यांचा दिरोधू ।। ६ ।।

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ।।
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ।। ७ ।।

स्व-जन-जन-धनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ।।
जिवलग जिव घेती प्रेत सांडोनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ।। ८ ।।

रामदास

## कां रे नाठविसी

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जगासी एकला तो ।।
फुटे तरु-वर उष्ण-काळ-मासीं । जीवन तयासी कोण घाली ।।
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ति । वाढवी श्री-पति सवें दोन्हीं ।।
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनी ।।
तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ।।

तुकाराम

# चिमा

[श्लोक : वृत्त : शार्दूलविक्रीडित]

भाग्याचे समयीं मजा उडविली मत्संगतीनें जिनें;
मातें जी न विसंबिली भटकतां पोटार्थ रानेंवनें;
ऐश्वर्यीं व्यसनीं अशी मजसवें जी नांदली सारखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! १

खालीं मान करून संतत उभी लज्जावती जी असे,
रागेजे न कधीं; सदा मजकडे पाहून गालीं हंसे !
नाहीं सोडुन कोपरा सरकली, माझें सदा आयकी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! २

नाहीं माहित डामडौल अगदीं साधीसुधी वागली.
नेसायास दिलें जुनें चिर तरी नाहीं असंतोषली;
ल्याली भूषण एकही न, रिझली सेवून पानें सुकीं,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ३

नाहीं चारजणांसमक्ष तिजला मीं चुंबितां लाजली,
हूं कीं चूं न करी उभी तिज जरी मीं विस्तवें भाजली;
ऐशी भक्ति असे तिची मजवरी ठेवी मला जी सुखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ४

विनायक

# शब्द

[अंजनीगीत]

शब्द बापडे केवळ वारा । अर्थ वागतो मनांत सारा ॥
नीट-नेटका शब्द-पसारा । अर्थाविण पंगू ॥ १ ॥

मनामनांचा संगम झाला । हृदया हृत्संदेश मिळाला ॥
शब्द बोबडा अपुरा पडला । निरुपम घे गोडी ॥ २ ॥

शुद्धाशुद्धाकडे बघावें । वैयाकरणीं शब्द छळावे ॥
शुष्कबंधनीं कां गुंतावें । प्रेमळ हृदयांनीं ? ॥ ३ ॥

व्याकरणाचे नियम कशाला । कोण मानतो साहित्याला ? ॥
उठला जो हृदयास उमाळा । हृदयीं विरमावा ॥ ४ ॥

सुंदर वाक्यें शब्द मनोहर । सरस्वतीचे मंजुळ नूपुर ॥
ऐकायातें हटून अंतर । बसो पंडितांचें ॥ ५ ॥

ममतेचे दो घांस घ्यावया । प्रेमरसाचे घुटके प्याया ॥
उत्कंठित-उत्सुक, त्या हृदयां । काय होय त्यांचें ? ॥ ६ ॥

अशुद्ध वाक्यें शब्द मोडके । अवाच्य अक्षर वर्ण तोटके ॥
गोड असे अमृताचे भुरके । होती प्रीतीनें ॥ ७ ॥

वासुदेव बळवंत पटवर्धन

# आहे मनोहर तरी गमतें उदास

[वसंततिलका]

सर्वांगसुंदर, सुभूषणवस्त्रयुक्त ।
चैतन्य, वाणि, मन, बुद्धिहि ज्या प्रशस्त ॥

ऐसें शरीर, परि शील नसे तयास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ॥ १ ॥

वैडुर्य-आदिकरुनी बहुदिव्यरत्नीं ।
श्रृंगारिलें भवन कीं विविधप्रयत्नीं ।
नाहीं तयांत गृहिणी जरि, तें मनास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ॥ २ ॥

सौंदर्यखाणि, सुनया, विमला, सुशीला ।
विद्याविभूषित गुणी अशि मुग्ध बाला ॥
दैवेंचि हो गतधवा जरि ती जनास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ! ॥ ३ ॥

आम्रादिकीं गगनचुंबित थोर वृक्षीं ।
उद्यान एक भरलें लतिकाविशेषीं ॥
तेथें परंतु न वसंत करी विलास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ॥ ४ ॥

पुष्पें, फलें, खग, मुलें, सुविचारमाला ।
नक्षत्रपंक्ति गगनीं तशिही विशाला ॥
ऐशा मनोहर चमत्कृति पूर्ण खास ।
प्रेमाशिवाय गमतें जगतीं उदास ! ॥ ५ ॥

निद्रेंत मी नृपति होउनि सौख्य भोगीं ।
कीं चित्पदीं मिळुनि जाइं बनोनि जोगी ॥
जेव्हां कळे सकल हा परि स्वप्नभास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ॥ ६ ॥

विद्या, कला, कुशलता बहु जेथ होत्या ।
जैं सृष्टिसुंदरिविलासनिवास होत्या ॥
उत्साहहीन बघतां अजि भारतास ।
आहे मनोहर तरी गमतें उदास ! ॥ ७ ॥

विद्वान् सुशिक्षित समाजधुरीण लोक ।
मोठ्या उदार मतिनें लिहितात लेख ॥
तैशा कृती न करिती, स्थिति ही मनास ।
आहे मनोहर तरी करिते उदास ॥ ८ ॥

**सरस्वतीकंठाभरण**

## दिवाळी, तो आणि मी

दीपांनीं दिपल्या दिशा ! सण असे हा आज दीपावली
हर्षानें दुनिया प्रकाशित दिसे आंत्नि बाहेरुनी !
अंगा चर्चुनि अत्तरें, भरजरी वस्त्रांस लेवूनियां
चंद्रज्योति फटाकडे उडविती आबाल सारे जन.

पुष्पें खोवुनि केशपाशिं करुनी श्रृंगारही मंगल,
भामा सुंदर या अशा प्रियजनां स्नाना मुदें घालिती,
सृष्टी उल्हसिता बघूनि सगळी आनंदलें मानस,
तों हौदावर कोणिसा मज दिसे स्नाना करी एकला;

माता, बंधु, बहीण कोणि नव्हतें प्रेमी तया माणुस;
मी केलें स्मित त्यास पाहुनि तदा तोही जरा हांसला.
एखाद्या थडग्यावरी धवलशीं पुष्पें फुलावीं जशीं,
तैसें हास्य मुखावरी विलसलें त्या बापड्याच्या दिसे !

तो हांसे परि मद्हृदीं भडभडे, चित्ता जडे खिन्नता;
नाचो आणिक बागडो जग, नसे माझ्या जिवा शांतता !

**अनंत काणेकर**

# बाळाची बोली

आई ! आई ! बोलतो कसा हा आई !

म्हणतो 'मं मं' भूक लागतां
'पा पा' करतो पाणि मागतां
म्हणतो 'दू दू' दुधास बघतां
हसतो ही ही ! बोलतो कसा हा आई ! १

तेल माखतां करतो 'तो तो',
न्हाउं घालतां 'बुडु बुडु' म्हणतो
तसाच झोपीं जातां म्हणतो
'गाई गाई' ! बोलतो कसा हा आई ! २

मला पाहतां म्हणतो 'ता ता'
'बा बा' करतो बाबा दिसतां
आणि घोकतो उठतां बसतां,
'याई याई' ! बोलतो कसा हा आई ! ३



यास पाखरें 'चिउ' वा 'काऊ',
'माउ' मांजरी, उंदिर 'बाऊ',
फळें मिठाई खाऊ 'आऊ'
'हम्मा' गाई ! बोलतो कसा हा आई ! ४

'टण् टण्' म्हणतो पायगाडीला
म्हणतो 'पों पों' मोटारीला
आणि बोलतो आगगाडीला
'भप् भप् ई ई' ! बोलतो कसा हा आई ! ५

**भवानीशंकर पंडित**

## तान्हा भाऊ

[द्रुतविलंबित]

''चिमकुला बहु बालक हा असे !
बघुनियां सुख गे मज होतसे.
चरण कोमल तांबुस हे किती !
वदन रम्य दिसे नयनांप्रती ॥ १ ॥

मिटुनियां बहु घट्ट मुठी धरी,
चरण हालवितो वरच्यावरी.
बघतसे टक लावुनियां किती !
बघुनियां सुख होय मनाप्रती. ॥ २ ॥

किति शरीर तरी मृदु लागतें !
भय मला, जननी, बहु वाटतें.
चिमकुला हसतो मज पाहुनी,
संवगड्या, मज जाणसि कीं मनीं ? ॥ ३ ॥

दिपतसे बघतांच उजेड हा,
मिटितसे नयनां, जननी पहा !
फिरविलें मुख कां ? जननी, अगे,
रडतसे, वरतींहि न हा बघे ! ॥ ४ ॥

चिमकुल्या, छकुल्या, न रडें, उगा,
धर करीं चिमणी अथवा फुगा.
जवळ घेउनियां, तुज बैसतें,
चिमकुल्या, कमती वद काय तें. ॥ ५ ॥

शिकविते तुज भूक रडावया ?
रडुं नको, तुज आणिन खावया.
धर करीं बहु सुंदर बाहुली,
सजवुनी स्वकरें, बघ ! आणिली." ॥ ६ ॥

"अजुनि हा, यमुने, बहु नेणता;
सुखद होय पुढें तुज वाढतां.
अजुनि ह्या वदतां न मुळींच ये;
कळतसे न तुझें वदणें, सये ॥ ७ ॥

अजुनि दांत न याप्रति खावया,
न समजे करिं वस्तुहि घ्यावया,
चिमकुला तुजला जरि वाटतो,
पुढतिं होय तुझ्यासम थोर तो." ॥ ८ ॥

**मोरो गणेश लोंढे**

# माझी शाळा

[वृत्त : शिखरिणी]

तुझें जेव्हां जेव्हां सहज मजला दर्शन घडे
स्मृतींचे पूर्वींच्या फलक पुढतीं राहति खडे
हृदीं भारावोनी गुणगुणत मी त्यांत रमतों,
तरंगूनी भावें विनत हृदयें तूज नमतों. १

किती होता तूझा उगम अगदीं सान, नगरीं
जणूं रानांतील स्फटिकधवला निर्मळ झरी
अतां विस्तारें या मन कुतुकुनी येथ खिळतें
नदीच्या सौंदर्यें अतुल सुख नेत्रांस मिळतें. २

तुझीं बाळें, तूझे गुरुवर, तुझे सेवक मला
सदा पूज्य; प्रेमें तुजवर असे जीव जडला
तुझ्या उत्कर्षातें श्रवुनि हृदया येइ भरतें
तुझ्या त्यांच्या गावें सतत पुरुषार्थास गमतें. ३

गुरूचें तूं माझ्या असशि मधुर स्वप्न, सुभगे !
मनःसौंदर्याचा सुखमधुर कीं ताजच बघें
कणांतूनी तुझ्या अतुल दिसते वृत्ति विमला
गमे ठायीं ठायीं गुरुहृदयिंचा भाव रमला. ४

तुला होवो वा न स्मरण मम, माते ! परि मनीं
स्मृती माझ्यासंगें मधुर तव मी नेइन जनीं
तुझी थोरी सर्वां पटवुन सदा देइन मुखें
तवाशीर्वादानें मिळतिल मला आंतरसुखें ५

गिरीश

## आमचें घर

[छंद ओवी]

आमुचें घर छान
शेजारीं वाहे ओढा
कागदी होड्या सोडा
दूर जाती.॥ १ ॥

चतूर नव्हे तर
अभ्रकी पंखांचें तें
विमान उडे तेथें
उन्हामाजी.॥ २ ॥

उथळ वाहे पाणी
नितळ थंडगार
नाचतां त्यांत फार
मौज वाटे.॥ ३ ॥

पाहून अंग ओलें
भरते रागें आई
मागून देई कांही
खाऊ गोड.॥ ४ ॥

आमुचें घर छान
परसूं लांब रुंद
मोगरा जाई कुंद
फुलतात.॥ ५ ॥

खोबरें झेंडूंतील
मागतो सदा बाळ
झेंडूंचा पहा काळ
खोडकर.॥ ६ ॥

अडूळशाचीं फुलें
देठांत थेंब गोड
करितो गोड तोंड
मुलांचें तो.॥ ७ ॥

सोलून कोरफड
पाण्यांत धुतां साफ
बर्फ हो आपोआप
काचेवाणी.॥ ८ ॥

आमुचें घर छान
म्हणती आम्हां द्वाड
करिती परी लाड
बाबा आई.॥ ९ ॥

अंगणीं सारवल्या
खडूनें काढूं शिडी
लंगडी चढोवढी
खेळायला.॥ १० ॥

घरांत जिन्याखालीं
ताईचें घरकूल
खडयांची थंड चूल
पक्वान्नें दे.॥ ११ ॥

भांडून केव्हां केव्हां
म्हणतों जा ! फू गडी !
लागेना परी घडी
एक व्हाया.॥ १२ ॥

आमुचें घर सान
आता तें कोठें गेलें

बाल्याचें हें भुकेलें
मन पुसे ॥ १३ ॥

माधव जूलियन

## कावळा व बगळा

[चाल : नृपममता रामावरती०]

कावळा म्हणे मी काळा ।
पांढरा शुभ्र तो बगळा
दिसतसे ॥ १ ॥

वाहवा तयाची करिती ।
मजलागीं धिक्कारीती ।
लोक हे ॥ २ ॥

मग विचार त्यानें केला ।
पैशाचा साबू अणिला ।
झडकरी ॥ ३ ॥

फासुनी सर्व शरिराला ।
खडकासी घाशित बसला ।
नदिवरी ॥ ४ ॥

घाशिलें अंग बहु बळें ।
रक्त त्यामुळें ।
वाहुं लागलें ।
घाबरा झाला ।
बापुडा शेवटीं मेला ॥ ५ ॥

रा० देव

# हिरवें तळकोंकण

सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण,
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन !

झुळझुळ गाणें मंजुळवाणें गात वाहती झरे,
शिलोच्चयांतुनि झुरुझुरु जेथें गंगाजळ पाझरे;

खेळत खिदळत नद्या चालल्या गुणगंभीराकडे
दरिखोऱ्यांतुनि माणिकमोतीं फुलुनि झांकले खडे;

नील नभीं घन नील बघुनि करि सुमनीं स्वागत कुडा,
गोमेदांच्या नटे फुलांनी बरसातिंत तेरडा !

कडेकपारीं खेळ मारुतासह खेळे हिरवळ,
उधळित सोनें हसे नाचरें बालिश सोनावळ !

शारद समयीं कमलवनाच्या तरत्या शय्येवरी
मदालसा स्वच्छंद लोळती जलदेवी सुंदरी !

कविकाव्यांतुनि, तशी जींतुनी स्त्रवते माध्वी झरी,
आमोदा उधळीत फुलें ती बकुळीची मंजरी;

हिरव्या पिवळ्या मृदुल दलांच्या रम्य गालिच्यावरी
स्वप्नीं गुंगति गोकर्णीचीं फुलें निळीं पांढरीं !

वृक्षांच्या राईत रंगती शकुंत मधु गायनीं
तरंगिणीच्या तटीं डोलती नाग केतकीवनीं !

फूलपांखरांवरुनि विहरती पुष्पवनांतिल परी
प्रसन्नता पसरीत वाजवुनि जादूची पांवरी !

शिताबाइच्या गोड हातचे पोहे जे काननीं
रागानें दे बाइलवेडा कवडा भिरकावुनी,

रोपें त्यांचीं बनुनि पसरलीं नाचत चोहींकडे !



अजुनि पहा या ! मंडित त्यांनीं कोंकणचे हे सडे !

इतिहासाला वार्ता ज्याची श्रुत नाहीं जाहली,
दंतकथांसहि विस्मृति ज्याची होउनियां राहिली,

"झिम्मा खेळे कोंकणचा तो नृपाळ" म्हणती मुली,
गळे वसंतीं टपटप जेव्हां आंब्याची डाहळी !

पिकले आंबे गळुनि भूतळीं रस जोंवरि वाहतो
वनदेवींसह झिम्मा खेळत तोंवरि नृप राहतो

कुठें आढळे फळभाराने लवलेली आंवळी,
कुठें गाळिती भुळभुळ अपुलीं पक्व फळें जांभळी,

कुठें हलवितो पिंपळपानें पिंपळ पारावर,
कुठें वडाच्या पारंबीवर झोंके घे वानर !

कुठें बेहड्यावरि राघूस्तव विरही मैना झुरे,
प्राणविसांवा परत न आला म्हणुनि चित्त बावरे !

मधमाशांचीं लोंबति पोळीं कुठें सात्विणावरी
रंग खेळती कुठें प्रमोदें पांगारे शेवरी !

पोटी साखरगोटे परि धरि कंटक बाहेरुनी
झुले कुठें तो फणस पुरातन रहिवासी कोंकणी.

कोठें चिंचेवर शठ आंबा करि शीतळ सांउली,
म्हणुनि कोपुनी नदीकिनारीं रातंबी राहिली !

निर्झरतीरीं रानजाइच्या फुलल्या कुंजांतुनी
उठे मोहमय संगीताचा अस्फुट कोठें ध्वनी !

कुठें थाट घनदाट कळकिचा त्यांत संचरे कुणी
पुंगि बजावित फंदि मुशाफर दर्यापुर सोडुनी !

कुठें सुरंगी-मुकुलकुलाच्या सस्मित वदनांतुनी
दरवळलेला परिमळ सेवित फिरति अप्सरा वनीं !

कोरांटीचीं, नादवटीचीं, नेवाळीचीं फुलें
फुलुनि कुठें फुलबाग तयांनी अवघे श्रृंगारिले !

नीललोचना कोंकणगौरी घालुनि चैत्रांगणीं
हिंदोळ्यावरि बसविति जेव्हां अंबा शुभदायिनी,

हळदीकुंकू तदा वांटितां नसो प्रसादा उणें,
पिकलीं म्हणुनि रानोरानीं करवंदें तोरणें

औदुंबरतरु अवधूताचा छाया दे शीतळ,
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचें बळ;

बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ,
आइनकिंजळ करिती मांत्रिकमंत्रबळा दुर्बळ !

गडागडावर निवास जेथें माय भवानी करी
राहे उधळित फुलें तिथे खुरचांफा चरणांवरी !

पानफुलाच्या वाहुनि माळा अंजनिच्या नंदना,
तिजवर वरुनी वैधव्याच्या रुइ चुकवी यातना !

चिंव चिंव शब्दा करित निंवावर खार भराभर पळे
भेंडिउंडिणींवरी बैसुनी करकरती कावळे;

लज्जारंजित नवयुवतींच्या कोमल गालांसम

रंगुनि काजू, भरले त्यांनीं गिरि डोंगर दुर्गम !

तिथें मंडलाकार मनोहर नर्तन आरंभुनी,
रुसल्या सखिची घुमत पारवा करितो समजावणी !

विविध सुवासीं हिरवा चांफा चकित करी मानस,
मंद मंद मधु गंध पसरितो भुइचांफा राजस,

हंसे उपवनीं अर्धोन्मीलित सुवर्णचंपककळी,
पाडुनि तुळशीवरी चिमुकली हलती निज सांउली !

पराग पिवळे, धवल पाकळ्या, परिमळ अंबर भरी,
घालित रुंजी भ्रमति भृंग त्या नागचंपकावरी !

सौगंधिक उच्छ्वास सोडिती प्राजक्ताच्या कळ्या,
लाजत लाजत हळुच उघडितां निज नाजुक पाकळ्या

त्या उच्छ्वासां पिउनि बिजेचा चांद हर्षनिर्भरीं
होउनियां बेभान नाचतो निळावंतिच्या घरीं !

धुंद सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन
उभी सैकतीं कोंकणदेवी राखित तळकोंकण;

निकट माजलीं निवडुंगांचीं बेटें कंटकमय,
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिंदे निर्भय,

मागें त्यांच्या डुले नारळी पोफळिचें आगर,
पुढें विराजे निळावंतिचें निळेंच जळमंदिर.

राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित ऐसें नंदनवन
सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण.

**माधव**

# आंदोलन

[चाल : नंदाच्या घरी, आनंद झाला.]

ताई गुणाची माझी छकुली,
''झोंका दे दादा'' म्हणूं लागली;
संभाळ ताई ! फांदी वांकली,
दोहीं दोरांना गच्च आवळीं,
जो जो गे जो जो १

वायुसागरीं आल्या लहरी,
ताई तरंगे नौका त्यांवरी;
कुंतलध्वजा फडफड करी,
पायाचें वल्हें हाण सत्वरीं;
जो जो गे जो जो २

वायुसिंधूला भरती आली,
नौका हालते वरतीं खालीं,
परकर-शिडांची त्रेधा उडाली,
शाबास ताई ! माझी सोनुली;
जो जो गे जो जो ३

देवदयेचें झाड थोरलें,
भक्तिप्रीतीचे दोर बांधले;
मोक्षप्राप्तीचा झोंका हा बाळे !
आनंद देवो तुला वेल्हाळे !
जो जो गे जो जो ४

दत्त

# रायगडावर काय आहे ?

राष्ट्राचा इतिहास पूर्ण करणें कर्तव्य हें आपुलें ।
ज्याच्या निर्मल हृत्पटावर असे हें स्पष्ट रेखाटलें ॥
त्यानें रायगडीं प्रवास करुनी घालावयाला भर ।
त्यामध्यें निजबुद्धिला रमवुनी व्हावें सदा तत्पर ॥

'तेथें काय असे गडावर' असें आणा न चित्तीं कदा ।
'तेथे काय नसे' मनास अपुल्या ऐसें पुसावें सदा ॥
केलें राज्य शिवाजिनें बनवुनी जें वर्णनीय स्थल ।
तेथें काय कमी तयास पडतें सद्बुद्धिचें ज्या बल ॥

येई येथ चरित्रकार तरि तो संजीवनी मेळवी ।
सांगाड्यामधिं चेतना भरुनियां त्यालागिं तो खेळवी ॥
डोळ्यांनी बघतां स्थळें मतिलता घे चारुता ती नवी ।
काळोखांतील वस्तुला नव असें सौंदर्य देतो रवी ॥

आला तो जरि चित्रकार वरती चित्रें जुनीं रंगवी ।
किंवा नूतन योजुनी निजमनीं काढूनिया दाखवी ॥
टोंकाच्या वरुनी निघे हिरकणी धैर्यें तळीं यावया ।
किंवा यत्न करी महार वरती जाण्यास काढी तया ॥

कोणी नाटककार येउनि वरी पाही समाधीप्रती ।
होतां दर्शन निर्मळीं शिवगुणीं रंगेल त्याची मती ॥
श्रृंगारादिक सज्जनप्रिय रसां त्यांच्या चरित्रीं भरी ।
प्रेमें नूतन नाटकांत रचुनी तल्लीन लोकां करी ॥

येथें ये कवि दर्शनास तरी तो चित्तांत दुःखें भरे ।
भग्ना पाहुनियां समाधि जल तन्नेत्रांतुनी पाझरे ! ॥
स्फूर्तीचे फुटतील नूतन गमे वाणीस त्याच्या झरे ।
जैसा पाहुन चंद्रकांत विधुला प्रेमामुळें पाझरे ॥

पूर्वीचा इतिहास रम्य सगळा चित्तांत त्याच्या स्फुरे ।
त्याची लीन मति क्षणीं शिवगुणीं रंगूनियां बावरे ॥
त्याची चित्रचरित्रगायनरसीं वाणी शिवाच्या शिरे ।
चाखाया रस त्यांतला रसिक ते होतील कीं घाबरे ॥

जिज्ञासावश जाल होउन तरी ज्ञानार्थ जोडाल कीं ।
प्रेमानें जरि जाल तेथ भर ती घालाल मोठी सुखी ॥
कर्तव्यास मनीं धराल तरि दे उत्साह तुम्हांप्रती ।
टाका आळस जा वरी बघुनि घ्या नेत्रीं शिवाच्या कृती ॥

**मोरो गणेश लोंढे**

## यापुढें

**[चाल : नृपममता रामावरती]**

कोठचा शिवाजी राजा
निज धर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे,
जयांनी दिलें,
आपुले गळे,
देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें !॥ १ ॥

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !

रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायी धायी—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें
राज्य आपुलें,
असे व्यापिलें
जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें ! ॥ २ ॥

फांकडा शिपाई बाजी,
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें,
स्थापिलें नवें,
राज्य त्या जवें
वाढवी बाजी
सर करील त्याची ॠग—यापुढें ! ॥ ३ ।

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हा
भाऊंची शौर्यभरारी—यापुढें !
फडनवीस नाना गेले—
त्यांची न दिसेल हुशारी—यापुढें !
जी खनी,
प्रसवली मणी,

यापरी जनीं,

बहुगुणी भारी

झाली ती हाय भिकारी—यापुढें ! ॥ ४ ॥

ऐश्वर्य लयाला गेलें

जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !

हास्याचे दिन मावळले

आंसवें लोचनीं आलीं—यापुढें !

मित्र सर्व वैरी झाले

संकटी न उरला वाली—यापुढें !

यापरी,


नाडलों तरी,

लोचनांतरी

नीज जी भरली,

ती निघेल कवण्या काळी—यापुढें ! ॥ ५ ॥

**विनायक**



## कोळ्याचा प्रयत्न

[अभंग]

एका कोळियानें एकदां आपूलें ।
जाळें बांधियेलें उंच जागीं ।।
तेथुनी सुखानें खालतीं तो आला ।
परी मग झाला कष्टी बहू ।।
मागुती जाळीया-माजीं जातां ये ना ।
धाग्यावरुनी पुन्हां पुन्हां पडे ।। १ ।।

[कामदा]

चार वेळ तो ह्यापरी पडे । जाय बापुडा भागुनी, पुढें ।।
आस खुंटली, येतसे रडें । आंग टाकुनी भूमिसी पडे ।। २ ।।

[अंजनी गीत]

फिरुनि एकदां धीर धरुनियां ।

लागे हळुहळु वरतिं चढाया ।।
जाळ्याजवळी परि पोंचुनियां ।
आदळला खालीं ।। ३ ।।

[साक्या]

पांचहि वेळां यत्न करुनियां, आलें यश न तयाला ।।
गरिब बापुडा कोळी तेव्हां, दुःखी अतिशय झाला ।। ४ ।।
हिंमत धरुनी फिरुनि आणखीं, धागा चढुनी गेला ।।
परि जाळ्यामधिं शिरतांना तो, झोक जाउनी पडला ।। ५ ।।

[दिंडी]

"अहा ! मज ऐसा दैव-हत प्राणी ।
खचित जगतीं या दिसत नसे कोणी !"।।
निराशेनें बोलुनी असें गेला ।
परी चित्ती स्वस्थता न ये त्याला ! ।। ६ ।।

[अभंग]

मग वेगें वेगें ऊठे । धागा चढूं लागे नेटें ।।
बहु घेई खबरदारी । जाइ, पोंचे जाळ्यावेरीं ।।
हळुच मग आंत शिरे । पोटीं आनंदानें भरे ।।
झटे निश्चयाचे बळें । अंतिं त्याला यश मिळे ।। ७ ।।

# श्रीकृष्णाची मुरली

अंग वक्र अधरीं धरि पावा;
गोपवेष हरि तोचि जपावा ।
वामबाहुवरि गालहि डावा,
तो ठसा स्वहृदयांत पडावा ॥ १ ॥

वेणुध्वनी तो सुरगायकांनीं;
त्यांच्या विमानांतहि बायकांनीं;
आश्चर्य कानीं पडतांच केलें;
न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ॥ २ ॥

मोहती व्रजपशू मृग गाई;
आमुचें नवल काय अगाई !
स्तब्ध होति लिखितें जशिं चित्रें;
वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें ॥ ३ ॥

मातृस्तनींचा रस आननांत;
तों होय वेणुध्वनि काननांत ।
गळे गिळेना पय वांसुरांतें,
आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ ४ ॥

मल्लवेष रचिला अभिराम,
श्रीधर प्रभु सवें बळराम ।
मोरपत्र मुगुटीं तरुपत्रें;
नेत्र सुंदर जशीं शतपत्रें ॥ ५ ॥

सये असा ज्यां हरि देखिला गे,
तो प्रेमरंगीं मनिं रेखिला गे ।
पाचारितो वेणुरवेंचि गाई;
आश्चर्य तेव्हां करितों अगाई ॥ ६ ॥

गोधनीं बहु पुढें नच जावें;
ठाव एकचि धरूनि थिजावें ।
वाजवी म्हणुनि जो निज पावा;
कृष्ण तोचि हृदयांत जपावा ॥ ७ ॥

आपादमाळा प्रभु कृष्णजीची,
सुधा पिती षट्पद कृष्ण जीची ।
प्रदक्षिणा ते अवघे तिला हो;
करूनि गुंजारव घेति लाहो ॥ ८ ॥

गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें;
वेणुध्वनी मिसळला मृदु वासुदेवें ।
आपादकंठ वनमाळ अशी विराजे;
ते सेविती मधुप होउनि देवराजे ॥ ९ ॥

वनीं राजहंसीं पिकांनी शुकांनीं
ध्वनी गोड तो आयकोनी स्वकानीं ।
त्वरें येउनी सेवियेलें हरीतें.
महापाप हें नाम ज्याचें हरीतें ॥ १० ॥

वदन लावुनि ते सकल क्षिती;
नयन झांकुनि अन्य न लक्षिती ।
स्थिर मनें करुनी स्थिर आसना
करिति ते खग कृष्णउपासना ॥ ११ ॥

यशोदे तुझा पुत्र वंशस्वरांनी
सुधा ओष्ठिंची वर्षतो या स्वरांनीं
तईं भोंवते मोहती देवजाती;
जयांचीं मनें उन्मनत्वासि जाती ॥ १२ ॥

**वामन पंडित**

# पावसाचें गाणें

उघड पावसा ऊन पडूं दे
उडूं बागडूं हंसूं खेळुं दे !

कळी उमलुं दे फुला फुलूं दे,
पानें वाऱ्यामध्यें डुलूं दे
टपटप खालीं थेंब पडूं दे
तालावर त्या मला नाचुं दे १

पाय उठवुं दे वाळूवरती
समुद्र झाला ! आली भरती,
आभाळ पडे खोल खालतीं
डोकावुनि ढग आंत पाहुं दे ! २

उंच चालल्या घारी वरतीं
बगळे रांगा धरुनी उडती;
ढगांत भरभर रंग बदलती
पाठशिवणिचा खेळ बघूं दे ! ३

चिमणी ओले पंख सुकविते
घरट्यामधुनी पिलूं पहातें
मुंगी रांगेमधें धांवते
साखर-खाऊ तिला घालुं दे ! ४

जाळीं कोळ्यांचीं बघ भिजती
हिऱ्यासारखे थेंब चमकती;
रंग त्यांवरी सुंदर खुलती
थांब पावसा हार करूं दे ! ५

बसे फुलावर फूलपांखरूं
मला सांगतें मौज चल करूं

थांब पावसा ऊन पडूं दे
गातां गातां मला खेळुं दे ! ६

श्रीधर बाळकृष्ण रानडे

## सायंकाळची शोभा

पिवळें तांबुस ऊन कोवळें पसरे चौफेर
ओढा नेई सोनें वाटे वाहुनिया दूर.

झाडांनीं किति मुकुट घातले डोकिस सोनेरी
कुरणावर शेतांत पसरला गुलाल चौफेरी !

हिरवें हिरवेंगार शेत हें सुंदर साळीचें
झोके घेतें कसें, चहुंकडे हिरवे गालीचे !

सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे.

अशीं अचल फुलपांखरें फुलें साळिस जणुं फुलती
साळीवर झोपलीं जणूं का पाळण्यांत झुलती.

झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरीं उडती !
हिरे, माणकें, पांचू फुटुनी पंखचि गरगरती !

पहा पांखरें चरोनि होती झाडावर गोळा.
कुठें बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा ?

भा० रा० तांबे

# सूर्यास्त

[वसंततिलका]

साम्राज्य भू-जलनिधीवर चालवून,
अंधार जो रिपु तया दुरि घालवून,
चंड-प्रताप भगवान् दिन-राज चाले
अस्ता, सवें किरण-सेवकही निघाले. ॥ १ ॥

अस्तास जाय निज-नायक हें बघून,
भू-मंडळावरुन वृक्ष-शिरीं रिघून,
हे उंच डोंगर, गिरी, नभ आक्रमीती;
तेथून बिंब न दिसे तयिं नष्ट होती. ॥ २ ॥

होता नभीं तपत जोंवरि सूर्य कांत,
दिव्य प्रभा धरुनि शोभत वस्तुजात;
काल-क्रमें बघुन अस्तगता तयास
शोकें जणों विकल सृष्टि दिसे उदास. ॥ ३ ॥

अस्ता प्रताप-निधि भास्कर जात आहे
हें विस्मयें जग चराचर पाहताहे;
येतां समीप तम, भीतिभरें समस्त
झाडें, नद्या, गिरिशिरें दिसती तटस्थ. ॥ ४ ॥

गेल्या सकाळिंच वनांत चरावयास
त्या धेनु धांवति गृहाप्रति यावयास;
सप्रेम वत्स हृदयांमधिं आठवीती,
पान्हा फुटे स्वपय भूमिस ओपिताती. ॥ ५ ॥

चारा धरूनि वदनांत विहंग-जाती
अत्यंत उत्सुक जवें घरट्यांस जाती,

"चीं चीं" पिलें करिति पाहुनि एकदांची
माया पिलांवर कितीतरि पांखरांची ! ॥ ६ ॥

नेणोनि ऊन अणि भूक तहान यांतें
काबाडकष्ट करितात धन्यासवें ते
शांत-स्वभाव, हितकारि जगास मोठे
या वेळिं बैल जवळीं करितात गोठे. ॥ ७ ॥

जाणों सुवर्णमय सुंदर रश्मि-जाल
घे आवरोनि तरणी भुवनावरील.
झालें समस्त घन-मंडल सोनियाचें
लाधे सदैव फळ सज्जन-संगमाचें. ॥ ८ ॥

**वासुदेव वा० खरे**



## सागरास

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला ! ॥ध्रु०॥

भूमातेच्या चरणतला तूं धूतां,
मीं नित्य पाहिला होता;
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं;
सृष्टिची विविधता पाहूं.
तैं जननीहृद् विरहशंकितचि झालें
परि तुवां वचन तिज दिधलें,
'मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठिं वाहीन.
त्वरित या परत आणीन !'
गंभीर त्वदाकृति बघुनी, मी,
विश्वसलों या तव वचनीं, मी,
जगदनुभवयोगें बनुनी, मी,
'येईन त्वरें' कथुनि सोडिलें तिजला,
सागरा, प्राण तळमळला ! १

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं,
ही फसगत झाली तैशी !
भूविरह कमा सतत साहुं यापुढतीं,
दशदिशा तमोमय होती,
गुणसुमनें मी वेंचियली या भावें
कीं, तिनें सुगंधा घ्यावें !
जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा,
हा व्यर्थ भार विद्येचा.
ती आम्रवृक्ष-वत्सलता, रे,
नव कुसुमयुता त्या सुलता, रे,
तो बाल गुलाबहि आतां, रे,
फुलबाग मला, हाय ! पारखा झाला !
सागरा, प्राण तळमळला ! २

नभिं नृक्षत्रें बहुत, एक परि प्यारा—
मज भरतभूमिचा तारा.
प्रासाद इथें रम्य; परी मज भारी—
झोंपडी आइची प्यारी.
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा
वनवास तिच्या जरि वनिंचा.
भुलविणें व्यर्थ हें आतां, रे,
बहु जिवलग गमतें चित्ता, रे—
तुज सरित्पते, जी सरिता, रे,
तद्विरहाची शपथ घालितों तुजला,
सागरा, प्राण तळमळला ! ३

या फेनमिषें हंससि, निर्दया, कैसा,
कां वचन भंगिसी ऐसा ?
त्वत्स्वामित्वा संप्रति जी मिरवीते,
धकुनि कां आंग्लभूमीतें,

मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी ?
मज विवासनेतें नेसी ?
जरि आंग्लभूमिभयभीता, रे,
अबला न माझि ही माता, रे,
कथिल हें अगस्तिस आतां रे,
जो आचमनीं एक वेळ तुज प्याला,
सागरा, प्राण तळमळला ! ४

वि० दा० सावरकर

## तुरुंगाच्या दारांत

[वृत्त : पांडव दिडकी]

वाढुं दे कारागृहाच्या भिंतिची उंची किती
मन्मना नाहीं क्षिती

भिंतिच्या उंचींत आत्मा राहतो का कोंडुनी ?
मुक्त तो रात्रंदिनीं !

भक्तिला जो पूर आला वाढतो तो अंतरीं
पायरीनें पायरी;

फत्तरांच्या या तटांनीं ओसरावा काय तो ?
सारखा फोंफावतो

अंजनीच्या बालकानें सूर्यबिंबा ग्रासिलें
मन्मनीं तें बिंबलें

घालिती सैतानसे शत्रू इथें थैमान जें
तें गिळाया मी सजें

अग्निकुंडीं पाय केव्हां, कंटकींही केधवां
बंदिखान्याची हवा

या विलासांमाजि होई आमुची जोपासना
तेज नाहीं यांविना

हिंददेवी, गोंधळी मी वाजवीतां संबळ
घालसी हातीं बळ

पेटलेला पोत हातीं स्वार्थतैलें तेवतां
नाचवूनी नाचतां

या दऱ्यांखोऱ्यांतुनी स्वातंत्र्यगीतें गाउनी
दावितां मी हिंडुनी

आज आलों निर्भयें या मंदिरीं विश्रांतिला
मान्य झालें हें तुला

त्वत्कृपेचा सिंधु माझ्या मस्तकीं हेलावतां
काय दुक्खांची कथा ?

अग्निही वाटेल मातें चंदनाचें लेपन
कीं सुधेचें सिंचन

शृंखला पायांत माझ्या चालतांना रुम्झुमे
घोष मंत्रांचा गमे

लौकरी स्वातंत्र्यभानो ! भारतीं दे दर्शन
होउं तेव्हां पावन.

**यशवंत**

# उद्यांचा काय नेम ?

[भुजंगप्रयात]

तुझीया मनीं चांगलें व्हावयाचें;
तरी आज हो पर्व हें सोनियाचें !
असे वागले मोठमोठे शहाणे;
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ॥ १ ॥

धरित्रीवरी काल जीवंत ठेले;
तयांतील पाहा किती आज मेले !
तुला ही अवस्था नसे का वहाणें ?
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ॥ २ ॥

पुढें हें करूं, तें करूं पुण्य साधूं;
धनें मेळवूं,मंदिरें थोर बांधूं;
भ्रमीं वेड या शुद्ध आहे रहाणें;
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ॥ ३ ॥

दरिद्री, मुके, आंधळे, पाहतोसी;
असे नेम का कीं तसा तूं न होसी ?
अकस्मात ये हें जिणें दीनवाणें;
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ॥ ४ ॥

नसे आळसासारखा चोर लोकीं;
अमोलीक आयुष्य तो चोरतो कीं;
'उद्यां हो उद्यां' हे तयाचे बहाणे;
उद्यां काय होईल तें कोण जाणे ? ॥ ५ ॥

म्हणोनि तुला वाटतें जें करावें;
करायास तें आज वा लाग भावें;

दुजा आजच्या सारखा वेळ नाही;
विचारोनि चित्तीं खरें काय पाहीं ॥ ६ ॥

**विनायक कोंडदेव ओक**

## मधमाशी

[अंजनी गीत]

उठुनि सकाळीं ती मधमाशी ॥
जाते कीं मध मिळवायासी ॥
थेंबें थेंबें सांठवि त्यासी ॥
उद्योगी मोठी ॥ १ ॥

आळस तिजला ठाउका नाहीं ॥
सर्व दिवस ती खपते पाहीं ॥
थंडी ऊन म्हणेना कांहीं ॥
उद्योगी मोठी ॥ २ ॥

गोड गोड मध निपटुनि घेते ॥
थोडा म्हणुनी मुळीं न रुसते ॥
सांठवुनी तो जपुनि ठेविते ॥
उद्योगी मोठी ॥ ३ ॥

थोडाही गुण मिळतां घ्यावा ॥
सांठा त्याचा नित्य करावा ॥
कोणालाही तो शिकवावा ॥
ठेवा हें चित्तीं ॥ ४ ॥

# कशासाठीं ? पोटासाठीं !

[छंद पादाकुलक]

कशासाठीं पोटासाठीं
खंडाळ्याच्या घाटासाठीं ध्रु०

चला खेळूं आगगाडी,
झोका उंच कोण काढी ?
बाळू, नीट कडी धर
झोका चाले खाली वर
ऐका कूकुक् शीट झाली
बोगद्यांत गाडी आली
खडखड भकभक
अंधारांत लखलख
एंजिनाची बघा खोडी



बोगद्यांत धूर सोडी
नका भिऊं थोड्यासाठीं
लागे कुत्रें भित्यापाठीं. १

उजेड तो दूर कसा
इवलासा कवडसा
नागफणी डावीकडे
कोकण तें तळीं पडे
पाठमोरी आतां गाडी
वाट मुंबईची काढी
खोल दरी उल्लासाची
दो डोक्यांचा राजमाची
पडे खळाळत पाणी
फेसाळल्या दुधावाणी
आतां जरा वाटे दाटी
थंड वारा वरघाटीं २

डावलून माथेरान
धावे गाडी सुटे भान
तारखांब हे वेगांत
मागें मागें धावतात
तार खालीं वर डोले
तिच्यावर दोन होले
झाडी फिरे मंडलांत
रूळ संगें धावतात
आली मुंबई या जाऊं
राणीचा तो बाग पाहूं
गर्दी झगमग हाटीं—
कशासाठीं ? पोटासाठीं ! ३

**माधव जूलियन**

# झाल्या तिन्हिसांजा

[शेतकीपेशांतील घरधनिणीचें सांजगीत]

अजुनि कसे येती ना परधान्या राजा ?
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

उशिर होइ काढाया गाईंच्या धारा
शालु हिरा कालवडी देती हुंकारा
टवकारिति कान जरी वाजे दरवाजा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

वाट तरी सरळ कुठें पांदींतिल सारी ?
त्यांतुनि तर आज रात्र अंधारी भारी !
आणि बैल कसल्याही बुजती आवाजा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

'जेवणार मी पुढ्यांत' घाली मधु रुंजी
झोपेनें पेंगुळली तरि न निजे मंजी
आणि किती करति आंत बाहेरी येजा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

निवल्यावर हुरड्याच्या उसळीस न गोडी
लवकर कां सोडिती न मोट तरी थोडी
अधिकाधिक खालीं-वर होइ जीव माझा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

गुरगुरला तो पिसाळ काल जरा कांहीं
म्हणती त्या मेल्याला काळिज कीं नाही !
परि पाठीराखी ती आहे अष्टभुजा
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हिसांजा !

**यशवंत**

# दीपविसर्जन

[एके दिवशीं संध्याकाळीं नर्मदातटाकावर कांहीं मुली दिवे सोडीत होत्या; तो प्रसंग स्मरून खालील कविता लिहिली आहे.]

करीं आरती घेउनी आर्यबाला
त्वरें पातल्या नर्मदेच्या तटाला;
करूनी तयांनीं सरित्पूजनाला
प्रवाहीं दिली सोडुनी दीपमाला. १

अहा काय शोभा वदूं त्या क्षणाची
तृषा शांत झाली मदीयेक्षणाची;
तदा अस्तगामी जरी अंशुमाली
मना वाटलें यामिनी काय झाली. २

सरित्पात्र तें स्वच्छ तैसें विशाल
तदा भासलें कीं दुजें अंतराल;
तती त्यावरी शोभली दीपिकांची
उदेली जणों पंक्ति कीं तारकांची. ३

जशी अंतरिक्षीं फिरे चंद्रकोर
प्रवाहीं करी रम्य नौका विहार;
नभीं स्वैर संचारती मेघखंड
जलीं खेळती वीचि तैशा उदंड. ४

अशी दिव्य शोभा पहातां पहातां
मनी शांत झालों लया जाय चिंता;
झणीं सूचली कल्पना एक चित्ता
असे सर्व सृष्टीस जी मूलभूता. ५

दिले सोडुनि दीप जैं बालिकांनीं
दिला सारिखा वेग सर्वां तयांनीं;

तयांची स्थिती तत्क्षणीं भिन्न झाली
वरी दृश्य कोणी, कुणी जाय खालीं. ६

कुणी गुंतुनी राहिले भोवऱ्यांत
जलौघासवें जाय कोणी वहात;
तयांतील कांही तटा अन्य गेले
पुढें जाउनी अल्प मागेंचि आले. ७

जसे दीप तैसे असंख्यात जीव
प्रभू निर्मितो थोर ज्याचा प्रभाव;
तयां सोडुनी देत काल-प्रवाहीं
वहाती तदौघासवें सर्व देही. ८

कुणी रंक होई कुणी होय राजा
दुजा देखणा हो तिजा हीनतेजा;
कुणी मूर्ख होई कुणी हो शहाणा
कुणी धैर्यशाली तसा भ्याड जाणा. ९

"तसें कां करावें ?" "असें मी करीन"
वृथा वल्गना मानवांच्या अजाण;
स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र
स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र. १०

जरी राहिलें नर्मदातीर दूर
जरी आज बाला न दृष्टीसमोर;
स्मरोनी तरी दीपसर्गप्रसंग
झणीं हर्षयोगें भरे अंतरंग. ११

माधवानुज

# घरिं एकच पणती

घरिं एकच पणती मिणमिणती ।
म्हणुं नको उचल चल लगबग ती ॥ ध्रु० ॥

अगणित बांधव तव अंधारीं ।
किर्र रान ! भय भंवतीं भारी ।
चरणिं जिवाणूं भरे शिरशिरी ।
यमदूत न कीटक किरकिरती ॥ १ ॥

काळोखाच्या भयाण लाटा ।
उठती फुटती बारा वाटा ।
फेंस पसरला सारा कांठा ।
कुणि म्हणो तारका लुकलुकती ॥ २ ॥

दिवे विजेचे धनिकमंदिरीं ।
प्रकाश पाडिति परोपरि जरी ।
स्नेहशून्य ते सदा अंतरीं ।
कां करिसि तयांची शिरगणती ? ॥ ३ ॥

अखंड नंदादीपज्योती ।
दगडी देवा सोबत करिती ।
नच बाहेरी क्षणभरि येती ।
अप्सरा विलासी नसति सती ॥ ४ ॥

धांव म्हणुनि तव घेउनि पणती ।
हृदय नाचुं दे तिजसांगातीं ।
सोन्याचें घर—दिसते माती ।
रे पाहसि मागें वळुनि किती ? ॥ ५ ॥

पहा पुढें या दीन लोचनीं ।
रविकिरणांचें स्मरण होउनी ।

आशा नाचे ज्योत दुज्या क्षणिं।
जरि विझे तरि करी कोण क्षिती ? ॥ ६ ॥

वि० स० खांडेकर

## जग वंदी त्यासच पुन्हां पुन्हां

जग वंदी त्यासच पुन्हां पुन्हां
हें घडत कसें न कळे कवणा ? ध्रु०

तो नच राजा, राजकुमारहि
नच कोणी श्रीमंत धनाढ्यहि,
विख्यात न तो कोणी कवीहि,
नच असल्या कांहींच खुणा ! १

म्हणे जगाला, "ऊठ",—उठे जग !
म्हणे जगाला, "डोळ्यांनी बघ,"
विस्फारुनि जंव नेत्र, बघे मग !—
चहूंकडे करुणा करुणा ! २

जन देई ह्यातें सिंहासन,
झुगारून हा देत विलक्षण,
हृदयिं जगाच्या विराजला पण—
अद्भुत ही सगळी घटना ! ३

धूळ जगाची लुटिली ह्यानें
निसर्ग-सुंदर उभवि उपवनें,
शांतीचें साम्राज्य निर्मिणें,
एकच त्याचा हा बाणा ! ४

अज्ञातवासी



## खचतो माझा धीर

[चाल : सारंगीवाला]

हे चिमण्या चंद्रा ! पाहुनि तुजला खचतो माझा धीर !

मुनिनिं कथिलें, सत्य झालें
परि कशा हें भाळिं आलें
हे मोद खेद मज उलविति बाळा खळत न नयनीं नीर !

जन्म दिधला, करिं न धरिला
अजुनि पान्हा जों न फुटला
ये तोंच स्मरणीं आज्ञा ऋषिंची 'व्रजिं पोंचविं यदुवीर' !

देखिलें ना मुखहि पुरतें
तोंच दुरवी बालकातें
ती माता कसली ? घाता सजली ! म्हणतिल अदय अधीर !

त्यांत माजे तिमिर भारी
वीज मधुनी नभ विदारी

हे अकांडतांडव मांडिति नभिंचे घन गर्जुनि गंभीर !

मुसळधारा कोसळे ही
त्रस्त साऱ्या ह्या दिशाही
ही त्वेषें घोषें धांवे यमुना तुडवुनि दोन्ही तीर !

शृंखलांनीं बद्ध असणें
तरिहि कारापार होणें
हें बाळा ! कैसें घडतें असतां नष्ट कंस बाहीर !

दुर्बळांचा देव वाली
पाठिराखा सर्व काळीं
ही आशानौका माझी राखो तोच संकटीं थीर !

**वा० गो० मायदेव**

## शूर्पणखा

**[हें स्त्रीगीत 'अहं प्रभावसम्पन्ना स्वच्छन्दबलगामिनी । चिराय भव भर्ता मे सीतया किं करिष्यसि' या रामायणांतील श्लोकाच्या आधारें रचिलें आहे. वनवासांत रामसीता एकत्र बसलीं असतां शूर्पणखा राक्षसी उत्तम वस्त्रालंकारांनीं नटून, रामाला मोहनी घालण्यास आली आहे; अशा स्थितींत कवितेस सुरवात होते.]**

[जाति-शूर्पणखा]

गेलें तुझ्यावर जडून ।
रामा, मन गेलें तुझ्यावर जडून ॥ ध्रु० ॥

किति नटून् सजून् मी आलें
किति अलंकार हे ल्यालें
किति नाजूक गेलें बाइ होऊन ॥ रामा० ॥

हीं आभाळि वसनें मला
प्रिय तुझ्यासाठिं घननिळा
किति घेसी आतां जिव ओढून ।। राम० ।।

तुझ्या रूपानें मन मोहिलें
तुझ्या पायाशिं तन वाहिलें
चल भेटूं आतां कडकडून ।। रामा० ।।

मी प्रभावशालिनि सती
कां सीतेवर धरिशी प्रीती ?
जिवलगा तिला चल सोडून ।। रामा० ।।

दृष्टि रामाचि स्तिमितचि झाली
सीतामाई हंसूं लागली
शूर्पणखा गेली मग चिडून ।। रामा० ।।

धावे खायास मायाविनी
लक्ष्मणानें तों येउनी
परतविलि नाककान कापून ।।रामा०।।

गिरीश

## उपदेशपर आर्या

सत्य सदा बोलावें सांगे गुरु आणि आपुला बाप ।
खोटें भाषण करणें सज्जन म्हणतात हें महापाप ॥

दिधलें दुःख परानें, उसनें फेडूं नयेचि सोसावें ।
शिक्षा देव तयाला करिल म्हणोनी उगेंचि बैसावें ॥

जो जो निजहितकर्ता त्याची त्याची करा तुम्ही सेवा ।
देवासमान मानुनि त्याचा सन्मान मानसीं ठेवा ॥

मोठेपण दुसऱ्याला देशील जरी तरीच तूं मोठा ।
'मी मोठा' म्हणतो जो, त्याचा मोठेपणा असे खोटा ॥

थोर असो नीच असो, अडल्या बिडल्यास हात लावावा ।
गरिबास साह्य व्हावें सूज्ञें चुकल्यास मार्ग दावावा ॥

जो नर परोपकारी त्याच्या पुण्यास बा नसे गणती ।
थोर असो नीच असो, 'तो धन्य' असेंच लोक त्या म्हणती ॥

शक्त्यनुसार करावा दीनावर अल्प थोर उपकार ।
कीं त्या सत्कर्माचा देवावर निश्चयें पडे भार ॥

यास्तव पर उपकारीं निजहित समजोनि देह झिजवावा ।
लोकीं जो न अनावर दुःखानल होय तोंचि विझवावा ॥

देहाचा, बुद्धीचा, वित्ताचाही असा सदुपयोग ।
जो नर करितो त्याला नलगे साधावया दुजा योग ॥

वदतां सत्य कधींही न धरावी लाज, भीड वा भीती ।
सर्वहि धर्म जगांतिल एकमतें सांगतात ही नीति ॥

सौभाग्य मतिसतीचें सत्य, गुणांचें शुचिप्रभावरण ।
सत्य मुखाचें मंडण, वाणीचेंही मनोरमाभरण ॥

सत्य मनुष्यपणाचें चीज, यशाचेंहि बीज सत्यचि रे ।
जीवन जीवदशेचें जीवात्म्याचेंहि तेज तेंचि खरें ॥

## परस्पर प्रीतीविषयीं उदाहरण

[आर्या]

एक्या लहान काळ्या मुंगीला गवसला बहू थोर ॥
दाणा गोधूमाचा, परि उचलेना जरी करी जोर ॥ १ ॥

तेव्हां दैवें तीच्या दृष्टी पडला तिचाच शेजारी ॥ १ ॥
प्रार्थुनि म्हणे तयाला, गेहा न्यायास दे मदत भारी ॥ २ ॥

माझें आहे मजला, कार्य पहाया असें वदे तोरें ॥
आणि म्हणे इच्छिसि जरि, गे ने तो तूंच आपुल्या जोरें ॥ ३ ॥

ऐसें वदूनि चालू झाला तो दुष्टबुद्धि अति गैर ॥
धांवतधांवत गेला, अपुल्या गेहीं निजावया स्वैर ॥ ४ ॥

इतुक्यामध्यें दुसरी, मार्ग क्रमितां पिपीलिका आली ॥
गेली मदत कराया, संकटिं पाहूनि आपली आली ॥ ५ ॥

पोंचवि तिला तिच्या त्या, गोधूमासह गृहास नेऊन ॥
दाखवि सुजनपणातें, ऐशा मोठ्या श्रमास घेऊन ॥ ६ ॥

ज्यांच्या ज्यांच्या श्रवणीं पिपीलिकेची पडेल ही गोष्ट ॥
ते हालवुत कराया, बाळांतें बोध आपुले ओष्ठ ॥ ७ ॥

ती सुस्वभाव मुंगी, गेली साह्यास जी स्वइष्टातें ॥
बोध करो बाळांतें, जो होइल मान्य सर्व शिष्टांतें ॥ ८ ॥

जर करिती प्रेमातें, परस्परें जीव जंतु अति नीच ॥
तर पाहिजे शिशूंच्या मध्यें ती प्रेमबुद्धि असलीच ॥ ९ ॥

# चुकलेलें कोंकरूं

कां भटकसि येथें बोलें । कां नेत्र जाहले ओले
कोणिं का तुला दुखवीलें । सांग रे ! १

धनि तुझा क्रूर कीं भारी । का माता रागें भरली
का तुझ्यापासुनी चुकली । सांग रें ! २

हा हाय कोंकरूं बचडें । किति बें बें करुनी अरडे
उचलोनि घेतलें कडे । गोजिरें ! ३



मग थोपटुनी म्यां हातें । आणिलें गृहातें त्यातें
तों नवल मंडळींना तें । जाहलें. ४

गोजिरें कोकरूं काळें । नउ दहा दिनांचें सगळें
मउमऊ केश ते कुरळे । शोभले. ५

लाडक्या कां असा भीसी । मी तत्पर तव सेवेसी
कोवळी मेथि ना खासी । कां बरें ? ६

बघ येथें तुझियासाठीं । आणिली दुधाची वाटी
परि थेंब असा ना चाटी । कां बरें ? ७

हळु दूध थोडकें प्यालें । मग त्वरें तोंड फिरवीलें
कोंकरूं बावरुन गेलें । साजिरें ! ८

लटकून छातिशीं निजलें । तासही भराभर गेले
विश्व हें मुदित मग केलें । रविकरें. ९

घेउनी परत त्या हस्तीं । कुरवाळित वरचेवरती
कालच्या ठिकाणावरतीं । सोडिलें. १०

तों माता त्याची होती । शोधीत दूर शिशुसाठीं
दगडांचे तरुंचे पाठीं । हाय रे ! ११

हंबरडे ऐकूं आले । आनंदसिंधु ऊसळले
स्तनिं शरासारखें घुसलें । किति त्वरें ! १२

**वि० दा० सावरकर**

# चांदोबाची गंमत

[चाल : आनंदी आनंद गडे]

ये ये ताई पहा पहा
गंमत नामी किती अहा !

चांदोबा खालीं आला
हौदामध्यें बघ बुडला
कसा उतरला ?
किंवा पडला ?
पाय घसरला ?
कशास उलटें चालावें ?
पाय नभाला लावावे ?

किती उंच हें आभाळ
तेथुनि हौद किती खोल
तरि हा ताई !
आई आई !
बोलत नाहीं
चांदोबा तूं रडूं नको !
ताई तूं मज हंसूं नको.

किती किती हें रडलास
हौद रडण्यानें भरलास
तोंड मळविलें !
अंग ठेचलें !
तेज पळालें
उलटा चालूं नको कधीं
पडशिल ऐसा जलामधीं.

हरी सखाराम गोखले

मराठी ग्रंथ संग्रहालय
२६०२
२६०५८
२।३।९०



## लेजीम

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा-बैल माजले
शेतकरी-मन प्रफुल्ल झालें
छन झुन, खळ झण—झण खळ, झुन झिन, लेजिम चाले जोरांत !

चौघांनीं वर पाय उचलले
सिंहासनिं त्या उभे राहिले
शाहिर दोघे ते डफवाले
टप ढुम, ढुम ढुम, डफ तो बोले लेजिम चाले जोरांत !

दिवटी फुरफुर करूं लागली
पटक्यांचीं वर टोकें डुललीं
रांग खेळण्या सज्ज जहाली
छन खळ, ढुम ढुम, छन छन, पट ढुम, लेजिम चाले जोरांत !

भरभर डफ तो बोले घुमुनी
लेजिम चाले मंडल धरुनी
बाजुस, मागें, पुढें वांकुनी
खळ खळ, छन छन, झण छन, खळ झन, लेजिम चाले जोरांत !

डफ तो बोले, लेजिम चाले
वेळाचें त्या भान न उरलें
नादभरानें गुंग नाचले
छननन, ढुम ढुम, खळ छन, ढुम ढुम, लेजिम गुंगे नादांत !

सिंहासन तें डुलूं लागलें
शाहिर वरतीं नाचुं लागले
गरगर फिरले लेजिमवाले
छन छन, खळ खळ, झणणण, छन छन, लेजिम गुंगे नादांत !

दिनभर शेतीं श्रमुनी खपले
रात्रीं साधी लेजिम चाले
गवई नलगे सतारवाले
छन छन खळ खळ, झणझण, छन छन, रात्र संपली नादांत !

पहांट झाली, तारा थकल्या
डफवाला तो चंद्र उतरला
परी न थकला लेजिममेळा
ढुम झन, खळ खळ, लेजिम खालीं :- "चला जाउं या शेतांत."

श्रीधर बाळकृष्ण रानडे

# ईश्वराचें महत्त्व

[श्लोक]

स्तुती करावी परमेश्वराची ॥
करूं नये व्यर्थ कधीं नराची ॥
स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो ॥
तसा तिला मानव काय हो तो ॥ १ ॥

डोळ्यांनीं बघतों ध्वनी परिसतों कानीं पदीं चालतों ॥
जिव्हेनें रस चाखतों मधुरही वाचे अम्ही बोलतों ॥
हातांनी बहुसाळ काम करितों विश्रांतिही घ्यावया ॥
घेतों झोंप सुखें फिरोनि उठतों ही ईश्वराची दया ॥ २ ॥

सत्तेनें प्रभुच्याच सूर्य उगवे त्याच्याचि सत्ताबळें ॥
वारा वाहतसे नभीं तरुलता देतात पुष्पें फळें ॥
पाण्याचा करितात मेघ समयीं वर्षाव भूमीवरी ॥
देते धान्य समृद्धि भूमि अवघी त्याचीच सत्ता खरी ॥ ३ ॥

## ईश्वरास प्रार्थना

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ॥
आम्ही अज्ञ मुलें तुझीं सकलही तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतका अम्हांवरि तुवां देवा असा कोप हा ॥
हें आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥ ४ ॥

[पद]

त्राता तूंच हरी ॥
अम्हांला, त्राता तूंच हरी ॥ ध्रु० ॥

अंत नको बघुं अमुचा आतां ॥
धांव घेइं लवकरी ॥ १ ॥

जगत्सर्ग संहारकारका ॥
अतां नको धरुं दुरी ॥ २ ॥

सर्व संकटापासुनि देवा ॥
मुक्त करीं झडकरी ॥ ३ ॥

कामक्रोधादिक हे शत्रू ॥
पीडिति बहु अंतरीं ॥ ४ ॥

## देव

देवा, तुझें किती । सुंदर आकाश
सुंदर प्रकाश । सूर्य देतो

सुंदर चांदण्या । चंद्र हा सुंदर
चांदणें सुंदर । पडे त्याचें

सुंदर हीं झाडें । सुंदर पाखरें
किती गोड बरें । गाणें गाती

सुंदर वेलींचीं । सुंदर हीं फुलें
तशीं आम्ही मुलें । देवा, तुझीं

इतुकें सुंदर । जग तुझें जर
किती तूं सुंदर । असशील !

**ग० ह० पाटील**

## आई

नीज न ये तर गीत म्हणावें
अथवा झोके देत बसावें
कोण करी हें जीवें-भावें ? ती माझी आई !

रडवें माझें वदन बघोनी
भूक लागली हें जाणोनी
कोण उगें करि मज पाजोनी ? ती माझी आई !

हसतां मजला पाहुनि हंसते
मुके मटामट कितीतरि घेते
परि अंतरिं जी तृप्त न होते, ती माझी आई !

येई दुखणें तेव्हां जपते
सुखवाया मज अतिशय झटते
परोपरी करि उपचारांतें, ती माझी आई !

चालत असतां पडलों पाहुनि
उचलाया मज येई धावुनि
गोंजारी पोटाशीं धरुनी, ती माझी आई !

स्मरण तुझ्या ममतेचें होई
तव उपकारा सीमा नाहीं
कैसा होऊं मी उतराई ? गे माझे आई !

## दसरा

सोनें लुटुनी सायंकाळीं मोरू परतुनि आला ।
बहीण काशी दारीं येउनि ओवाळी मग त्याला ॥
दसरा सण मोठा । नाहीं आनंदा तोटा ॥

# धुक्याचा पूल...

# १. संपादन : एक अनुभव

क्रमिक पुस्तकांतील कवितांच केवळ नेटकं संकलन सादर करायचं अशी भूमिका ठेवून आम्ही या संग्रहाच्या कामाचा प्रारंभ केला. पण गोळा केलेल्या कवितांवरून नजर फिरविताना प्रारंभीच अनेक अडचणी आम्हाला दिसू लागल्या. बऱ्याच कविता वेगळ्या वेगळ्या क्रमिक पुस्तकांत वेगळ्यावेगळ्या छापलेल्या आढळल्या. कुठं कडव्यांची संख्या वेगवेगळी, कुठं चरण बदललेले, तर कुठं शीर्षकं वेगळी . . . हे सगळं चित्र आम्हांला गोंधळात टाकणारं वाटलं.

यातून मूळ कवितेकडे जाण्याची गरज आम्हांला भासू लागली. आम्ही कवींचे मूळ कवितासंग्रह, तसंच निवडक कवितांचे काही प्रातिनिधिक संग्रह गोळा केले. त्या संग्रहांतून मूळ कविता पाहू लागलो तेव्हा आणखी काही गोष्टी लक्षात आल्या. क्रमिक पुस्तकांतून आपणा सर्वांना मुखोद्गत झालेल्या 'आनंदी आनंद गडे', 'गुराख्याचे गाणे' इत्यादी अनेक कवितांतली शेवटची कडवी क्रमिक पुस्तकांत गाळून टाकण्यात आली होती.

इथे आता आम्हाला संपादनाच्या दृष्टीने काही प्रश्न भंडावू लागले. कवीच्या मूळ काव्यकृतीची बूज राखायची की क्रमिक पुस्तकातील तिचं रूपच आहे तसं संग्रहात ठेवायचं ? त्या कवितांविषयी वाटणाऱ्या गोड हुरहुरीतून (नॉस्टाल्जिया-मधून) या संग्रहाची कल्पना निघाली असल्यामुळे क्रमिक पुस्तकातील त्या कवितांचं, वाचकांच्या ओळखीचं झालेलं रूपच या संग्रहात सादर करणं स्वाभाविक होईल, ही अशा प्रसंगी कोणालाही पटावी अशी भूमिका संभवते. आम्हांलाही आधी तसंच वाटलं. पण थोडा विचार केल्यावर या भूमिकेने समाधान होईना. आपल्या गोड हुरहुरीला (नॉस्टाल्जिया) त्या काळाच्या स्मृती लगडलेल्या असतात. तो काळ पुन्हा आणणं आपणांस कधी तरी शक्य असतं का ? – हे एक. शिवाय, मधल्या काळात रसिक म्हणून आपण वाढलेले असतो आणि कवितांनाही कालप्रवाहात निरनिराळी

परिमाणं प्राप्त झालेली असतात. हे एकदा लक्षात घेतलं की या संग्रहाची उभारणी त्या कवितांच्या आठवणीतूनच होत असली तरी त्यामुळं क्रमिक पुस्तकाच्या मर्यादेतच हे काम आखून घेण्याची खरोखर कितपत आवश्यकता आहे ? शाळेतल्या मुलांना कवितांची गोडी लागावी, त्यांच्यावर कवितांचे संस्कार व्हावेत यासाठी क्रमिक पुस्तके तयार करताना, शाळेतली मुलं डोळ्यांसमोर ठेवून मूळ कवितेत काही फेरफार करणं आवश्यक होऊन बसतं. कवींचीही त्याला संमती असणारच. पण म्हणून आयुष्यभर आपण क्रमिक पुस्तकांतच राहणं योग्य ठरणार नाही. शिवाय हा संग्रह खाजगी वितरणासाठी नाही – सर्वांच्याच हातांत तो पडणार आहे. ज्यांचा या क्रमिक पुस्तकांशी अजिबात संबंध आलेला नाही अशा वाचकांच्या हातातही हा संग्रह जाणार आहे. परिणामी, क्रमिक पुस्तकासाठी कवितेचं कातरलेलं रूप हीच खरी कविता, अशी त्यांची कायमची समजूत होऊन राहायची.

यातून मार्ग कसा काढायचा ? क्रमिक पुस्तकांचा संदर्भ तर आम्हांला मुळीच सोडायचा नव्हता, पण त्यामुळे आखल्या जाणाऱ्या मर्यादांतही आम्हांला गुंतायचं नव्हतं. क्रमिक पुस्तकांतील कवितांना त्यांचा असा स्वतःचा रंग असतो, तो खरवडून टाकायचा नव्हता. त्या कवितांचं एक स्वतंत्र विश्व बनलेलं असतं. ते विश्व आणि ज्या कवितांच्या आधारे ते निर्माण झालं आहे त्या मूळ काव्यकृती ही दोन विश्वं कशी सांधायची ? ही विश्वं जोडण्यासाठी पूल म्हणून "टिपां"चा उपयोग होऊ शकेल, अशी कल्पना आमच्या मनात आली.

यामुळेही प्रश्न सुटणार होते असं नाही. ह्या संग्रहाची संहिता मूळ काव्यकृतीवरून सिद्ध करावयाची की क्रमिक पुस्तकातील त्या कवितेच्या संस्कारित रूपावरून ? याबाबतची मनाची आंदोलनं बारीक बारीक प्रश्नांचे अनेक हेलकावे घेत अखंड चालूच राहिली.

मूळ काव्यकृती सादर करायचं ठरवू लागलो, तर 'या बाळांनो !' या तांब्यांच्या कवितेत मूळ पाठ 'या बालांनो !' असा असल्याचं आढळलं. ते कानांना कसंसंच वाटलं. 'बाळांनो' हे गोंडस रूप क्रमिक पुस्तकांतून तोंडी रुळलेलं.

सगळ्याच कविता क्रमिक पुस्तकांवरून सादर करू या असं ठरवू लागलो की एखाद्या क्रमिक पुस्तकातल्या 'लेजीम' सारख्या कवितेत "चला जाउं या शेतांत" ही ओळ गाळून त्या कवितेच्या मूळ आशयाचा सुंदर रोखच बदलून टाकलेला आणि वर कडव्यांची धसमुसळेपणाने उलटापालट करून टाकलेली पाहण्यात यायची. रात्रभर लेजीम खेळण्यात दंग झालेले त्या कवितेतले जवान पहाट होताच नव्या उत्साहाने "चला जाउं या शेतात" असे श्रम करायला ताजेतवाने होऊन निघतात,

हे दृश्यच किती सुंदर आहे ! कवितेतला हा अकारण गाळून टाकलेला भाग टिपांमध्ये समाविष्ट करून क्रमिक पुस्तकातली कविता संहितेत सादर करावयाची कल्पनाही पटेना . . . मूळ काव्यकृतीच संहितेत सादर करावी असं ठरविलं. म्हणजे पुन्हा इथं आम्ही मूळ काव्यकृतीवर आलो !

'सायंकाळची शोभा' या कवितेने आमच्यापुढं निराळाच प्रश्न उभा केला. तांब्यांच्या मूळ कवितेहून ही कविता इतकी वेगळी आणि स्वतंत्र तयार झाली आहे की तांब्यांच्या काव्यसंग्रहात ती कविता शोधण्याचा प्रयत्न कोणी केला तर त्याला ती तिथं आढळणारच नाही. हा एक सर्वस्वी वेगळाच प्रकार होता. परंतु ही क्रमिक पुस्तकातली कविता शीर्षकासकट वाचकांच्या मनात इतकी भिनलेली आहे की संहितेत तीच सादर करून मूळ कवितेचा निर्देश 'टिपे'त करणं आम्हाला सयुक्तिक वाटलं.

यशवंताच्या 'घर' या कवितेचं 'शेतकऱ्याची संपत्ती' असं शीर्षक एका पुस्तकात आहे तर 'ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे' ह्या लक्ष्मीबाई टिळकांच्या कवितेतील चरणात एका क्रमिक पुस्तकात 'तुझ्या कडेवर बाळे' असा 'शिरावर'ऐवजी 'कडेवर' हा बारीकसा बदल केलेला आढळला. पण घागर डोक्यावर किंवा कमरेवर घेण्याच्या प्रथेचा जुन्या काळात जातिव्यवस्थेशी संबंध होता, असं यावर भाष्य ऐकण्यात आलं.

ही फक्त थोडीशी उदाहरणं सांगितली. अनेक कवितांचा याप्रकारे विचार करावा लागला. प्रत्येक कविता तिचे स्वतःचे प्रश्न कशी उपस्थित करते आणि म्हणून कुठल्यातरी एका टोकाच्या भूमिकेचा अवलंब करणं कसं चुकीचं ठरेल हाच धडा त्यातून आम्हांला मिळाला. त्यामुळे कोणतीही एकच आग्रही भूमिका घेण्यापेक्षा रसवादी भूमिकेतून, कवितेची भावरम्यता लक्षात घेतच, प्रत्येक कवितेला आपण कसं सामोरं गेलं पाहिजे हे लक्षात आलं. त्यामुळेच यानुसार कधी क्रमिक पुस्तकातून, कधी मूळ काव्यसंग्रहातून, कधी अन्य संदर्भातून, कधी निरनिराळ्या पाठाच्या मिश्रणांतून कवितेची संहिता सादर करावी लागली. प्रत्येक कविता हा संपादनाच्या दृष्टीनेदेखील एक नवा अनुभव असतो, हे सत्य यातून हाती आलं.

पण ह्या दृष्टीतूनही हे सगळं संपादन सुसूत्र, सुसंगत आणि समाधानकारक झालं आहे, असं आम्हाला म्हणता येणार नाही. एक म्हणजे ठेचाळत, धडपडतच आम्हांला हे शिकावं लागलं, हे तर झालंच, पण त्याहूनही, व्यावहारिक अडचणी फार मोठ्या होत्या. क्रमिक पुस्तकांच्या आणि काव्यसंग्रहाच्या नव्या नव्या आवृत्त्यांतही इतके बदल केले गेलेले आम्हांला आढळले की त्यातून विश्वासार्ह

संहिता तयार करणं हा एक स्वतंत्र उद्योगच होऊन बसेल हे लक्षात आलं. आणि या अफाट पसाऱ्याच्या तुलनेने आमच्या गाठी तर फारच थोडा वेळ होता. ऑगस्ट महिन्याच्या अखेर तिन्ही भाग वाचकांना मिळतील असं जाहीर झालं होतं. त्या दाबाखाली हे काम विलक्षण कृत्रिम गतीने पुरं करावं लागलं. सगळे काव्यसंग्रह व त्यांच्या विविध आवृत्त्या एकाच वेळी उपलब्ध झाल्या नाहीत. कित्येक काव्यसंग्रह अजूनही उपलब्ध व्हायचे आहेत. या सगळ्या अडचणींच्या मर्यादा आमच्या कामावर पडल्या आहेत, हे आम्हाला इथं कबूल केलं पाहिजे. हा एक नवा अनुभव होता. पुढले भाग तयार करताना या अनुभवांचा फायदा होईल असं म्हणता येईल. पण हेही तितकंसं खरं नाही. कविता ही अखेर निर्मिती आहे – संदिग्धता हीच तिची प्रकृती. त्या प्रांतात पाऊल टाकल्यावर ठामपणाला अर्थच राहात नाही. आधीच्या अनुभवातून बांधलेले आडाखे टिकत नाहीत. सगळे पूल धुक्याचे पूल ठरतात. . .

ह्या सर्जनशीलतेच्या संदिग्ध, गूढ शक्तीच्या बळावरच कविता आपल्या सांस्कृतिक जीवनात नकळतपणे खोल खोल रुजते, पिढ्यापिढ्यांतून वाढते, आठवणींतून रंगते, गोड हुरहुरीतून तरंगते. . .

सत्य जुनंच – क्रमिक पुस्तकांतल्या कवितांच्या 'आठवणीं'तून नव्याने उजळलेलं, नव्याने उमजलेलं. . .

## २. टिपा

### थोर तुझे उपकार

ही कविता विल्यम मावर यांच्या 'द इंग्लिश स्पेलिंग बुक' या पुस्तकातील 'माय मदर' या कवितेचं रूपांतर आहे.

### कोंबडा

'नवयुग वाचनमाले'त (पुस्तक तिसरें) ही कविता *सहा* कडव्यांची करण्यात आली आहे. दुसरं कडवं ('करायाचें. . . आवडो तो' !) सरळ गाळलं आहे, तर सहाव्या आणि सातव्या कडव्यांतल्या दोन दोन ओळी कमी केल्यामुळे ('बरे-

वाइट. . .सोडणार नाहीं'; 'लोककल्याणीं. . .नसे कोणी !') आणखी एक कडवं कमी झालं आहे. इतर काही ओळींतही बदल केले आहेत. 'पिसारा त्याचा किती झोंकदार' ही ओळ 'पंख सुंदर चिमुकले रंगदार' अशी बदलली आहे; 'चिमुकली बांकदार !' ऐवजी 'कितितरी बांकदार !' असा बदल केला आहे. 'रिकाम्यांचा या बडेजाव. . .'ऐवजी 'फुकट यांचा हा बडेजाव. . .'असा पाठ योजिला आहे.

### आनंदी आनंद

या कवितेच्या पहिल्या कडव्यामध्ये 'भरे', 'फिरे' या शब्दांच्या बाबतीत निरनिराळ्या पुस्तकांत खूपच फिरवाफिरव असल्याचं आढळून आलं. 'बालकवीची कविता' (१९२५, संपादक गोपाळ गोविंद अधिकारी) या पुस्तकात 'वरतीं खालीं मोद *भरे*; वायूसंगें *मोद-भरे*' अशा ओळी आढळतात. 'बालकवीची समग्र कविता' (१९४२, संपादक प्रो. भा.ल. पाटणकर) या पुस्तकात त्या ओळी 'वरतीं खालीं मोद *फिरे*, वायूसंगें मोद *भरे*; अशा आढळतात. तर 'नवयुग वाचनमाला' भाग ४ (आवृत्ती १९५७, संपादक प्रल्हाद केशव अत्रे) या क्रमिक पुस्तकात 'वरतीं खालीं मोद *भरे*, वायूसंगें मोद *फिरे*' अशा त्या आढळतात. 'नभांत *भरला*, दिशांत *फिरला*' या त्यानंतरच्या ओळींतील क्रमाशींही त्या सुसंगत वाटतात.

### आजीचें घड्याळ

शेवटच्या कडव्यातील 'मौजेचें असलें घड्याळ दडुनी'. . .हा चरण 'ऐसें चित्र घड्याळ तें दडवुनी'. . .असा पाठ काही पाठ्यपुस्तकांत आढळतो. (मराठी वाचनमाला चौथें पुस्तक)

### पेरील जैं शेतकरी न कांहीं

ही कविता 'शेतकरी व त्याचा नांगर' या गद्य पाठातली आहे. ('मराठी सेकंड बुक') शेतकरी मुलांना संबोधून स्वतःच्या मेहनतीची व जीवनक्रमाची माहिती देतो आणि पाठाच्या शेवटी ''माझी थोरवी केवढी आहे ती ऐका'' असं सांगून ही कविता म्हणतो.

### जिऊ

चंद्रशेखरांच्या 'काय हो चमत्कार !' या खंडकाव्यातला हाच उतारा विशेषेकरून निरनिराळ्या क्रमिक पुस्तकांत घेतलेला आढळतो. काही पुस्तकांत 'गोधूमवर्ण तीचा. . .'पासून सुरुवात केली आहे, काही पुस्तकांत 'ती एकजीव

दोघे'...पासून, तर काही पुस्तकांत 'पूर्वी एक धनाजी...' व 'नमुनेदार धनाजी' या दोन वेगवेगळ्या आर्या प्रारंभाला जोडून घेतल्या आहेत. मूळ काव्य दीर्घ, सुमारे ३२४ ओळींचं आहे.

### चंद्रकांत राजाची कन्या

देवलांच्या 'झुंजारराव' नाटकातलं हे पद इतकं लोकप्रिय झालं की 'यादवराया भाई या रे' या पदाऐवजी 'चंद्रकांत राजाची कन्या' ही चाल सर्वत्र लिहिली जाऊ लागली व कालांतराने 'चंद्रकांत-जाती' हे कवितेच्या एका वृत्ताचंच नाव होऊन बसलं. इथं शेवटची ओळ अर्धी सोडलेली आहे, ती मुळातच तशी आहे.

### अ आ ई !

दत्तांची कविता या काव्यसंग्रहात मूळ कवितेवर कवितेची चाल 'तुम्ही चला हो वरमायी, नोवरियाचे आई' अशी दिली आहे.

### नीतिशतकांतील वेंचे

शेवटच्या श्लोकात वृत्ताचं नाव 'वसंततिलका' असं न देता 'वसंततिलक' असं दिलं आहे. हा मुद्रणदोष नसावा, कारण त्या काळातील आणखीही काही कवितांमध्ये वृत्ताचं नाव 'वसंततिलक' असं योजिलेलं आढळतं. मात्र हा बदल रूढ झालेला दिसत नाही.

### माझी कन्या

'असा माझा अभिमान गरीबाचा' हा चरण 'असा आहे मज गर्व गरीबीचा !' असाही लिहिलेला आढळतो.

### आजारीपण

'बालशारदे'त कवितेची चाल 'भाव धरा रे' अशी दिली असून कवितेवर 'एका अजाण मुलाची समजूत' अशी टीप आहे.

### या बाळांनों

ब्राउनिंगच्या 'पाइड पायपर' या काव्यावरून केलेल्या 'पुंगीवाला' या रूपांतरित कथाकाव्यातील हे गीत अनेक क्रमिक पुस्तकांतून सुटंच घेतलं गेल्यामुळे एक स्वतंत्र कविता म्हणून वाचकांच्या परिचयाचं होऊन राहिलं आहे. या कवितेतील 'या बालांनों !' या कवीच्या मूळ पाठाऐवजी 'या बाळांनों !' हा क्रमिक पुस्तकातील

पाठच वाचकांच्या तोंडी रुळला आहे.

### खार

ही दहा कडव्यांची (वीस ओळींची) मुळातच लहान असलेली कविता निरनिराळ्या क्रमिक पुस्तकांत चार कडव्यांची (आठ ओळींची) किंवा सहा कडव्यांची (बारा ओळींची) अशी आणखीच लहान करून दिलेली आढळते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही कदाचित हा फरक केला जात असावा.

### सासरची पाठवणी

ही मुळात ५८ श्लोकांची दीर्घ कविता स्वतंत्र पुस्तिकेच्या रुपानेही प्रसिद्ध झाली होती. निरनिराळ्या क्रमिक पुस्तकांत आढळणारे तिच्यातले उतारे लक्षात घेऊन इथं १३ श्लोकांची कविता दिली आहे. 'नको फार हव्यास गे भूषणांचा. . .'' हा इथं शेवटी आलेला श्लोक मुळात 'पक्वान्नें शाकभाज्या. . .''या श्लोकापूर्वीचा आहे. पण बहुतेकांनी तो क्रम (बहुधा परिणामासाठी) बदललेला दिसतो. इथंही तोच क्रम अनुसरला आहे.

### मराठी ग्रंथकारांस प्रार्थना

मूळ कविता ३७ आर्यांची आहे. 'मराठी ग्रंथकारांस विनंती' असं तिचं शीर्षक आहे आणि 'आर्या' हे वृत्ताचं नाव दिलं आहे.

### चेंडू

या कवितेच्या शेवटी मिस् मेरी भोर यांनी एक गमतीदार सूचना लिहिलेली आहे· ''तिसऱ्या गाण्यांतला धडा शिकून झाला म्हणजे मुलांस थोडा मौजेचा खेळ पाहिजे म्हणून हें गाणें येथें घातलें आहे.''

### फत्तर आणि फुलें

प्र. के. अत्रे (केशवकुमार) यांच्या संपादनाखाली स्त्रियांसाठी निघालेल्या 'मनोरमा' या मासिकाच्या पहिल्याच अंकात (एप्रिल १९२९) ही कविता प्रसिद्ध झाली होती, अशी माहिती मिळाली. 'श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली' या ओळीतील श्लेष त्याच घटनेला अनुलक्षून आहे, हे त्यावरून लक्षात येईल.

### गोदागौरव

'श्रीगोदागौरव' या संकल्पित खंडकाव्याचे काही सुटे सुटे भागच चंद्रशेखरांकडून लिहून झाले. 'गोदावरीचा उगम', 'नासिक-पंचवटी', 'हिरावाडी', 'पंचवटी व तपोवन', 'टाकळी आणि ओढें' हे ते भाग होत. त्यांपैकी 'नासिक-पंचवटी' या ५२ कडव्यांच्या (चार चार ओळींची कडवी) भागातीलच काही कडवी क्रमिक पुस्तकातल्या उताऱ्यांसाठी बहुधा निवडली जातात. ती एकत्र विचारात घेऊन अकरा कडव्यांचा उतारा इथं दिला आहे. या कवितेची चाल देताना 'अयि मधुरे मधुमोदविलासिनि' हे शंकराचार्यांचें यमुनाष्टक व 'दो दिवसांची तनु' हा फटका अशा दोन्ही चालींचा उल्लेख कवीने केला आहे.

### श्रावणमास

काही क्रमिक पुस्तकांत 'श्रावणमासीं हर्ष मानसीं. . .' ही ओळ 'हर्ष मनासी' अशी लिहिलेली आढळते. एका पुस्तकात 'श्रावणमहिमा एकसुरें'च्या जागी 'श्रावणमहिना एकसुरें' असाही पाठ आढळला. बालकवींच्या मूळ कवितेत 'हर्ष मानसीं. . .' आणि 'श्रावणमहिमा' हेच पाठ आहेत.

### करुणाष्टकें

बहुतेक क्रमिक पुस्तकांत 'अनुदिनिं' याऐवजी 'अनुदिन' असा पाठ योजिलेला आढळतो.

### आहे मनोहर तरी गमतें उदास !

''कांही वर्षांपूर्वी वैदर्भीय कादंबरीकार रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'महाराष्ट्रवाग्विलास' या मासिकांत समस्या पुरी करण्याची चढाओढ लावली होती. या चढाओढींत श्री. सरस्वतीकंठाभरण (रा. दिनकर नानाजी शिंदे) यांची श्लोकमाला उत्कृष्ट ठरली. समस्यापूर्तीकरितां 'आहे मनोहर तरी गमतें उदास,' ही चौथी ओळ दिली होती.'' (महाराष्ट्र रसवंती-भाग दुसरा, पृ. ३९ वरून)

### कावळा व बगळा

महादेव काशीनाथ कारखानीसकृत 'मुलांकरिता कविता' (१९२१) या पुस्तकाच्या प्रस्तावनेत '''कावळा आणि बगळा' व 'दोन मांजरे' या दोन कविता येथील म्युनिसिपल स्कूलमधील शिक्षक रा० देव यांनी रचिल्या आहेत'', असा साभार उल्लेख आहे.

### यापुढें

'मॅकमिलन'च्या क्रमिक पुस्तकात (पुस्तक ४ थे) या कवितेत पुढील फेरफार केलेले आढळतात : '*यवनांना* धायी धायी'ऐवजी '*शत्रूला* धायी धायी'; 'जया *यवनांही*'ऐवजी 'जया *राहूं दे*'; '*दापील* निजामा कोण'ऐवजी '*दाबील* निजामा कोण'; 'संकटीं न उरला *वाली*'ऐवजी 'संकटीं न उरला *कोणी*'.

### सायंकाळची शोभा

कवीची मूळ काव्यकृती क्रमिक पुस्तकामध्ये किती आमूलाग्र बदलू शकते याचं उत्तम उदाहरण म्हणजे ही कविता. 'रासमंडळ गोपीचंदन' या कवितेतून 'नवयुगवाचनमाले'मध्ये एक वेगळीच, स्वतंत्र कविता उभी केली आहे. 'राऽसमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जयु ।' असं ध्रुवपद असलेल्या पाच विषमचरणी कडव्यांच्या मूळ कवितेचा आशय अगदी वेगळा आहे व केवळ सायंकाळचं वेगळं काढता येण्यासारखं वर्णनही त्या कवितेत नाही. पण त्या कवितेच्याच निरनिराळ्या कडव्यांतल्या काही चरणांची उलटसुलट जुळणी करून व भरीला 'कुरणावर शेतांत पसरला गुलाल चौफेरी' अशी एक नवीनच ओळ त्यात घालून (ही ओळ तांब्यांच्या कवितेतली नाही) 'सायंकाळची शोभा' ही कविता तयारं करण्यात आली आहे. शीर्षकही संपादकांनीच दिलेलं. असं असलं तरी ही कविता ह्याच आकारात, 'सायंकाळची शोभा' या शीर्षकासकट तांब्यांची कविता म्हणूनच वाचकांच्या आठवणींत इतकी रुजून राहिली आहे की तशीच ती या संग्रहात देणं उचित वाटलं. 'रासमंडळ' ही कविता तांब्यांच्या संग्रहात पाहावयास मिळेल. (रासमंडळ गोपीचंदन – तांबे यांची समग्र कविता आ. ७वी (१९७५) व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. १०५)

### मधमाशी

ही कवितादेखील 'मधमाशा, मध व मेण' ('मराठी सेकंड बुक') या गद्यपाठात घातलेलं 'अंजनीगीत' आहे. बाप आणि मुलगी (गंगू) यांच्यात मधमाश्यांच्या उद्योगीपणाबद्दल झालेल्या संवादाच्या शेवटी बाप मुलीला म्हणतो, ''बरें, मधमाशीचें एक गाणें आहे, तें तूं गावयास शीक.''

### घरिं एकच पणती

खांडेकरांच्या 'उल्का' कादंबरीतली ही कविता आहे.

### चुकलेलें कोकरूं

मूळ कवितेचं शीर्षक 'सायंकाळीं रानांत चुकलेलें कोकरूं' असं असून कवितेत एकूण सत्तावीस कडवी आहेत. 'माझीही माता नेली । यमकरें' आणि 'स्वातंत्र्य जयांचें गेलें...सुख न त्यां कसलें...' अशा आणखी दोन धाग्यांनी मूळ कवितेतील कारुण्याचा पीळ वाढलेला आहे. पण क्रमिक पुस्तकातील या रूपात ते दोन धागे काढण्यात आले असून केवळ कोकराच्या करुण अवस्थेभोवतीच कवितेचा भावार्थ सीमित केला आहे. कवितेवर, 'नृपममता रामावरती सारखी . . .' अशी चाल दिली आहे.

### चांदोबाची गंमत

'नवयुग वाचनमाले'त (पुस्तक पहिले) शेवटची ओळ 'असाच पडशिल जलामधीं!' अशी दिलेली आहे. हीच ओळ वाचकांच्या अधिक परिचयाची झालेली आहे.

### लेजीम

काही क्रमिक पुस्तकांत या कवितेतल्या शेवटच्या दोन कडव्यांच्या क्रमाची अदलाबदल (वरचं कडवं खाली व खालचं वर) करून त्यातली 'चला जाउं या शेतांत' ही ओळच अजिबात गाळून टाकलेली आढळते. (अर्थात त्यामुळे कवितेच्या आशयाचा रोखही बदलतो.) गाळलेल्या ओळीच्या जागी 'छन खळ खळ छन ढुम ढुम पट ढुम लेझिम चाले जोरांत !' अशी ओळ घातली आहे. आणि 'डफवाला तो चंद्र' . . .ऐवजी 'मावळतीला चंद्र' असाही पाठात बदल केला आहे.

### दसरा

'दसरा सण मोठा' या ओळी उच्चारताच "नवरात्र संपलें, दसरा उजाडला. मोरूचा बाप मोरूला म्हणाला" – इत्यादी वाक्यं आपणांस धडाधड आठवू लागतात. त्याच धड्याच्या शेवटी तितक्याच ठसठशीतपणे आठवणीत राहिलेली ही 'साकी'तली रचना येते. गद्य पाठाच्या शेवटी कवितेची योजना करणं हा त्या क्रमिक पुस्तकांचा एक विशेषच दिसतो.